Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

विश्व शांतीची साधना

अर्थात्

सामुदायिक प्रार्थना



राष्ट्रसंत तुकडोजी महाराज

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

9-3
Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

विश्व-शांतीची साधना

अर्थात्

सामुदायिक प्रार्थना

(वं. राष्ट्रसंतांच्या दिव्य विचाराची ज्ञान-सरिता)

भाग
१

संकलन
प्रा. रघुनाथ कडवे
डॉ. सूर्यप्रकाश जयस्वाल

प्रकाशक
राष्ट्रसंत साहित्य प्रकाशन,
नागपूर.

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

प्रकाशक :
रूपराव वाघ
राष्ट्रसंत साहित्य प्रकाशन
'गुरुकृपा', १२९, दुर्गादत्त अपार्टमेंट,
क्वेटा कॉलनी, नागपूर.

अ.भा. श्रीगुरुदेव सेवामंडळ
श्रीगुरुदेव प्रकाशन
गुरुकुंजाश्रमच्या सौजन्याने

मुखपृष्ठ संकल्पना :
नरेन्द्र मन्ने,
नागपूर.

प्रकाशन :
३० एप्रिल ९२ वी 'ग्रामजयंती'

मुखपृष्ठ व अक्षर जुळवणी :
'इमेजिका',
जुनी मंगळवारी, नागपूर.
फोन : ७६६३९९

मुद्रक :
जयकृष्ण ऑफसेट वर्क्स्
कापसे चौक, नागपूर.

द्वितीय आवृत्ती

मूल्य : रू. ३५/-

© सर्व हक्क प्रकाशकाधिन

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

प्रकाशकाचे हृद्गत...

'विश्वशांतीची साधना अर्थात् सामुदायिक प्रार्थना' नामक पुस्तकाची ही द्वितीय आवृत्ती प्रसिद्ध करतांना आम्हाला आनंद होत आहे. वं. राष्ट्रसंतांनी सामुदायिक प्रार्थनेचा केलेला अविष्कार म्हणजे विश्वशांतीचा अमर शाश्वत मार्ग होय.

'ही प्रार्थना नच मरणी मुक्ती मागण्यास्तव शोधली' असे राष्ट्रसंत म्हणतात. तर 'संसार स्वर्गसम करा प्रभू!' यासाठी त्यांनी ईश्वराला दिलेली ही हाक आहे. 'मानव्य धर्म जागण्या, उपकार सेवा साधण्या, निजधर्मतत्त्वा शोधण्या, निजकार्यशक्ती साधण्या, बल धर्म देशा रक्षण्या' अशा विविध व व्यापक उदात्त विचारांनी प्रार्थनेची ही आदर्शवत सर्वधर्म समन्वयकारी प्रणाली सुरु केली. "हे एक ईश्वरकार्या यातुनि सर्व सुख पावे जना" "घे ईश्वरी आदेश हा, कर सामुदायिक प्रार्थना" (आदेश रचना) अशी चैतन्यदायी हाक राष्ट्रसंतांनी सर्वांना दिलेली आहे.

"गाओ भाई, सब देवनकों गाओ। सब सन्तनको गावो", म्हणणारी, 'आओ सभी मिलेंगे समुदाय प्रार्थना में' असे आवाहन करणारी, 'सबके लिए खुला है मंदिर यह हमारा' ही एकात्मता शिकवणारी सामुदायिक प्रार्थना मानव-धर्माच्या उत्थानासाठी गाईली गेली आहे.

वं. राष्ट्रसंतांनी त्यांच्या ओजस्वी वाणीतून सामुदायिक प्रार्थनेवर वेळोवेळी जे मौलिक दिव्य विवेचन केले, रहस्य सांगितले तेच आम्ही पुनःश्च या आवृत्तिच्या रूपाने आपणासमोर ठेवीत आहोत. आपण सर्वांपर्यंत ही दिव्य विचार ज्ञान-सरिता पोचविण्याचा प्रयत्न कराल आणि सहयोग द्याल ही हार्दिक अपेक्षा!

\- प्रकाशक

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

सामुदायिक प्रार्थना

विश्व-बंधुत्वाचा पाठ

मित्र हो! ऐका माझे वचन । जरि व्हावे वाटे गावाचे कल्याण ।
तरि सामुदायिक प्रार्थना-साधन । सोडू नका कधीहि ॥७७॥

एवढे अनुभवे सांगूनि ठेवतो । प्रार्थनाच मी गावाचे धन समजतो ।
यानेच स्वर्ग, मोक्षहि पावतो । समाज अपुला ॥७८॥

आमचा देव समाजी वसतो । समाजाकरिता सर्व करतो ।
सर्वास व्यापूनि राहतो । प्रार्थनेच्या आसनी ॥७९॥

देव-उपनिषदांची प्रार्थना । 'सुख हो सर्वचि प्राणीजना' ।
सर्वांची उन्नति हीच धारणा । प्रार्थनेमाजी ऋषीची ॥८८॥

येशू ख्रिस्ताने प्रार्थना केली । सर्वासाठी शांति मागितली ।
सहनशक्तीची देवता पावली । तयालागी ॥८९॥

महंमदाने केली प्रार्थना । विखुरला इस्लाम कराया शहाणा ।
संघटित केले त्याने स्वजना । तया काळी ॥९०॥

पावित्र्य शिकविले झरतुष्ट्राने । संयम शिकविला महावीराने ।
अहिंसक संघ वाढविला बुद्धाने । प्रार्थनेद्वारे ॥९१॥

संतांचे नामसंकीर्तन । ते सामुदायिक प्रार्थनेचेचि रूप जाण ।
सर्व देव-स्मरणे करोनि संघटन । दिले ज्ञान सर्व जना ॥९२॥

शिस्त, शांति, गांभीर्यादि गुण । उठण्या-बसण्या-बोलण्याचे ज्ञान ।
लाभे मानव्याचे शिक्षण । प्रार्थनेमाजी ॥९५॥

प्रार्थना मानव्यशिक्षणाची शाळा । ग्रामसंस्कृतीचा मुख्य जिव्हाळा ।
भेद-कल्पना जाती रसातळा । प्रार्थनेच्या मुशीमाजी ॥९६॥

'सर्वचि आपण बंधुजन' । हा भाव वाढ घे मनोमन ।
गावाची स्वर्गीयता असे अवलंबून । याचपरि ॥९७॥

ही प्रार्थना गावी राही जागती । तरि जिवंत राहील गावसंस्कृति ।
सामुदायिकतेची दीपज्योति । प्राकशेत सर्व काळ ॥९९॥

विश्वी होऊ शकेल शांतता । तेथे गावाची कोण कंथा ?
सामुदायिक प्रार्थनाच करील एकता । नित्यासाठी, तुकड्या म्हणे ॥१००।

(ग्रामगीता-निवडक वेचे - अ.२७)

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

विश्व-शांतीची साधना

मंगल स्मरण

मंगल नाम तूम्हार प्रभू ! जो गावे मंगल होत सदा ।
अमंगलहारी कृपा तुम्हरी, जो चाहत दिलको धोत सदा ।
तुम आद-अनाद सुमंगल हो, अरु रूप तुम्हार निरायम है ।
तुकड्या कहे जो भजता तुमको, नित पावत मंगल निर्भय है ।।

प्रार्थनाष्टक

है प्रार्थना गुरुदेव से, यह स्वर्गसम संसार हो ।
अति उच्चतम जीवन बने, परमार्थमय व्यवहार हो ।।
ना हम रहे अपने लिए, हमको सभी से गर्ज हैं ।
गुरुदेव ! यह आशीष दे, जो सोचने का फर्ज है ।।१।।

हम हो पुजारी तत्त्व के, गुरुदेव के आदेश के ।
सच प्रेम के, नित नेम के, सद्धर्म के सत्कर्म के ।
हो चीढ झूठी राह की, अन्याय की अभिमान की ।
सेवा करन को दासकी, पर्वा नहीं हो जान की ।।२।।

छोटे न हो हम बुद्धि से, हो विश्वमय से ईशमय ।
हो ज्ञानमय अरु प्रेममय, जगदेवमय जगदीशमय ।।
हर इन्द्रियों पर ताब कर, हम वीर हो अति धीर हो ।
उज्ज्वल रहे सरसे सदा, निजधर्मरत खंबीर हो ।।३।।

यह डर सभी जाता रहे, मन बुद्धि का इस देह का ।
निर्भय रहे हम कर्म में, परदा खुलाकर स्नेह का ।।
गाते रहे प्रभु-नाम, पर प्रभु-तत्त्व पाने के लिये ।
हो ब्रह्म-विद्या का उदय, यह जी तराने के लिये ।।४।।

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

अति शुद्ध हो आचार से, तन-मन हमारा सर्वदा ।
अध्यात्म की शक्ति हमें, पलभी नहीं करदे जुदा ॥
इस अमर आत्मा का हमें, हर श्वासभर में गम रहे ।
गर मौत भी हो आगयी, सुख-दुःख हममें सम रहे ॥५॥

गुरुदेव! तेरी अमर-ज्योति का हमें निज ज्ञान हो ।
सत्ज्ञान ही तू है सदा, यह विश्वभर में ध्यान हो ॥
तुझमें नहीं है पंथ भी, ना जात भी ना देश भी ।
तू है निरामय एकरस, है व्याप्त भी अरु शेष भी ॥६॥

गुण-धर्म दुनिया में बढ़े, हर जीव से कर्तव्य हो ।
गंभीर हो सबके हृदय, सच ज्ञान का वक्तव्य हो ॥
यह दूर हो सब भावना, 'हम नीच है अस्पृश्य है' ।
हर जीव का हो शुद्ध मन, जब कर्म उनके स्पृश्य है ॥७॥

हम भिन्न हो इस देह से, पर तत्व से सब एक हो ।
हो ज्ञान सबमें एकही, जिससे मनुज निःशंक हो ॥
तुकड्या कहे ऐसा अमर पद, प्राप्त हो संसार में ।
छोड़े नहीं घरबार पर, हो मस्त गुरु-चरणार में ॥८॥

मंगलधून

जय बोलो सत्-धर्मों की । जय बोलो सत कर्मों की ॥
जय बोलो सब संतो की । जय बोलो सत्-पंथो की ॥
जब बोलो मानवता की । जय बोलो सब जनता की ॥
देश-धर्म में नीति हो । हम सत् के ही साथी हो ॥
विश्व-स्नेह का ध्यान करे । सबका सब सम्मान करे ॥

शांतिपाठ

सर्वेऽत्र सुखिनः सन्तु सर्वे सन्तु निरामयाः ।
सर्वे भद्राणि पश्यन्तु मा कश्चिदू दुःखमाप्नुयात् ॥

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

प्रार्थना-पुष्पांजली

हे जगच्चालक अमूर्त शक्ते! जशी इतर अनेक प्राण्यांची गुणकर्मे त्यांच्या त्यांच्या वेषानुरूप व योनीनुसार पूर्ण स्वरूपाची दिसतात तद्वतच मनुष्याच्या मनुष्यत्वाचा विकास योग्य गुणकर्मांनी, सहनशील स्वतंत्रतेने व विशालतेच्या उज्ज्वल बाण्याने होऊ दे. अर्थात् ज्या अपेक्षेने तू मनुष्यप्राणी निर्माण केले ती तुझी इच्छाच पूर्णत्वाला येऊ दे.

हे आनंदघना ! जी शांती जगाच्या कोणत्याही वैभवाने प्राप्त होत नसून तीस मानसिक धनाचीच आवश्यकता असते, असे सत्य व चिरंतन शांतिसुख प्रार्थीजनांत प्रार्थनाफलाने नांदू दे व बाह्य कर्मांनीही वृत्ती त्यातच रंगू दे. अर्थात् परमार्थ व्यवहार यांच्या भेदाची वृद्धि नष्ट करून त्यात साम्यता येऊ दे.

मानसिक शक्तीची उत्तम मूस बनवण्याकरिता रोजची स्थिर चित्ताची प्रार्थनाच महत्वाची ठरते. प्रार्थना पूजेकरिता नव्हे तर आपणामध्ये पूज्य विचार दृढ करण्याकरिता करावयाची असते, की जेणेकरून आपल्या इष्ट देवतेच्या सत्य आज्ञेचे पालन करण्याची हिंमत निर्माण होईल.

- राष्ट्रसंत तुकडोजी महाराज

प्रार्थना म्हणजे वाणीचा विलास नव्हे; तिचे उत्तम स्थान कंठ नसून हृदय हे आहे. प्रार्थना म्हणजे आपल्या अल्पत्वाचे दर्शन महान बनण्याचा दिव्य मंत्र आहे.

- महात्मा गांधी

आपल्या हृदयाचे द्वार सर्वथैव खुले रहावयास हवे की, ज्यायोगे भगवतशक्ती त्यात अनिर्बंध रूपाने संचार करू शकेल.

- योगी अरविंद

प्रयत्नहीन व भावहीन प्रार्थनेस आणि दुसऱ्याला ज्यापासून त्रास होईल अशा योजनेच्या याचनेस परमेश्वर कोणासही सहाय्य करणार नाही.

- स्वामी दयानंद

प्रार्थनेमुळे मनुष्यातील गुप्त सामर्थ्याला चेतना मिळते आणि ही चेतना जागृत झाली आहे या जाणिवेने प्रार्थना केली तर, तुमच्या हव्या त्या इच्छा पूर्ण होतील. तथापि असल्या प्रकारची कसल्याही दर्जाच्या ऐहिकासाठी प्रार्थना करणे अनुचित आहे.

-स्वामी विवेकानंद

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

अंतरंग

विश्वशांतीची साधना ....

विश्व बंधुत्वाचा पाठ ....

सामुदायिक प्रार्थनेची पार्श्वभूमी ९

सामुदायिक प्रार्थनेचा मथितार्थ १२

सामुदायिक प्रार्थनेचे प्रयोजन १८

सामुदायिक प्रार्थनेचा राजपथ २१

सामुदायिक प्रार्थनेची आवश्यकता २६

सैन्याला प्रार्थनेची काय गरज? ३०

विश्व-मानव निर्मितीचे विद्यापीठ - सामुदायिक प्रार्थना ३८

बुद्धिवाद आणि प्रार्थना ४१

सामुदायिक प्रार्थनेचे तात्त्विक स्वरुप ४६

सामुदायिक प्रार्थनेचे हृदय आणि उपांगे (पूर्वार्ध) ५८

सामुदायिक प्रार्थनेचे हृदय आणि उपांगे (उत्तरार्ध) ६८

सामुदायिक प्रार्थनेचे अंतरंग ७८

प्रार्थना : राष्ट्रपुरूष निर्मितीची योजना ८२

प्रार्थनेमुळे जीवनोद्धार ८५

सामुदायिक प्रार्थना - शंका समाधान ८८

सामुदायिक प्रार्थनेचा महामंत्र ९२

सामुदायिक जीवनासाठी सामुदायिक प्रार्थना ९५

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

सामुदायिक प्रार्थनेची पार्श्वभूमी

प्रिय मित्रांनो ! विचाराला अनुरूप अशी भोवतालीन परिस्थिती असल्याशिवाय विचाराची वाढ विचाररूपातसुध्दा होऊ शकत नाही. कारण कोणतेही विचार हे त्या त्या काळच्या परिस्थितीनेच बनलेले असू शकतात नि त्या विचाराला उन्नत करणारे दुसरे विचार वेगात आणण्याकरिता देखील योग्य परिस्थितीच असावी लागते. म्हणजे श्रीमंती किंवा गरीबी असावी लागते असे नसूच विचाराला पोषक अशी संगती किंवा डोळ्यासमोर दिसणारी चित्रे अथवा तेथील एकंदरीत सर्वच रागरंग अनुरूप असावा लागतो. विचार एक व समूह दुसरा असे जर असेल तर ते परस्परातच गुरफटून विचारांची पुढची वाढ बंद होत असते. जीं परिस्थिती समोर असेल तशी हवा वृत्तीत खेळू लागते नि ज्या परिस्थितीचा जोर विचारापेक्षा अधिक असेल तसेच विचार बनण्याला सुरुवात होत असते.

बंधूनो! वास्तविक जगात असा एकही मनुष्य नसेल की जो कुणाच्या तरी संसर्गाने उन्नत किंवा अवनत झाला नसेल. जो जो म्हणोन मनुष्य आपल्याला दिसत असेल तो समाजनिरपेक्ष नसून त्याचे विचार दुसऱ्या कुणाच्या तरी विचाराचेच द्योतक होत. तात्पर्य एवढेच की जे विचार आपणास कायम ठेवावयाचे असतील त्याच विचारांची परिस्थिती म्हणजे एकूण वातावरण ठेवावयास पाहिजे व वाटेल ते करून मनुष्य निर्माण करू शकतो.

वैषयिक सुखेच्छा वाढविणाऱ्या रंगमहालात किंवा ज्या स्थळी शृंगारिक चित्रे अथवा भोगविलासाचे वातावरण असेल अशा स्थळी एखाद्याने जर उदासतेचा विचार करून वैराग्य प्राप्त करतो म्हटले तर हजारात विरळाच तसा यशस्वी साधक सापडावयाचा; किंबहुना जो सापडेल त्याला तेथे भोगविलास आहेत की नाहीत याची कल्पनाही रहात नसावी. एरवी इतर सर्व त्या भोगात गांगरून गेलेलेच मिळावयाचे. त्याचप्रमाणे एखाद्या

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

स्मशानासारख्या स्थानी जाऊन कोणी जर भोगविलासाच्या रंगाचा विचार करील किंवा कुविचाराचा अतिरेक करतो म्हणेल तर तसा पुरुष विरळाच सापडणार की जो अती धुंद झालेला असेल! पण सर्वसाधारण मनुष्याच्या मनात तर समोरची परिस्थिती जशी असेल तसेच विचार वाढू लागत असतात, हा नेहमीचा अनुभव सर्वांनाच आहे. तेव्हा आपणाला कोणत्या विचारांची धारणा तयार करावयाची आहे हे लक्षात आणून तेच विचार अधिक बळाविण्याकरिता प्रत्येक अभ्यासूने विचाराप्रमाणेच विचार करण्याच्या जागेचे वातावरण अनुरूप असे निर्माण करावयास पाहिजे.

प्रिय मित्रांनो! मला या सर्व विवेचनातून असे सांगावयाचे आहे की, धार्मिक विचारांच्या स्थळी तेथील हवामानापासून, तेथील बिछायतीपासून, तेथे असलेल्या फोटोपासून, तेथे बसणाऱ्या लोकांच्या ओळीतील शिस्तीपासूनसुद्धा आपल्याला खबरदारी घेतली पाहिजे; म्हणजे पुढच्या कार्याला व विचाराला ते पोषक होत असते. आपली सामुदायिक प्रार्थना जर आपण तेथे गादी-तकिये टाकून करु लागलो तर सहजच लोक तक्याशी रेटून व पाय जरा लांब करून प्रार्थना करू लागतील. व कुणी म्हटलेही की - 'अहो! सरळ बसाना' तर ते म्हणतील - 'अहो! मनातून तर चाललेच आहे ना नामस्मरण! मग असे आणि तसे बसण्याचे काय कारण?'

यासाठी तेथे अशीच बिछायत करावी की त्यांना तशी भोगवासना वाढवावयास जागाच उरणार नाही व जिकडे पहावे तिकडे गंभीर वातावरणच दिसून येईल. बसणाऱ्या लोकांची प्रशांत भाविक मनोवृत्ति व लहान-मोठेपणाचा भाव विसरून अत्यंत विनम्रतेने आपल्या रांगेत मोकळ्या ओळीनी बसण्याची पद्धती; जेथे प्रकाशही उग्रता दाखवू शकत नाही असे प्रशांत स्थळ व ज्या ठिकाणी पक्षांचाही आवाज नाही नि अगदी लहान-लहान मुलेही स्थिर चित्ताने बसले आहेत असे गंभीर वातावरण; हे पाहून आपोआपच वृत्तीत सात्विकता येऊ लागेल व तेथे केलेली प्रार्थना मनाला क्षणभर तरी स्थिर करील, तसेच तेथील बोधमय विचारांचा परिणाम वृत्तीवर होऊन आपल्या धारणा शक्तीला दृढ करण्याची ताकद निर्माण होईल.

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

वास्तविक पाहता याकरिताच मंदिरांची योजना पूर्वीच्या संतमहंतानी केलेली होती पण त्यात विकृत रूढी शिरल्यामुळे आजकालची मंदिरे म्हणजे जणू व्यापाऱ्यांची बसावयाची बैठकच होऊन बसली आहे आणि म्हणूनच मी मैदानात अत्यंत शुद्ध वातावरण व रमणीय सात्विकता जेथे नैसर्गिकरीत्या किंवा कृत्रिमतेने का होईना मिळेल अशी जागा तयार करून तीत-सामुदायिक प्रार्थना करण्याचे निश्चित केले आहे. अर्थात् प्रार्थनेच्या महत्त्वाएवढेच तेथील शिस्तीला, स्वच्छतेला, गांभीर्याला व पद्धतशीरपणाला महत्त्व दिले आहे.

या सर्व विचारांना प्रत्येकाने आपल्या प्रार्थनेच्या स्थानी महत्व दिल्यानंतरच प्रार्थनेचा खरा वर्ग सुरू होणार आहे आणि ही अनुक्रमपद्धतीच प्रार्थनेचे वास्तविक महत्व काय ते आपोआप सांगणार आहे. अर्थात् अशा स्थळी प्रार्थनेला येणाऱ्या प्रत्येक साधकाचे विचार प्रार्थनेच्या तत्त्वानुरूप उन्नत होत जातीलच हे नैसर्गिकच आहे.

बंधूनो! तुम्हास प्रार्थनेची जेवढी आवश्यकता आहे तेवढीच व्यवस्थित राहणीची, अंतर्बाह्य शुद्धतेची व तेजस्वी वृत्तीचीही आवश्यकता आहे, हे विसरू नका.

★★★

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

सामुदायिक प्रार्थनेचा मथितार्थ

सामुदायिक प्रार्थना अनादी कालापासून आपल्या भारत खंडात प्रचलित आहे. पण आता ती नव्या उद्देशाने जागृत करण्यासाठी आपण कटिबद्ध झालो आहोत. महाभारताचा कालोचित अर्थ भागवतात सांगावा लागला. उपनिषदांचा स्पष्टार्थ गीतेत व्यक्त करावा लागला. त्याप्रमाणेच सामुदायिक प्रार्थनेचाही नवीन अर्थ आज लोकांना सांगण्याची गरज आहे. आज भारतात बहुसंख्य हिंदु लोक देवाचे अस्तित्व मानतात. देवाची भक्तीही करितात. पण आजची भक्ती देशाच्या संकटाच्या वेळी कामी येत नाही. भक्ती उपासना ही देवाकरिता म्हणजेच देशाकरिता आहे. लोकाकरिता आहे. कालानुरूप तिचे स्वरूप बदलते. बदलले पाहिजे.

आजच्या या कलियुगातील कटकटीच्या व फाटाफुटीच्या काळात सर्वांच्या अंतःकरणात एकतेची व सर्वांच्या सुखाकरिता सहकार्याने उद्योग करण्याची प्रेममय सेवेची भावना आपणाला जागवावयाची आहे. समाजाच्या सर्वांगीण विकासाची नवी दिशा आखावयाची आहे. त्यासाठी सर्व शिस्तीच्या धारणेत समाजाला एकसूत्री बनवायचे आहे. ही धारणा निश्चयाने व सातत्याने लोकांच्या अंतःकरणात निर्माण करावयाची आहे आणि त्यासाठी ही सामुदायिक प्रार्थनेची प्रणाली आपण रूढ करीत आहोत.

देहाला रोज भोजनाची खुराक हवी. रात्र झाली की त्याला भोजनाची आठवण करून द्यावी लागत नाही. त्याचप्रमाणे संध्याकाळी झाली की प्रार्थनेची आठवण करून देण्याची गरज पडू नये. झाक पडताच कळकळीचे वेध लागले पाहिजेत. प्रार्थनेत आल्यानंतर त्या संस्कारांना आत्मसात केले पाहिजे. त्यातील बोधरूप तत्त्वज्ञान आचरणात आणण्याचा प्रयत्न व्हावा. प्रार्थना ही प्रेरणा देणारी आणि अनुभवाला सुखविणारी महान शक्ती आहे. ह्या प्रार्थनेतील तत्त्वज्ञान देश-धर्माची, मानवतेच्या कर्तव्याची भावना रूजविणारे झाले पाहिजे आणि त्याकरिता आम्ही सतत प्रचारक बनले पाहिजे. भारतात

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

अनेक तीर्थक्षेत्रे, साधुसंत, मंदिरे मानवधर्माच्या प्रचारासाठीच निर्माण करण्यात आली. त्या सर्वांचे आज पुनरुज्जीवन झाले पाहिजे. त्यातील स्वार्थभावना नाहीशी करून ती ज्ञानदानाची व सत्कार्याच्या प्रेरणेची स्थाने केली पाहिजेत. त्यातून प्रार्थनेचा आवाज दुमदुमला पाहिजे. संध्याकाळ झाली की, गावातील सर्व लोक मारुतीच्या मंदिरातील व प्रशस्त जागेसमोरील मैदानात गुरुदेवाच्या अधिष्ठानाखाली एकत्र आले पाहिजेत सर्वांनी सर्वांच्या सुखाकरिता पूरक होण्याची शिक्षा-दीक्षा या प्रार्थनेद्वारा घेतली पाहिजे. असे झाले तर ही सामुदायिक प्रार्थना या युगातील महामंत्र ठरल्याशिवाय राहणार नाही.

आपण या ठिकाणी वर्षाच्या वर्षाला भेटतो. ह्या पवित्र क्षेत्रात योगायोगाने आपण येतो. हे फार पवित्र क्षेत्र आहे. पण इथे आल्यानंतरच पवित्र भावना ठेवायच्या व पुन्हा घरी गेले की 'जैसे थे' अशीच स्थिती आपणा उपासकांची झालीशी दिसते. वास्तविक आपली यात्रा रोजच्या दैनिक यात्रेची शिदोरी आहे ती वर्षभर सातत्याने पुरवली पाहिजे. दिवाळी कशासाठी? दिवाळीच्या दिवशी स्वच्छता करतात. त्या दिवशी घराचा कानाकोपरा स्वच्छ करतात. अंगणात, खोलीत, स्वयंपाकघरात, संडासात दिवे लावतात. पण दिवाळी गेली की मग देवघरातंही दिवा लावण्याची शुद्ध राहत नाही. उंदरांच्या लेंड्याच काय पण कुठे मांजरीने घाण केली तरी त्याचा पत्ता त्यांना राहत नाही. दिवाळी आली की संचरला देव! व दिवाळी गेली की पसरला म्हसोबा! ही आपली प्रवृत्ती. दिवाळीच्या अधिष्ठानाच्या आम्ही विरोधात जात आहो. बाराही महिने स्वच्छ घर ठेवावे म्हणून दिवाळीचा वर्षदिन आहे. भूदान-दिन, ग्रामजयंती दिन हे सर्व दिन वर्षभर काम करण्यासाठी आहेत. शिक्षक दिनाच्या दिवशीच शिक्षकाची पूजा करावयाची व तो दिवस झाला की त्याच्या गळ्यातील टाकलेल्या हाराच्या मोबदल्यात त्याला राबवून घ्यावयाचे, त्याच्याकडून वाटेल ती कामे करवून घ्यावयाची, हा तमाशा आता किती दिवस चालविणार?

दसऱ्याच्या दिवशी उरभेट काय घेतो, परस्परांना प्रेमाचे सोने काय देतो रामराम काय करतो, पण तो दिवस गेला की 'मी तुले पाहून घेईन', घे तू मले पाहून' ची भाषा सुरू होते. वास्तविक दसऱ्याचा दिवस आपला

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

झगडा विसरून प्रेमाने राहण्याकरिता आहे; पण दिवाळी झाली की जसे त्यांच्या स्वच्छतेचे दिवाळे वाजते, श्रमदानाचे पानदान वाजते. मग लक्ष्मीचा वास तिथे कसा होणार? 'हात फिरे तिथे लक्ष्मी ठरे' पण जिथे हात फिरतच नाही व फिरला तरी दुसऱ्याच्या बोडख्यावरूनच फिरतो तिथे लक्ष्मी कशी नांदणार, त्यांच्या तिजोऱ्या कशा भरणार, भरल्या तरी त्या सुख कसे नांदू देणार!

सामुदायिक प्रार्थना ही एका दिवसाच्या यात्रेकरिता नाही. ती रोजची उपासना आहे. मला जे पटले ते मी सांगतो. ही प्रार्थना तुम्ही तुमच्या सुखाकरिता संतोषाकरिता केली पाहिजे. नाहीतर आता सत्यानाशापासून तुम्ही स्वतःला व दुसऱ्याला वाचवू शकणार नाही. मी आता स्पष्ट बोलतो. कारण मला काही मिनिस्टर व्हायचे नाही. मी तर सर्वच जागांचा राजीनामा देऊन टाकला आहे. कोणत्याही पदाचा पाश मला आता आणि कधीच नव्हता. आतातर मी सर्वांना प्रार्थनेच्या अधिष्ठानावर आणण्यासाठी व सर्वांच्या अधिष्ठानात प्रार्थनेचा प्राण ओतण्यासाठी मोकळा झालो आहे. हा उत्सव आपण ज्या जंगलात करतो ते आपल्या घरात रोज प्रार्थनेचा मंगल दीप लावण्याकरिता. हा एवढा मोठा मंडप. त्यासाठी रात्रंदिवस धडपड. इथल्या व्यवस्थेसाठी, यांच्याकडे जा त्यांच्याकडे जा. साहेबाला व्यवस्थेकरिता बोलावा. त्याला फुरसत असेल तर तो येणार. नाहीतर नाही. हे सर्व काही दुसऱ्या अंतःकरणावर संस्कार होण्याकरिताच आहे.

चांगले गुण अंगी यावे, रोज तुम्ही आपला वेळ सत्संगात व प्रार्थनेच्या वातावरणात घालवावा यासाठी ही सर्व खटपट आहे. ही सर्व शिस्त केवळ या तीर्थक्षेत्रातच ठेवायची व पुन्हा कोरडे रहावयाचे असा याचा अर्थ नाही. तुकडोजी बुवा आला की शिस्त ठेवायची व तो गेला की लंबे पाय पसरून निजावयाचे ही आदत काही चांगली नाही. लोकांची आदत काही अजब झाली आहे. ते आपल्या कामासाठीच बुवा पकडण्याची त्यांची निष्क्रीय वृत्ती राष्ट्राच्या दृष्टीने फार घातक ठरणार आहे. आता हे सर्व महंत राष्ट्राच्या उभारणीच्या कार्यासाठी रात्रंदिवस झटतील, आपल्या आयुष्याचा एकेक क्षण खर्ची घालतील तेव्हा कुठे या राष्ट्राचा भाग्योदय येईल. त्यासाठी

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

आता आपल्या पोरांना सुद्धा सामुदायिक प्रार्थनेचे धडे, प्रार्थना पाठ द्या. त्याचा अर्थ समजावून सांगा. त्याला कळले पाहिजे की मी माझ्याकरिता नसून समाजाकरिता आहे. आता प्रत्येक घरात, गावात सातत्याने प्रार्थना चालली पाहिजे. माणसाने असे म्हणू नये की माझ्या बायकोने प्रार्थना सोडली म्हणून मीही सोडली. लोकांनी असे म्हणू नये की प्रचारक येत नाही म्हणून प्रार्थना बंद पडली. आता कोणी येवो की न येवो. आपली प्रार्थना सुरूच राहिली पाहिजे. प्रार्थनेचा नंदादीप आता सर्वांच्या घरात व अंतःकरणात सतत तेवत राहिला पाहिजे. त्याचा प्रचार-प्रसार केला पाहिजे. असे काही इंजेक्शन निघाले नाही किंवा असा काही बॉम्ब निघाला नाही की ज्याने हजारो माणसे प्रार्थना करू लागतील. आज तुमच्या घरात उजेड पडावा असे वाटत असेल तर तुमच्या बायकापोरांना प्रार्थना शिकवा. त्यावर संस्कार झाले तर तो धर्मासाठी - देशासाठी प्राण देईल. सैनिक बनेल. हे संस्कार जर झाले नाहीत, तर पोरे तुमच्या सत्कार्याची थट्टा करतील. तुम्हालाच तुमची पोरं हसतील.

रणांगणाच्या शिस्तीचे संस्कार झालेल्या जवानांना मी नुकतीच भेट दिली. त्यातील वीस वर्षाच्या बहाद्दरांनी शत्रूच्या रणगाड्यांना फोडून विजय प्राप्त केला. आपल्या देहाची, प्राणाची पर्वा केली नाही. आपले शिरकमल वर उडून शरिरातून रक्ताची कारंजी उडाली तरी त्याची फिकीर केली नाही. अहो हजारो वर्षे त्याबहाद्दरांची कीर्ती इतिहास गात राहील. तुम्हाला पोरे असतील - होतील, त्यांना तुम्ही चांगले संस्कार देऊन भारतमातेचे सुपुत्र बनवा व आपली व आपल्या देशाची कीर्ती दुमदुमवा.

पहा आज तुम्ही किती शिस्तीत बसला आहात. तुम्ही सर्व खेडवळ हजारो लोक अगदी शांत व एका रांगेत बसला आहात. एवढी शिस्त तुम्हाला कुणीतरी शिकवली म्हणूनच असे तुम्ही बसला? एवढी शिस्त ५० पोलीसांच्याकडूनही निर्माण झाली नसती. बिछाईत तरी किती सुंदर टाकली! कुठे वळी नाही. अगदी एका सरळ रेषेत व त्यात समानता तरी किती सौंदर्याने शोभली आहे.

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

ही व्यवस्था टापटीप जर तुम्ही आपल्या घरातील मुलांना लावली तर तुमच्या घरात प्रार्थनेचा मंगल प्रकाश पडेल आणि त्या सात्त्विक सौंदर्याच्या सुगंधाने तुमचे सारे घर दरवळून निघेल. करा आपल्या घरात आनंद निर्माण. मुसलमान आपली वेळ झाली की नमाज पढतो. ख्रिश्चन आपल्या चर्च मध्ये वेळच्या वेळी प्रार्थना करितो. त्याचप्रमाणे ब्राह्मणापासून तो मांगापर्यंत, अंगोठाछाप माणसापासून तो सुशिक्षितापर्यंत सर्वांनी देशासाठी, आपल्या मातृभूमीसाठी प्रार्थना करावी. कारण आपली मातृभूमी फार श्रेष्ठ आहे. संस्कृतमध्ये म्हटले आहे की 'जननी जन्मभूमिश्च स्वर्गादपि गरीयसी' तेव्हा आता मातृभूमीचे पांग फेडण्यासाठी, तिचे रक्षणासाठी सदैव नीतिमत्तेने सिद्ध राहण्यासाठी प्रार्थना करा. ती मरेपर्यंत सोडू नका. तुम्ही कोणत्याही पंथाचे असा. कोणत्याही धर्माचे असा. पण भारतीय प्रवृत्तीने प्रार्थना करा.

जे प्रार्थनेचे बीज तुमच्यात रूजले ते संस्काराने वाढवा. तुमच्या हृदयात आता प्रेमाचे, पावित्र्याचे, सहकार्याचे, त्यागाचे भाव खेळू द्या. आता पंथापंथाचा झगडा नको. आता पंथ फक्त दोनच. एक देव मानणारा. आम्ही सर्व भारतीय आहोत. आम्ही जेव्हा मैदानावर प्रार्थना करितो तेव्हा त्यात सर्वांना स्थान देतो. गुरुदेवाच्या अधिष्ठानावर सर्व पंथाचे धर्माचे लोक आपापली भावना ठेवू शकतात. आम्ही सर्वांना घेऊन चालू इच्छितो. अल्ला-ईश्वर आम्ही एक पाहतो.

आता आपण शक्तिमान झालो पाहिजे. कारण शक्तीमतांनाच जगात किंमत येते. मनगटात ताकत असेल व प्रार्थनेचा अग्नि प्रज्वलित असेल तर लोक किंमत देतील, नाही तर तुम्हाला किड्या-माकोड्याप्रमाणे चिरडून टाकतील. म्हणून संध्याकाळ झाली की आपल्या घरातील माणसांना घेऊन प्रार्थना करा. उदबत्ती लावा अगर लावू नका. असाल तिथे बसा. बांह्यांगाच्या सोंगाचे मर्म ध्यानी घेऊन वेळ प्रसंगी जशी परिस्थिती असेल तशी उपासना करा. तिच्या उद्दिष्टाकडे जाण्याचा मार्ग स्वीकारा व प्रभूला प्रार्थना करा. हे प्रभू! आमची बुद्धि निर्मल होऊ दे. आमच्या गावाची व देशाची समृद्धि होऊ दे. 'न वाढो धन, न वाढो संतान' परंतु तुझा सहवास घडू दे. कारण धन काही मनुष्याला आनंद देत नाही.

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

प्रार्थना ही तेज निर्माण करणारी अजब शक्ती आहे. याच तेजाने आम्ही साऱ्या जगात चमकू शकू. याच प्रार्थनेच्या द्वारा आम्ही सर्व जगातील महापुरूषांच्या जयंत्या आणि पुण्यतिथ्यांना उजाळा देऊन मानवतेचे मंगलद्वार खुले करू शकतो. या साधना-गुंफेच्या परिसरात बोध घेऊन जा. इथे श्रध्देने रहा. इथे तुम्हाला अनेक योगी पुरुषांचे दर्शन घडेल. आपल्या पदरचे खा, कुणाला एक लोटाही मागू नका, प्रेरणा घेऊन जा. असत्याकडून सत्याकडे जाण्याची, मृत्यूच्या मगर मिठीतून सुटायचे असेल तर अध्यात्माची मस्ती प्राप्त करावी लागेल. वासनेची बीजे जाळून टाकावी लागतील. हे हळूहळू होईल व काळ असा येईल की ह्या जगताकडे तुम्ही लीलामय दृष्टीने पहाल. स्वामी रामतीर्थ-ज्याप्रमाणे 'मै खेलता हूँ होली। दुनिया है गेंदगोली' असे म्हणत होते. त्याप्रमाणेच तुम्ही म्हणू लागाल. देह जाईल पण मी अमर आहे अशी तेजस्वी बाण्याची वाणी तुमच्या कृतीतून बाहेर पडेल. ह्याची साक्ष आपली संतमंडळी देतात. काय संत तुकाराम नाहीसा झाला की, संत कबीराची ओळख लोक विसरले, की ज्ञानेश्वर महाराजांचा ज्ञानदीप मालवला? नाही, हे सारे अमर झाले.

गावाची मंदिरे स्वच्छ करा, त्यात प्रार्थनेचे ठाण मांडा. सेवेची संघटना निर्माण करा, त्यामुळे गावगुंडांना धाक बसवा. दुष्टवृत्तीचे मूळ उखडून फेका. संघर्षाला भिऊ नका. अन्यायाचा प्रतिकार करा. माणुसकीचा धर्म आचरा, मी इतक्या मोकळ्या मनाने कुठेच बोलत नाही. पण हे स्थान आपले प्रात्यक्षिकाचे, परीक्षा देणाऱ्याचे, आढावा घेण्याचे, पुन्हा आपली तपश्चर्या जोमाने चालू ठेवण्याचे आहे. हे काही बद्रीनाथासारखे प्रसिद्ध तीर्थ नाही. तरी पण तुम्ही इथे हजारोच्या संख्येने या कडाक्याच्या थंडीत आला आहात. तेव्हा भारताचे नाव उज्वल करा. त्याच्या संस्कृती धर्माचा ध्वज उंच उंच उभवा. त्याच्या तत्त्वज्ञानाचा अमर ठसा साऱ्या जगावर पडेल असा आपला बाणा ठेवा. गुरुदेव तुमच्या ठिकाणी ते धैर्य ती शांती आणि ती सहनशीलता देवो ही प्रार्थना!

★★★

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

सामुदायिक प्रार्थनेचे प्रयोजन

प्रिय बंधूनो आणि भगिनींनो !

मी विचार केला कीं, दहा-पांच वर्षापर्यंत रोजचे भोजन आणि झोपही बंद करून द्यावी, परंतु हे संभवनीय आहे का?

..... हे केवळ दोन तीन दिवसाकरिताच होऊ शकेल. दैनंदिन व्यवहार आम्हाला करावेच लागतात त्यांत नियमितपणा हा असलाच पाहिजे. अर्थात ही दिनचर्या आमच्या जीवनाला पोषक असावी, शोषक नसावी.

सामुदायिक-प्रार्थना आमच्या दिनचर्येचे एक आवश्यक व महत्वपूर्ण अंग आहे. परिस्थिती नित्य परिवर्तनशील आहे. तीत नेहमी बदल होत असतो. अनेक बऱ्या वाईट परिस्थितीतूनच आम्हाला जावे लागते. परिस्थितीनुसार आमचे विचारही बदलत असतात. परंतु त्या विचारांना योग्य मार्गास लावावयास पाहिजे. त्याचा समतोल राखण्यासाठी साधन आहे समाधान. आणि सामुदायिक जीवनात समाधान तेव्हाच लाभेल, जेव्हा दुसऱ्याशी मानवतेचा, सत्यतेचा, बंधुभावाचा, सहकार्याचा, प्रेमपूर्ण परस्पर पूरक व्यवहार करू शकता येईल. स्वतः जगून दुसऱ्यांनाही जगू द्यावे या तत्वावरच सामुदायिक-जीवन अवलंबून आहे. सामुदायिक जीवन दैवी-शक्तीवर अवलंबून आहे. ही दैवी शक्ती शारीरिक सामर्थ्य किंवा बाह्य सौंदर्यावर आधारित नाही. जीवन जगण्यासाठी बाजारात बळ मिळत नाही. ज्या ठिकाणी महापुरूषांचा संग आहे, गंभीर वातावरण किंवा दैवी शक्तीचे अधिष्ठान आहे. तिथे मन स्थिर करण्याने ते मिळू शकेल. हे बळ, ही शक्ती तू आम्हाला मिळू दे अशी आम्ही गुरुदेवाजवळ रोज प्रार्थना करीत असतो.

हे गुरुदेव! हमको सद्‌बुद्धी दे। सत्कर्तव्य करने की प्रवृत्ति दे। सच बोलनेका अभ्यास दे। सतस्वरुपका ज्ञान दे। ही प्रार्थना, दैविशक्ती प्राप्त असण्याचा आखाडा आहे. प्रार्थना मंदीरात जाऊन आम्ही आमच्या इष्टदेवतेसमोर

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

बसून चिंतन करीत असतो की आमच्या शब्दात आम्हाला बळ दे. चिंतन-प्रार्थना करतांना जितका वेळ मस्ती चढविली असेल, जितका भावनेच्या रंगात रंगून ईश्वराशी तो एकरूप झाला असेल तितकीच त्याला सफलता प्राप्त होईल. तितकेच बळ त्याला प्राप्त होईल. या संबंधी एक छोटीशी गोष्ट मी तुम्हाला सांगणार आहे.

एकदा गुरु नानकजींची एका काजीशी भेट झाली. दोघांच्या बऱ्याच गप्पा झाल्यानंतर काजीनी विचारले, "आपण मंदिरात जावून प्रार्थना करता का? त्यांना उत्तर मिळाले होय! "आपण नमाज पढण्यासाठी आमच्या मशीदीत याल का?

नानकजींनी होकार भरला. काजी नानकजींना आपल्या बरोबर मक्का येथे घेऊन गेले. तिथं नानकजी मशीदीत जाऊन एका जागी बसून भाव-समाधीत मग्न झाले. बरेच मुसलमानबंधूही तिथे नमाज पढण्यासाठी आले. ते सर्व आपल्या प्रार्थना प्रथेनुसार कधी बसत, कधी उठत, आडवे होत, पुनः उठत याप्रमाणे करू लागले. नानकजी ध्यानस्थ एका स्थानी बसून होते. हे पाहून काही मुसलमान बंधूनी काजीजींना विचारले, "यांना कशाला येथे बसू दिलेत"? गुरु नानकजींनी सांगितले मी बसलो नव्हतो नमाजच पढत होतो आणि ज्यावेळी काजीचे मन त्यांच्या घोड्याच्या तुटलेल्या पायाला पट्टी बांधण्यास गेले होते. त्यावेळी मी नमाजच पढत होतो.

त्यांनी काजीच्या मनातील गोष्ट सांगितली. काजीचा अभिमान नष्ट झाला आणि त्यांनी गुरु नानकजींचे पाय धरले.

प्रार्थनेत चित्त रंगविले पाहिजे. गंगेच्या प्रवाहासारखा सतत प्रवाह प्रवाहित झाला पाहिजे. प्रकाशकिरणासारखा त्याचा तार सतत प्रकाशित असावा. त्या प्रार्थनेद्वारे जी शक्ती किंवा विद्युत निर्माण होते त्याला आम्ही आत्मबल म्हणतो. घर्षणाशिवाय अग्नि उत्पन्न होत नाही. तपश्चर्येशिवाय आत्मबळ मिळू शकत नाही. ही त्याच्या पर्यंत जाण्याची पायरी आहे. आमची प्रार्थना दिसण्यास सुंदर होईल, तेव्हाच आत्मबल निर्माण होईल.

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

घरोघरि झाले ब्रह्मज्ञान ।
अनुभव जाणे विरळाची ।।

श्रीसंत तुकाराम महाराज म्हणतात. अनुभव-ज्ञान जर कोणी मला देईल तर त्याच्या द्वारी मी भिकारी बनून राहीन, त्याचा सेवक बनेन.

सामुदायिक प्रार्थनेद्वारे सामुदायिक जीवनाची वेळ आता आपले देशात यावयास पाहिजे. सगळे मिळून राहा. जेथे राहाल तेथील वातावरण सुंदर बनवा. असे वातावरण आम्ही स्वतःच बनवित असतो. तुम्ही येथे सद्भाग्याने आला आहात. स्वतः वातावरण बनवा आणि आपल्या निश्चयाने आत्मबल प्राप्त करा. हा कोणी विशिष्ट संप्रदाय नाही. कोण्या बुवाचा पंथ नाही. ज्याच्या संशोधनाची आवश्यकता होती ती हीच वस्तू. ती टिकवायची असेल तर खऱ्या अंतःकरणाने प्रार्थना करा.

धर्म म्हणजे काय आहे? आमची जिम्मेदारी, जबाबदारी आम्ही इमाने इतबारे पालन करणे याशिवाय दुसरा मोठा धर्म नाही. विश्वासावर अटल राहावयास पाहिजे. निष्ठा पाहिजे. नाहीतर काशी प्रयाग कुठेही जा रस्ता सापडणार नाही. गुरुकुंज आश्रमातील झिबुजी सारखी (आश्रमातील एक निष्ठावंत सेवक) निष्ठा हवी. विश्वास हवा.

एकदा दिंडी निघाली होती. वाटेने चालली होती. आम्ही झिबूजींना सांगितले मध्ये उभे राहा. दिंडी निघून गेल्यावरही ते तसेच उभे राहिले. सायंकाळी झाली. ध्यानयोग-मंदिरात आल्यानंतरही झिबूजी आजूबाजूला दिसले नाहीत. विचारल्यानंतर कळले की त्यांना आदेश न मिळाल्यामुळे ते आता तिथेच उभे आहेत. बोलावणे पाठविले तेव्हा ते आले.

अशी निष्ठा, असा विश्वास असेल तरच ईश्वराची कृपा होते आणि आम्हाला सगळ्यांची सेवा करण्याची शक्ती प्राप्त होते.

★★★

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

सामुदायिक प्रार्थनेचा राजपथ

सामूहिक प्रार्थनेत अनंत शक्ती भरलेली आहे. परंतु ही शक्ती तोपर्यंत साकार होऊ शकत नाही, जोपर्यंत प्रार्थनेचे महत्त्व आमच्या रोम-रोमात भिनणार नाही. प्रार्थनातत्त्व जेव्हा आमच्या रोम-रोमात संचारित होते तेव्हा त्याचा दृश्य परिणाम आमच्या आचार-विचारातही दृष्टिगोचर होतो. जोपर्यंत असे होत नाही, तोपर्यंत प्रार्थना खऱ्या अर्थाने आमच्या अंतःकरणात प्रवेश पावली; असे कदापि म्हणता येणार नाही.

आपण रोज भोजन करतो व त्याचे पचनें-द्रियामार्फत पचन झाल्यानंतर रस, रक्त, वीर्य व नंतर ओज बनते. यावरून एखादा बिमार व्यक्ती जर असे विधान करू लागला की, मी तर रोज यथेष्ट भोजन करतो; मग का नाही माझ्यात चालण्याबोलण्याची शक्ती येत? तर यात त्याचे भोजन-विषयक प्रगाढ अज्ञानच प्रकट होत नाही का? कारण जोपर्यंत खाल्लेले अन्न पचविण्याची, जिरविण्याची क्षमता त्याच्या अंगी येत नाही, त्याची पचनेंद्रिये जोपर्यंत कार्यक्षम होणार नाहीत, तोपर्यंत त्याने सोने जरी खाल्ले तरी त्याचा काही उपयोग होणार नाही. उलटपक्षी हेच अन्न विषात परिवर्तीत होऊन त्या रोगी इसमास अपायकारक ठरेल. प्रार्थनेचेही असेच आहे.

रोज नियमितपणे वरवर प्रार्थना करीत गेल्याने ती सिद्ध झाली असे हटकून म्हणता येणार नाही; तर प्रार्थना हृदयाच्या गाभाऱ्यात खोलवर शिरली पाहिजे, जसे क्षय, मलेरिया आदि रोगांचे शरीरातून समूळ उच्चाटन होण्याकरिता त्यांचे जंतू मुद्दाम इंजेक्शनादि द्वारे शरीरात टोचून घ्यावे लागतात, त्याच प्रमाणे प्रार्थनेचे जंतू, त्याचा कीडा जोपर्यंत आपल्या शरीरात निर्माण होणार नाही तोपर्यंत माणसाचे प्रवृत्तिमूलक दोष नाहीसे होणे अशक्यप्राय आहे.

माणसाला जीवनातील एखादी गोष्ट प्राप्त करून घ्यावयाची असल्यास तिच्या प्राप्त्यर्थ त्याला पागल व्हावे लागते. त्या गोष्टीचा सारखा निदध्यास

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

करून नाना प्रयत्नांनी तो ती गोष्ट प्राप्त करतो. तसे करण्यात त्याला एक प्रकारची कार्यनशाच झालेली असते. तद्वत्च प्रार्थनेची फलश्रुति होण्याकरिता आपणास पागल व्हावे लागणार आहे. प्रत्यक्ष आचरणाने प्रार्थनेची तत्त्वे जेव्हा मनुष्य आपल्या गळी उतरवितो तेव्हा प्रार्थनेचे रक्त त्याच्या नसनसात संचारित होते व मग कुठे त्याच्या प्रार्थनेला ज्ञान-भक्ति-वैराग्याचा फुलार येतो. असे झाले म्हणजे मनुष्य व प्रार्थनामय जीवनाची त्यातून निर्मिती होते व त्यातूनच सामुदायिक जीवनाची सद्प्रेरणा निर्माण होऊन मानवी जीवनाची शाश्वत व अपरिवर्तनशील मूल्ये मानवाच्या हाती लागतात.

प्रार्थनेद्वारा माणसाची एकदा अशी अवस्था झाली म्हणजे त्याचे बोलणे, चालणे, हसणे, खाणे-पिणे आदी सर्व प्रार्थनाच जणू बनते.

माझ्या मित्रांनो! प्रार्थनेचा वरील महान उद्देश आपल्या नित्य नजरे समोर ठेऊन जर आपण प्रार्थना कराल तर 'याची देही, याची डोळा' आपण या मानवी-देहाचे सार्थक करू शकू व हा ईश्वर-प्रदत्त देह ईश्वराच्याच कामी अर्पण करण्याची सद्बुद्धि तेव्हा आपणास होईल.

ईश्वराचे स्वरूप अत्यंत व्यापक आहे. तो अनन्त, अगोचर, एकमेवाद्वितीयम असा आहे असे वेदान्तांनी त्याचे वर्णन केले आहे. हे अनंत ब्रह्मांड व्यापून तो दशांगुले उरला आहे - एवढी त्याची व्याप्ती आहे, विशालतेचा वारसदार आहे. परंतु असे असून त्याचा केवढा दैवदुर्विलास आहे की, माणसाने स्वतःला आपल्या सीमित दृष्टिकोणामुळे संकीर्ण करून ठेवलेले आहे. हा माझ्या जातीचा, ह्रा माझ्या धर्माचा, हा माझ्या देशाचा आदी मनोवृत्तीमुळे माणसाने आपल्या पवित्र जीवन-नदीच्या प्रवाहाला रोखून अनेक कल्पित डबके निर्माण केलेले आहेत. त्याचा परिणाम त्याच्या जीवनावर जो व्हायचा तोच होत आहे.

नदीतील पाणी आटल्यावर जशी डबकी निर्माण होऊन त्यात विषाक्त व रोगोत्पादक कीटाणू निर्माण होतात त्याचप्रमाणे माणसांच्या संकुचित विचारामुळे त्याच्या जीवनातील सद्विचारांचे प्रवाह आटून सुकून जातात व मग नाना तऱ्हेच्या संकुचित धोरणाच्या कीटाणुमुळे त्याचे जीवन-

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

स्वास्थ्य नष्ट होते. ही स्थिती जाऊन प्रार्थनेची खरीखुरी फलश्रुति जर प्राप्त करून घ्यावयाची असेल तर माणसाचे समस्त व्यवहार प्रार्थनामय झाले पाहिजेत. म्हणजे ही सर्व चराचर सृष्टी माझ्या आत्म्याचे प्रति स्वरूप आहे; या ज्ञानगर्भ जाणीवेतून त्याचे जीवन-संबंध निर्माण झाले पाहिजेत.

एकदा सामूहिक प्रार्थनेद्वारे माणसात अशी दृष्टी निर्माण झाली म्हणजे तो कोणत्याही संकुचित विचार-धारणेत गुरफटून न राहता, साऱ्या विश्वाशी प्रेमाचे सख्यत्वाचे संबंध प्रस्थापित करतो. कारण 'अखिल विश्व मंदिर माझ्या आत्ममूर्तीचे' ही त्याची अनुभूती असते. असा पुरूष मग विश्वाचे प्रतिनिधित्त्व करू लागतो. महाराष्ट्र - संत तुकारामांना स्वतःचा संसार स्वतःचा नाही वाटला. समाज व राष्ट्राच्याही पलिकडे त्यांचा आत्मभाव एवढा व्यापक झाला होता की त्यांना सर्व विश्व आपले स्वरूप वाटत होते व म्हणूनच त्यांनी आपला संसार हा विश्व-संसार कल्पिला होता नि त्यालाच सुखी करण्याचा मनोमन संकल्प करून त्याप्रमाणे त्यांनी आपले जीवन-कार्य चालविले. "अवघाची संसार सुखाचा करीन; आनंदे भरीन तिन्ही लोक" - ही त्यांची विश्व-मंगल प्रतिज्ञा होती. भारत देशाच्या या संतपरंपरेने संपूर्ण जगाला विश्व-बंधुत्वाच्या स्नेहधाग्यात गोवण्याचे प्रयत्नामुळे ज़गाला-समृध्दीचा मार्ग त्यांनी दाखविला. ही शक्ती या प्रार्थनेमुळेच तर त्यांच्यात येऊ शकली! एवढी प्रचंड शक्ती जगातील कोणत्याही वस्तूत नाही.

अशी ही सामुदायिक प्रार्थना आपण रोज करतो. अर्थात् वर सांगितल्याप्रमाणे ती ज्यावेळी आमच्या रक्ताच्या कणाकणात भिनेल, त्यावेळी आपणात जी शक्ती निर्माण होईल तिचे वर्णन करणे, ईश्वराच्या विराट-स्वरूपाप्रमाणेच कठिण आहे.

काही लोक विचारतात - "महाराजजी! पुरे दस वर्षोसे प्रार्थना करते आया हूँ मैं; किन्तु मुझमें कुछ भी बदल नहीं." माझे यावर असे उत्तर आहे, "भल्या माणसा! पोपटाप्रमाणे प्रार्थनेचा उच्चार करण्यात काय स्वारस्य? प्रार्थनेचा मनुष्याच्या चित्त-वृत्तीशी निकटचा संबंध असल्यामुळे जोपर्यंत वृत्ती अंतर्मुख होणार नाही तोपर्यंत उपड्या घागरीवर पाणी टाकून काय निष्पन्न

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

निघणार बरे?"

तेव्हा वर सांगितलेच आहे की, प्रार्थना विश्व-मानव बनण्याची एक मोठी पाठशाळा आहे. परंतु अशी साधना व दृष्टी प्रार्थनेच्या निदध्यासानेच प्राप्त होऊ शकते. म्हणून म्हणतो की प्रार्थना समजून-उमजून करा. त्यातील अर्थ व बोध लक्षात घ्या व त्याप्रमाणे आपले जीवन घडविण्याचा अहर्निश आटोकाट प्रयत्न करा.

प्रार्थनेतून प्राप्त होणारी जी विशालता आहे, तिचेच दृश्य स्वरूप 'हे विश्वची माझे घर' - या अनुभूतीद्वारे प्रगट होते. ही विश्वतादात्म्यताच माणसाचा खरा धर्म होय व म्हणूनच मी मानव-धर्माचा पुरस्कार करीत आलो आहे. वैष्णवांचा धर्म सांगताना श्रीसंत तुकाराम महाराजांनी हेच ना सांगितले की, 'विष्णुमय जग, वैष्णवांचा धर्म भेदाभेद भ्रम, अमंगळ!' धर्माची केवढी विशाल व संयुक्तिक व्याख्या त्यांनी केली. 'विष्णु-मय' जगाची अनुभूती म्हणजेच वैष्णवांचा धर्म! धर्माची यथार्थ व्याख्या यापेक्षा आणखी कोणती असू शकते. या धारणेने प्रेरित होऊन, मग आपण कोणतेही कर्म करीत असलो तरी ती एक प्रकारची भगवदोपासनाच होय, यालाच प्रार्थनामय कर्म असे म्हणतात. या कर्मापासून मुक्ती नाही मिळणार तर आणखी काय मिळेल?

या संदर्भात महाराष्ट्रीय संतांची कर्मदृष्टी मोठी अभ्यसनीय आहे. संत-सावता माळी, गोरा कुंभार व सेना न्हावी आदी संतांनी प्रत्यक्ष ईश्वर-दर्शनाचा योग दूर सारून आपले कर्म निरंतर सुरू ठेवले व त्यातूनच त्यांना ईश्वर प्राप्त झाला; नव्हे ईश्वरालाच त्यांचे घरी स्थानबद्ध होऊन दर्शन देण्यासाठी त्यांच्या फुरसतीची वाट पाहावी लागली. भक्त पुंडलिकांचे उदाहरण किती रोमांचकारी आहे. त्याची मातृ-पितृ सेवा बघून प्रत्यक्ष विठ्ठल त्याला दर्शन देण्यासाठी उभा ठाकला. पण तिकडे त्यांचे लक्षच गेले नाही. ईश्वरालाच उलट 'मी प्रसन्न झालो' असा डंका पिटवावा लागला, तरीही पुंडलिकाचे सेवा-कार्य चालूच! अतिथी-सत्कार म्हणून त्याने ईश्वराच्या रोखाने एक वीट त्याच्चे पुढे भिरकाविली मात्र. आजतागायत तो विठ्ठल त्या

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

वीटेवर उभा राहून प्रसन्न मुद्रेने पुंडलिकाची जणू वाट पाहत आहे व भक्तासाठी त्याला तसेच व तिथेच उभे राहावे लागणार आहे.

श्रीसंत सावता माळ्याचेही उदाहरण असेच मार्मिक आहे. ''कांदा मुळा भाजी; अवघी विठाबाई माझी'' - या भक्तीसिद्धांताने प्रेरित होऊन त्यांनी पंढरपूरच्या विठोबाचे दर्शन टाळून आपल्या शेत-मळ्याचीच रखवाली केली. शेतीतील उत्पादन शत पटीने वाढविण्यासाठी सावंता माळ्याची कोण धडपड! आपल्या गावात राहणाऱ्या अनेक भगवंतांना त्यांना धन-धान्य पुरवावयाचे होते. स्वतः पुरतेच त्यांचे कार्य मर्यादित असते तर आपल्या मळ्याची हेळसांड करूनही त्यांना पंढरीची वारी करता आली असती. कारण स्वतःस उरून पुरेल असे धान्य त्यांच्या या हेळसांडी मुळेही त्यांना पिकले असते. परंतु त्यांची स्वतः पुरतीच सीमित दृष्टी नव्हती. त्यांना हे धान्य राष्ट्राकरिता निर्माण करावयाचे होते व त्यात चूक करणे म्हणजे राष्ट्र-विघातक व मानव-विघातक कर्म त्यांच्या हातून घडणार होते; याची त्यांना पूर्ण जाणीव होती.

आज आपणास माहित आहेच की, 'अधिक धान्य पिकवा' चा कंठशोष होऊनही आज इकडे प्रामाणिकपणाने किती लोकांची दृष्टी लागलेली आहे!

तात्पर्य हेच की जोपर्यंत आत्म्याच्या विशालतेचे आकलन व भान होत नाही, तोपर्यंत माणूस आपल्या हीन-कर्मापासून परावृत्त होणे कठिण आहे. त्यासाठी त्याला सामुदायिक प्रार्थनेचे तत्त्व आत्मसात करणे, हाच राजमार्ग आहे.

★★★

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

सामुदायिक प्रार्थनेची आवश्यकता

सध्या चालू असलेली 'उपासक' म्हणवणारांची स्थिती अशी आहे की, जो तो आपल्या वैयक्तिक स्थानाकरिता व मोठेपणाकरिता धडपडत आहे. भक्तीलाच नव्हे तर समूळ धर्मालाच ऐहिक क्षुद्र कमाईच्या धंद्याचे स्वरूप कित्येकांच्या दृष्टीने प्राप्त झालेले आहे. देवळांचा उपयोग व्यापारीदृष्टीने केला जात आहे. या एकूण परिस्थितीमुळे लोक भरमसाटपणे अवास्तव मार्गांनी बहकले जात आहेत. वरपंगी पाहता लोक भक्तीभावाला एवढे चिकटलेले जरी दिसत असले, तरी त्यातून प्रसंगाकरिता म्हणजे भक्तीच्या शुद्धतत्त्वाच्या कसोटीची वेळ आली असता किती कामी पडतील, हाच मोठा जबर प्रश्न समोर येऊन पडतो.

नाही नाही म्हटले तरी आजही शेकडा ९० लोक आपल्याला असेच समजत आहेत की, "आम्ही आपल्या संप्रदायाप्रमाणे ठीक आहोत. दुसऱ्याचे आम्हाला काय करावयाचे आहे?" परंतु एवढेही त्यांच्या लक्षात येत नाही की, 'मला काय त्याचे?" याचा अर्थ हाच ना की, "आमच्याकरिता लोक मेले तरी चालतील परंतु आम्ही कोणाचीही पर्वा करणार नाही. जे आमचे आहे तेच खरे". जिकडे तिकडे अशी ही अंदाधुंदी थैमान घालून राहिली आहे. काहूर माजलेले आहे.

अगदी सरळ विचार केल्याने कुणाच्याही विचारी मनास असेच वाटेल की, आज आपल्याला या धर्म-भक्तीचा फायदा किंवा परिणाम आपल्या मानवी वृत्तीला अनुसरून मानव्याला साजेसा व पोषक असा व्हावयास पाहिजे आहे. सर्व विश्वाच्या दृष्टीने जरी तो जमत नसला-इतका व्यापक होऊ शकत नसला, तरी त्याची जी प्राथमिक भूमिका आहे, अर्थात् आपल्या देशाच्या राष्ट्रधर्माच्या दृष्टीने जी एकसूत्रता व्हावयास पाहिजे आहे तेवढी जरी झाली तरी फार उत्तम. निदान आम्हाला एवढे तरी समाधान मानता येईल की, 'हिन्दू' या नावाने का होईना, परंतु आम्ही इतके लोक तरी कार्याकरिता असे जुळू शकतो की जेथे जात, पंथ, संस्था इत्यादी भेदाभेद शिवू शकत नाही.

या व्यतिरिक्त दुसऱ्या कोणत्याही ठिकाणी याहून कमी प्रतीच्या भावनेने जुळता येणे शक्य नाही व तेवढे हितकरही होणार नाही. जेथे

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

धर्मविचारावरील श्रद्धेच्या बळावर देवासमोर सर्व ऐक्याच्या भावनेने वागू शकत नाहीत, तेथे कोणत्याही अन्य मार्गांनी लोक आपल्याला खरोखर एक समजतील असे मला वाटत नाही. कारण, एक होण्याची कल्पना - 'आमचा धर्म एक' 'आमचा देव एक' 'आम्ही सर्व एकाच प्रभूची लेकरे व एकाच भूभागातील रहिवासी - यावरच अधिष्ठित आहे ना? परंतु येथेच जर अनेकत्व किंवा भेदभाव दिसू लागला तर मग 'एकी करा, एकत्व पहा' ह्या कल्पना केवळ स्वप्नासारख्याच निष्फळ भराऱ्या मारीत राहतील, हे उघडच आहे.

प्रिय सज्जनांनो! जेथे जगातील भौतिक शास्त्रांच्या संशोधनाची परिसीमा झालीसी वाटते, तेथील लोकांना तरी 'आपण सर्व माणसे एकच आहोत'' अशी भावना शिवलीसी दिसते का? आणि जर शिवली असती तर आपल्या अनावर तृष्णेच्या-आसुरी महत्वाकांक्षेच्या भरात आपल्याच मनुष्यजातीवर राक्षसासारखे तुटून पडून त्याचे रक्त पिणे अमृतवत् कशाला मानले असते? हा सर्व आपल्या उच्चतम विकासाचा परिणाम, की आपल्या वृत्तीची ही नीचतम अधोगती समजावी? जेथे आमचे पूर्वज देवाजवळ अशी प्रार्थना करीत की -

"सर्वेऽत्र सुखिनः सन्तु सर्वे सन्तु निरामयः ।
सर्वे भद्राणि पश्यन्तु मा कश्चिद्दुःखमाप्नुयात् ॥"

तेथे आम्ही असे जपत आहोत की, "देवा! माझ्या सुखाकरिता माझे संपूर्ण गाव जरी बळी पडत असेल तरी चालेल, पण मी तुझा भक्त म्हणून तरी मला दुःख देऊ नकोस" असे प्रार्थण्यापर्यंत आमच्या अज्ञानाची व स्वार्थी वृत्तीची मजल पोहोचली आहे. अशा पतन पावलेल्या परिस्थितीचा अजूनही आम्ही विचार करून, जर धर्माने आणि उपासनेनेही आपल्याला एक समजू शकलो नाही, तर आमच्या सहित आमच्या वाढत्या पिढीचे पाप माथी घेणारे आम्ही बहाद्दरच नाही का समजले जाणार?

ह्या सर्व बाजूचा विचार लक्षात घेऊन, आमच्या कुलदेवतांना जरी आम्ही स्पष्ट "तुम्ही सर्व देव एक नाही का?" असे म्हणू शकत नाही, तरी निदान आमच्या एकधर्मीय म्हणवणाऱ्या लोक वेदान्ताच्या, राष्ट्र धर्माच्या, निदान मनुष्य-वृत्तीच्या पहिल्या अवस्थेच्या उन्नती-मार्गावर सक्रियतेने चढून, सर्व प्राणिमात्राला व्यापून राहणारी आमची दृष्टी सामुदायिक प्रार्थनेच्या रूपाने प्रभूसमोर ठेवीत आहोत, एवढे जरी सक्रिय प्रार्थनेच्या क्रमपद्धतीने आम्ही

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

दाखवू शकलो, तरी माझ्या मायभूमीच्या अभ्युदयात भर पडली आणि निःश्रेयस महामंत्राच्या खऱ्या अर्थास सुरुवात झाली, असे मी मनोभावे समजेन.

माझ्या प्रिय हिंदु समजणाऱ्या सद्गृहस्थांनो! तुम्ही याचा दूरवर विचार करून जर बघाल ना? तर आता चाललेले भक्तीचे मंत्र हे फुटक्या नावेप्रमाणे नदीच्या तळाशी घालण्याच्या तयारीला लागले आहेत, असेच तुम्हाला समजून आल्याशिवाय राहणार नाही, असे मला वाटते. तुम्ही जरी आज मुजोरीने कसेबसे नाकारीत असला, तरी याच्या परिणामस्वरुपी भावी काळाची आठवण होताच असे वाटते की, लोक घरोघर आचरणाशिवाय आपल्यास साधू समजतील, प्रत्येकाचा पंथ निराळा निघेल व कुणी कुणाचे मत घ्यायला तयार होणार नाही. केवळ रूढ मार्गानेच अंधानुकरण करीत गेल्यास असे होणार हे निश्चित व त्यात ढवळाढवळ करावयाला नको हा तर आपला स्वभाव! त्यामुळे असे मत स्वातंत्र्य बोकाळले की मग शिष्य कोण पहावा याचीच अडचण भासून, लोक आपसात नसते तर्क लढवून विद्वान म्हणवतील नि 'गाढवांचा गोंधळ' झाल्याशिवाय राहणार नाही. असे खात्रीने होईल व आजही या गोष्टीचीच भरभराट जोरात चालू आहे.

मनुष्य जेव्हा 'लोक माझ्याकडे अधिक वळावेत' असे स्वार्थबुद्धीने मनात आणतो, तेव्हा तो कुणाचाही दोष न सांगता 'तुम्ही समजाल तो न्याय, तुम्हाला आवडेल तोच धर्म, तुम्ही जेवाल तेच अमृत, तुम्ही जिच्याकडे पहाल तीच तुमची भोग्य वस्तू, तुम्ही जे मागाल त्यावर तुमची मालकी' असेच प्रतिपादन करतो आणि कोणतेही साधक बाधक नियम न सांगता "सर्व मार्ग मनुष्याकरिता मोकळे आहेत" असे भरमसाट सांगण्यातच लोक आपणाला मोठे समजतील असे तो मानतो, असल्या कृतीचा परिणाम असा होणे स्वाभाविक आहे की, प्रत्येक जण आपल्या मनाने आपणास सोयीचा तो मार्ग काढू लागेल व तसे होताच 'लाथांचा सुकाळ' झालाच म्हणून समजा!

सामुदायिक प्रार्थना म्हणजे काही कथापुराण नव्हे, की 'समाप्तीला गेले की सर्व फळ मिळेलच' असे समजून फक्त प्रसादाकरिताच जमावे. अथवा असेही उपयोगी नाही की, ज्याने यावे त्याने घोर किंवा पंचमस्वरात आपला आवाज काढून मनास येईल त्या देवाच्या नावाने वाटेल त्या रंगात ओरडावे नि 'झाली आमची प्रार्थना' म्हणून निघून जावे. अशा प्रकारचे गैरशिस्त किंवा

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

ऐक्यविनाशक वर्तन मात्र मुळीच चालणार नाही.

सामुदायिक प्रार्थना म्हणजे सर्वांनी एक होऊन आपले आदर्शानुसारी भाव सर्वशक्तीमान अशी प्रभूजवळ मांडण्याची एक मानवोचित पद्धती! मानसिक शक्ती व शांती मिळविण्याची एकमेव उत्कृष्ट कवायत!! साधारण भौतिक-शास्त्र मान्य अशा शारीरिक कवायतीपेक्षाही अति दक्षतेची ही कवायत आहे. ती भौतिक कवायत फक्त बाहेरच दाखवावयाची असते, परंतु सामुदायिक प्रार्थनेची कवायत अंतरंग व बहिरंग अत्यंत स्वच्छ व सरळ ठेवून करावयाची असते.

वैदिक कालापासून तो आतापर्यंत ज्या ज्या वेळी साधुसंतांनी काही नवीन नियम रूढ केले, पूर्वपद्धतीत परिवर्तन केले, ते ह्याच करिता की, त्या शुद्ध सामुदायिक प्रार्थनेच्या तत्त्वावर रूढिरूपी काळोख पसरून आतील शुद्ध तत्व लोपले जाऊ नये. जेव्हा जेव्हा अत्यंत अवनत काळ आला, तेव्हा तेव्हा भगवंताच्या सामुदायिक प्रार्थनेला उत्तेजन देण्याचेच कार्य श्रेष्ठ महात्म्यांनी केले व त्यातच भगवत् शक्तीचा उदय झाला, अशी वर्णने अनेक ग्रंथातून आढळतात. आजही जर त्या संतश्रेष्ठांच्या कार्याचा आमच्या सज्जन समाजाने विचार केला तर असेच कळून येईल की, आम्हा लोकांना या अंधःकारातून यापुढे संघटितपणे सर्वांच्या उन्नतीचा व सामुदायिक प्रार्थनेचा मार्ग स्वीकारलाच पाहिजे. त्यामुळे आमच्या पूर्वकालीन संतांच्या सद्हेतूला कलंक न लागता राष्ट्रधर्म व मनुष्यधर्म यास उजाळा मिळून ऐहिक व पारमार्थिक उन्नती होऊ शकेल. हाच भाव डोळ्यासमोर ठेवून मी आपणास सामुदायिक प्रार्थनेकरिता उत्तेजित करीत आहे.

प्रिय वाचकांनो! वाचन करीत असताना याचा विचार दृढ होऊ द्या, नि आपल्याला गावी सामुदायिक प्रार्थनेचे शुद्ध बीज पेरून त्यातून अत्यंत उत्कृष्ट अशा अभ्युदय निश्रेयस् फळांना प्राप्त करा. "दुसऱ्यांना त्रास न देता, आधी स्वतः उत्तम होऊन सर्व जगाला उत्तम करू" (कृण्वन्तो विश्वमार्यम्) ही संतऋषींची तत्त्वप्रणाली विसरू नका. एवढीच माझी तुम्हा हिंदवासियांना कळकळीची नम्र सूचना आहे.

★★★

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

सैन्याला प्रार्थनेची काय गरज?

"मामनुस्मर युद्धयच"

रणमैदानात की प्रार्थना मंदिरात

माझे काही मित्र विचारतात की, "प्रार्थनेशिवाय सैनिक विजयी होऊ शकणार नाहीत काय? सैनिकांना आघाडीवर लढण्यास नेण्यापेक्षा त्यांना प्रार्थनामंदिरात प्रार्थनेस बसविल्यास राष्ट्र सुरक्षित राहू शकेल काय? केवळ प्रार्थनेने लोक विजयी व उन्नत होऊ शकतील काय?" या प्रश्नातील खोच ध्यानी घेऊन मी उलट असे विचारू इच्छितो की सैनिकांऐवजी गधे घोडे वा बैलरेडे रणांगणावर सोडले तर रणांगणाची शोभा वाढून विजय मिळणे शक्य नाही काय? आणि नसल्यास त्याचे कारण त्यांच्यातील विशिष्ट ज्ञानाचा अभाव हेच नव्हे का? यापुढे जाऊन असेही म्हणता येईल की फक्त लढण्याचेच ज्ञान असणारे सैनिक तुम्हाला चालतील की 'लढावयाचे कां' या विषयीचे ज्ञान असणारे सैनिक तुम्हाला हवे आहेत? तसेच 'पोटांकरिता काही केलं तरी चालेल' अशा मताचे सैनिक तुम्ही पसंत कराल की करण्याचे वेळी सुद्धा कर्तव्यनिष्ठा कायम ठेवून, स्वदेशावर अन्याय करून कुरघोडी करणारास सुधारण्याची खटपट करण्यात प्राण गेले तरी आनंदच मानून लढणारे सैनिक तुम्हाला पाहिजे आहेत? तुमच्या देशाकरिता लढणारे पण दुसऱ्या ईमानदार देशालाही लुबाडून "त्राही भगवान" करून सोडणारे अर्थात् 'सर्व जगास तुम्ही आघाडीवर पाठवणार काय की ."आमची लढाई देश जिंकण्यासाठी नसून ती अन्यायाने मानव्यावर आघात करणाऱ्यावर स्वकीय परकीयांच्या जुलमी सत्तेला हाणून पाडण्याकरिता आहे" या भावनेने भारलेल्या सैनिकांची तुम्हाला गरज आहे? तुमची लढाई ही स्वतःच्या सुखाकरिता की विश्वाच्या शांतिसाम्राज्याकरिता? ती देश-विदेशासाठी, विशिष्ट जातिसंस्था व आकुंचित धर्मपंथासाठी की जगात सज्ज न्यायाला उच्चपदी स्थापण्यासाठी? ती जर सत्य न्यायासाठी असेल तर तुम्ही सैनिकांना चारित्र्यवान बनवून लढविणार की स्वतः अन्यायी असूनही न्यायाच्या प्रस्थापनेसाठी आघाडीवर पाठविणार? तुम्हाला जर उच्च ध्येयाने प्रेरित होऊन युद्ध हाताळावयाचे असेल तर सैनिकांनाही ते ज्ञान द्यावे

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

लागणार नाही काय? 'आम्ही लढाई का करावयाची व ती आम्ही करणार की ईश्वरच करवून घेणार? आम्ही निमित्तमात्र आहोत की जबाबदार मालक? हे कार्य आमचे की देवाचे-देशाचे?'' याचे ज्ञान सैनिकांत भरल्याशिवाय ते कृतीत कसे येईल? अर्थात् ही शक्ती सैनिकात भरावयाची तर त्यांना हेही सांगावे लागेल की जग हे कशासाठी देवाने निर्मिलेले आहे? त्यात त्याचा उद्देश ''सर्व लोकांनी सुखी व्हावे'' हा आहे की काहींनी बरे व काहींनी वाईट रहावे' असा आहे? देव जर ते इच्छीत नाही तर जगात अशी विषमता निर्माण करणारा कोण आहे व तो तसे कोणत्या आधारावर अधिष्ठानावर करतो? हे सर्व जर सैनिकांना सांगावयाचे तर त्यासाठी त्यांना एका प्रशांत मैदानात बसवून सात्विक वातावरणात स्थिर करायला नको का? त्यांच्यातील आकुंचित वृत्ती घालवण्यासाठी त्यांच्यात सामुदायिकत्त्व आणायला नको का? आणि त्यांच्यातील लोभ-अहंकारादी विकारांना काबूत घेऊन त्यांच्यात गुणसंवर्धन व चारित्र्यगठण करावयास नको का? दिशाभूल करणारा मद न येवो तसेच निसर्गशक्तीचा पाठिंबा प्राप्त होवो म्हणून एकाग्र मनाने व एकोप्याने, उद्देशपूर्वक सृष्टी रचणाऱ्या महाप्रभूला मदत मागणे अर्थात् नित्यनियमपूर्वक सामुदायिक प्रार्थना करणे ही गोष्ट वरील सर्व कारणांसाठी अत्यंत आवश्यक नाही असे कोण व कसे म्हणू शकेल?

धर्मयुद्धाचे स्वरूप व प्रार्थना

ही गोष्ट मी निश्चयाने सांगतो की सृष्टीचा अंतिम उद्देश व ईश्वरी शक्तीचा पाठिंबा याचे मर्म ध्यानी आल्यावरच युद्धाच्या उद्देशाचे खरे ज्ञान होईल आणि प्रलोभनांनी किंवा भयभ्रांतीने वृत्ती विचलित न होता 'सेवा हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे' याचं भान सैनिकास धैर्याने पुढे नेत राहील. अशा प्रकारचे सुविचारी, सत्यनिष्ठ व सेवापरायण सैनिक पुढारी निर्माण करून मग त्यांना तुम्ही युद्धावर पाठवाल तर ते खरे धर्मयुद्ध होईल, ज्यामुळे जगात शांती व प्रगतीच नादू लागेल. वास्तविक वर्तमानकाळातील युद्धांना 'धर्मयुद्ध' म्हणता येणार नाही. ती राष्ट्रयुद्धे, देशयुद्धे, जातियुद्धे आहेत. अर्थात् स्वार्थ, अभिमान व द्वेष यांची ती प्रगट रूपे आहेत. त्यांचे चालक केव्हाही अपूर्ण बुद्धीचेच समजले जात असतात व त्यामुळेच जगात वैरभाव

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

वाढता राहून शांती, नीती नष्ट होते. तुम्हाला आपल्या सैनिकांकडून त्यांचाच कित्ता गिरवून घ्यायचा आहे काय? हे पक्के लक्षात असू द्या की धर्मयुद्धाशिवाय जगाचे संकट टळत नाही व कोणाचाही धोका मिटत नाही. धर्मयुद्ध नैतिक युद्ध-हे सर्वात मोठे विश्वहिताचे पवित्र युद्ध समजले जाते. कौरवपांडव हे परधर्मी किंवा विदेशी नसून एकाच जातीचे व देशाचे होते; पण त्यांची लढाई जागतिक व धार्मिक कां ठरली? त्याचे कारण, ती लढाई सत्यासाठी-जगाच्या धारणेसाठी होती, हे आहे.

असत्याने मात करून जगावर जुलमी साम्राज्य गाजविणाराला हर प्रयत्नांनी विश्वकल्याणाच्या उद्देशाने हाणून पाडणे हे ईश्वराच्या संकेताला अनुसरून असल्याने ते दैवीयुद्ध समजले जाते. तसेच 'आमच्यात ताकद आहे म्हणून आम्ही तुमचा नाश करू' या धोरणाचे युद्ध राक्षसी युद्ध ठरते. यापैकी तुम्हाला कोणते युद्ध लढवायचे आहे? कारण आजचा काळ हा सर्व तऱ्हेच्या युद्धांना उपलब्ध करणारा असून त्यांची निवड करणे दुरापास्त झाले आहे. तथापि आपल्या विचारानुसार मी इतके म्हणू शकेल की भारतवर्षातील युद्ध हे धर्मयुद्ध होते व राहील. स्वातंत्र्यासाठी, स्वरक्षणासाठी व सत्यस्थापनेसाठी लढणे हेच धर्मयुद्ध! धर्माची व्याख्या हिंदुधर्म, ख्रिश्चनधर्म, मुसलमान धर्म इत्यादी भेद कल्पनेवर आधारलेली नाही. वास्तविक जगात एकच धर्म असून बाकी सर्व त्याचे पोटभेद आहेत. सत्याने जगणे-विश्वबंधुत्वाने नांदणे हाच एकमेव धर्म असून, गटबाजी निर्मून मूठभर लोकांसाठी जगाची धुळधाणी करणे व असत्याने शिरजोरी दाखवणे हाच अधर्म आहे. भारताच्या मानवी जीवनविकासाच्या सर्व गोष्टी परकियांनी ताब्यात घ्याव्यात, त्याचे मार्ग उधळून लावावेत, मातीसारख्या वस्तूचेही संशोधन करून आपले बरे त्यास करता येऊ नये, घराघरातील उपयोगाचे साधे सामानही परदेशातून कर लादून पाठवले जावें आणि इतरत्र पर्वतमय नापिक प्रदेशातील मजूरास जेथे सरासरी १० रुपयाच्या वर मजुरी पडते तेथे भारतवर्षाची सुपीक जमीन हक्काची असणाऱ्या शेत मजूरास सात पैसे मुश्किलीने मिळून मेल्या माणसाप्रमाणे जगण्याची किंबहुना उपासाने तडफडून मरण्याचे पाळी यावी, अशा प्रकारचा अन्याय व जुलूम ज्यांनी केला त्यांच्याशी लढून आपले मानवी हक्क सत्याने प्रस्थापित करणारे लोकच खरे धर्मयुद्ध करणारे नव्हेत का? निरपराधी

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

आबालवृद्धांचे अमानुषपणे बळी घेणे, पतिव्रतांची अब्रू घेऊन धिंड काढणे व आगी लावणे अशी आसुरी कृत्ये करणाऱ्यांपासून सर्वांचे संरक्षण करीत त्यांना शासन करून सन्मार्गावर आणणे व प्रसंगी नष्ट करून समाजधारणा टिकवणे हेही धर्मयुद्धच होय. पण असल्या धर्मयुद्धाकरिता समतोल बुध्दीचे व तारतम्यदृष्टीचे ज्ञान प्राप्त झालेले सैनिक जर तुम्हाला पाहिजे असतील तर त्यांना ईश्वराचा आदेश काय आहे? आपण कशाकरिता जन्मलो, आपली जबाबदारी कोणती, दुसऱ्याशी झगडण्याचा प्रसंग कां आला व बुद्धिहीन व बलहिन बनलेल्या समाजाला या चक्रव्युहातुन पार पाडण्याचा मार्ग कोणता? प्रार्थना ही आपल्या इंद्रियसुखाकरिता की परस्परातील द्वेष नष्ट करून विश्वबंधुत्वाने विश्वशांती स्थापण्याकरिता? इत्यादी सर्व गोष्टींची जाणीव अखिल मानव समाजाला करून देण्यासाठी व स्वतःच्या मार्गाने आपले कर्तव्य पार पाडण्यासाठी सैनिकांसही प्रार्थना करणे जरूर आहे.

प्रयत्न व प्रार्थनेची अविरोध मैत्री

प्रिय मित्रांनो! प्रयत्नाला प्रार्थनेची व प्रार्थनेला प्रयत्नाची जोड हवी. प्रार्थना हा एक उच्च प्रकारचा प्रयत्नच आहे आणि प्रयत्न ही देखील प्रार्थनेची सक्रियताच आहे. प्रार्थनेच्या तात्त्विकतेशिवाय आमचा प्रयत्न आंधळा ठरेल व प्रयत्नशिलतेखेरीज प्रार्थना पांगळी बनेल. प्रार्थनेची ही सर्वांगीणता ज्याला कळली नसेल त्याला विश्वाचे ज्ञान होणार नाही - जीवनाचे कोडे उलगडणार नाही व ज्याला विश्वाचे यथार्थ ज्ञान नाही तो देवाच्या दरबारचा अधिकारी होऊ शकत नाही. त्याला जन्मता व मरता अजून बराच काळ लागेल. आपण प्रार्थनेला प्रयत्नही बनविणारी कां समजता? प्रार्थना का फक्त आयुष्याचा वेळ स्वस्थपणे घालविण्यासाठी आहे? नव्हे, ती तर अधिक चपलतेने आणि 'आम्ही देवाचे आहोत व त्याचे कार्य ते आमचे आहे'' या निश्चयी भावनेने कार्यतत्पर बनविणारी संजीवनी आहे! प्रार्थना करणारा पुरुष जर धर्मयुद्धाच्या प्रसंगी माघार घेईल आणि म्हणेल की, ''मला त्याचे काय? करीना कुणी बेबंदशाही, मरेनात का अन्नावाचून अथवा गुंडांच्या हातून लोक; फोडीनात का आमची मठमंदिरे-मसजिदी नि चर्चगिर्जाघरे; सैनिकांकडून होईना का अबलांवर अत्याचार; आम्ही आपल्या ध्यानात मस्त आहोत आणि आत्मा तर नेहमीच अमर आहे. त्याला पाप लागतच नाही!'' तर असल्या भित्र्या

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

भागुबाईला मग तो महात्म्याचा बाप का असेना - तेव्हाच निषेधून त्याचे हे दुर्वर्तन जाहीर केले पाहिजे, त्याला शहाणे केले पाहिजे. आणि त्याची वृत्ती बदलतच नसेल तर तो धर्मगुरु असला तरी पदच्युत करून त्याची जबान बंद केली पाहिजे; त्याचे जगणे पाप ठरवले पाहिजे व त्याला प्रार्थनामंदिरातून अंधाऱ्या वनात नेऊन सोडले पाहिजे. असा हा प्रार्थनेचा कायदा आहे आणि तदनुसार विचार केल्यास प्रार्थना ही राष्ट्रास सुरक्षित व उन्नत करण्यास वास्तविक समर्थ आहे असेच कोणासही कबूल करावे लागेल. अर्थात् ती प्रार्थना केवळ प्रार्थनामंदिरात बसून केल्यानेच पूर्ण फलद्रूप होणार नाही तर तिची आराधना रणमैदानात किंबहुना जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात न्याय कर्तव्यपालनाच्या दृष्टीने करावी लागेल; असे हे आमचे प्रार्थनेचे तत्त्व आहे.

नैतिक व बौद्धिक उन्नतीची गरज

प्रार्थना ही आपले राष्ट्रधारणेचे व जीवनोन्नतीचे कर्तव्य निर्लोभी-निरहंकारी वृत्तीने व निर्भयपणे करण्याची शक्तीसाधना आहे. नैतिकतेने विश्वाची घडी व्यवस्थित करण्याचाच ती संदेश देते. या धोरणाशिवायच कोणी लढू लागेल तर तो कोणत्या खड्ड्यात जाऊन पडेल, कोणत्या मार्गाकडे वळेल आणि आपल्या बेछूट सैनिकी सामर्थ्याने केव्हा समाजास धोक्यात आणील याचा भरवसा देता येणार नाही; सद्भावना, योग्य बुद्धिमत्ता आणि सच्चरित्रता यांच्याशिवाय नुसती लढाई करण्याची ताकत व ज्ञान असले की झाले, असे समजणे अगदी मूर्खपणाचे आहे. अर्जुनासारख्या महान योद्ध्याची ताकत सुद्धा प्रसंगी कुचकामी ठरली व गीतेच्या संजीवनीनेच ती परत यशस्वी कार्य करू शकली ही गोष्ट विसरता येत नाही. नीतिज्ञानाशिवाय शूरता म्हणजे क्रूरता आहे - सैनिकता म्हणजे पशुता आहे! आपण म्हणाल की प्रार्थनेशिवाय युद्धाच्या आघाडीवर कोणी लढूच शकणार नाही काय? मी म्हणेन, जर कोणी योग्य दिशेने लढत असेल तर त्याने आपल्या सुज्ञ वस्तादाकडून हे समाजशास्त्र समजावून तरी घेतले असावे किंवा त्याचे पूर्वजन्मीचे संस्कार तरी तसे असावेत अथवा तो ज्यांच्या आज्ञेने वागतो त्यांनी नकळत त्याला तसे वळण तरी दिले असावे. पण ज्यांना विश्वाच्या नैतिकतेची कल्पनाच नसेल अशी माणसे कधी बदलतील याचा नियम नसतो. युद्धाच्या आघाडीवर पाठवलेल्या लाखो लोकांना एक प्रभावी देशभक्ताने देशकर्तव्याची जाणीव

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

देऊन काही मिनिटातच पाठवणारांचाच विरोध करणारे वीर बनवले, हे अगदी ताजे उदाहरण भारतासमोर आहे ना? मग काय अर्थ नुसते कोरडे सैनिक आघाडीवर पाठवण्यात? अहो, जोपर्यंत त्यांना आपल्या कार्यातील सत्यत्त्वाची जाणीव होणार नाही, तोपर्यंत त्यांच्या लढण्यात खरा जोश व जिव्हाळा कुठून असणार? म्हणतात ना - "मोले घातले रडाया । नाही आसू नाही माया ।।" अशाने का कार्य होऊ शकते? त्यासाठी उदात्त भूमिकाच तयार करावी लागते आणि आमची प्रार्थना तरी याशिवाय दुसऱ्या कशाकरिता आमच्या ऋषिमहर्षींनी योजिली आहे?

सैनिकाची भूमिका व विश्वधर्माचे मर्म

भगवान रामचंद्रासारख्या दिव्य पुरुषालाही शस्त्राबरोबर शास्त्रदृष्टी ऋषि वसिष्ठाकडून प्राप्त करून घ्यावी लागली. तसेच रावणाशी लढण्याकरिता चारित्र्यवान वानरांचीच योजना करावी लागली. भगवान श्रीकृष्णालाही बलाला बुध्दीची जोड देऊन, युध्दाचे कारण व उद्देश समजावून सांगून अर्जुनाला तयार करावे लागले आणि छत्रपति शिवाजीला सज्जन मावळ्यांकडूनच आपला हेतु सफल करता आला. वास्तविक युद्ध हे कामक्रोधादी विकारांना बळी पडून करावयाचे नसून, मानव्याची विशालता प्रस्थापित करीत असता जे त्याला आड येत असतील, ते मानवसमाजाचेच गुन्हेगार नव्हेत तर देवाच्या मनातूनही उतरलेले असतात. म्हणून त्यांच्याशी विचारपूर्वक लढावयाचे असते. ती शुद्ध विचारदृष्टी प्रार्थनेच्या तात्त्विकतेतून प्राप्त होऊ शकते. प्रार्थना ही एका विशिष्ट समाजासाठी युद्ध करायला सांगत नसून ती विश्वधर्माच्या न्यायाने तुम्हाला आपले जीवन उन्नत करायला सांगते, जगायला व मरायला सांगते आणि तोच खरा मानवधर्म मी समजतो, ईश्वराची योजना करून आम्हाला हेच ज्ञान मागावयाचे असते. आम्हाला, एकाच राष्ट्राला स्वर्ग मिळालेला आवडणार नाही, कारण तो निसर्गाचा नियम नव्हे! जगात जर न्याय नांदावयाचा असेल तर प्रत्येक देशातील बहुमान्य श्रेष्ठजन निवडून, सर्व विश्वाचे सूत्र त्यांच्या हाती देऊन आम्ही विश्वबंधुत्वाने कां नांदू नये? यापेक्षा कोणते तत्त्वज्ञान मोठे आहे, जे यावरही ताण करू शकेल? आमची आध्यात्मिकता ही या अधिष्ठानावर आपली इमारत उभारणारी आहे आणि हे जोवर होत नाही तोवर जगात कायम शांती नांदवणारा बहाद्दर कोणीच

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

होऊ शकत नाही.

आमच्या परब्रह्माची सत्ता ही याच न्यायाने विश्व चालविणारी आहे परंतु दुर्दैव भारतवर्षाचे की त्यात एवढे उदात्त तत्त्वज्ञान असूनही व्यक्तिगणिक पंथमतांनी त्याची शकले शकले पडली आहेत. कारण त्याचा यथार्थ भाव लोकांसमोर मांडणारे महात्मा गांधी सारखे लोक बोटावर मोजण्याइतकेही आज आम्हास दिसत नाहीत व असेलच तर ते तुमच्यावर कुरघोडी करून आपला स्वार्थ साधण्याच्या मागे लागलेले आहेत. पण हे देवाचे ज्ञान नसून मनुष्यकृत आहे व त्यात नेहमी फरक होणे साहजिक आहे; अनेक पंथ पडले ते यामुळेच! मी असे म्हणतो की लोकांच्या कमी बुद्धीमुळे व कमताकतीमुळे त्यांच्यावर आघात झाल्यास होऊ देत पण त्यांची दृष्टी तरी योग्य मार्गाकडे असली पाहिजे. परंतु विश्वाच्या तत्त्वज्ञानाचा योग्य धडा तरी लोकांत समजावला जातो काय? त्यांना आपल्या जीवनाचे तत्त्वज्ञान तरी शिकवले जाते काय? धर्म आमचा, आम्ही शक्तीवान व शक्ती म्हणजे अशक्तावर राज्य करण्याचा परवाना, अशा बुद्धीचा विकास करणारे ज्ञान कोणाला आवडत असले तरी ते देवाच्या उद्देशाचे ज्ञान खास नव्हे! खऱ्या विशाल दृष्टीचे समतेचे व बंधुत्वाचे ज्ञानच सदैव लोकांत रुजवले गेले पाहिजे आणि त्यावरच सैनिकी शिक्षणही आधारले पाहिजे. असे झाल्यास युद्ध सुद्धा विश्वशांतीसाठी उपकारच होईल.

प्रिय मित्रांनो! प्रार्थना हे तत्त्वज्ञान बाणवण्यासाठीच केली जाते व तत्त्वज्ञानच जगात अमर राहणारे आहे. आपापली बुद्धी यांच्यामार्फत पोहचवणे व अनासक्त बुद्धीने कार्य करणे याचीच शिकवण प्रार्थना देत असते. जगातील सामुदायिक प्रार्थना आपल्या विशिष्ट समुदायाच्या-समाजाच्या हिताकरिता, गटबाजी वा जातीयतेकरिता केली जात असेल परंतु सेवामंडळाची सामुदायिक प्रार्थना ही अखिल विश्वाला मानव्य, सुख व न्याय यांचा लाभ होऊन सत्याचा अखंड विजय व्हावा याकरिताच केली जाते. "असेल हरि तर देईल खाटेवरी"असा पंगु प्रार्थना भाव आमच्यात नसून "ईश्वराने आमच्या सत्प्रयत्नाला यश द्यावे आणि त्याला जगास समाधान द्यावयाचे असेल तर याच न्यायमार्गाने देऊन चिरस्थायी शांती प्रस्थापित करावी" अशी प्रयत्नशीलतेची प्रार्थना-दृष्टी आमच्यात आहे. मित्रांनो! मग सांगा, युद्धाच्या आघाडीवर पाठवण्यापूर्वी ह्या

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

प्रार्थनेची दैवी शक्ती सैनिकात निर्माण होण्याची तुम्हाला जरूरी वाटत नाही काय? प्रार्थना ही मंदिरातच नव्हे तर रणमैदानातही सहारा देत फिरत असते व तिच्या आधाराने सैन्याने मिळवलेला विजयच खरा विजय ठरतो, ही गोष्ट तुम्हाला पटत नाही काय? जर हे सर्व तुम्हास मान्य होत असेल तर आधी सर्वांनी सामुदायिक प्रार्थना तात्त्विकतेसह करू द्या व मग कर्म करण्यास तयार होऊ द्या असे मी आग्रहाने म्हणतो. "मामनुस्मर युद्ध्यच" अर्थात् "मला स्मर व युद्ध कर" या भगवान् श्रीकृष्णाच्या गीतावचनांतही हाच ध्वनी दिसून येईल!

★★★

प्रार्थना

हे पूज्य गुरुदेवा! जे लोक तुला शरीराचा, संप्रदायाचा किंवा धर्माचा बांधवडा समजतात, त्यांना तुझ्या खऱ्या अधिकाराची कल्पना आलीच नसावी असे मला वाटते.

तू, व्यवहार आणि परमार्थाची एकरुपता करून देणारा म्हणजे विश्व, माया, जीव आणि ब्रह्म यांचे अभेद रूपत्व दर्शविणारा ज्ञानप्रकाश आहेस, हे समजणाराच तुला यथार्थ जाणू शकला असे मला वाटते. आणि म्हणूनच त्या सर्वांचा तू चालक होऊन त्यांना आपली अभेद-शक्ती दाखव आणि संसार स्वर्ग कर, अशी माझी प्रार्थना आहे.

श्रीगुरुदेवा! जे लोक तुला शुद्ध ज्ञानमय आणि शरीराशी अलिप्त अशी सद्बोधाने प्रकट होणारी एक निरपेक्ष शक्ती समजतात, तेच खरे जाणणारे होत. परंतु तसे न जाणणारेच जगात अपार आहेत.

अशा जाणत्या आणि न जाणत्या - दोघांनाही आपल्या खऱ्या स्वरूपाचे ज्ञान देऊन त्यांच्यातील आकुंचित मतभेदांची भावना नाहीशी कर, एवढीच माझी चरणारविंदी प्रार्थना आहे.

- तुकड्यादास

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

विश्व-मानव निर्मितीचे विद्यापीठ

सामुदायिक प्रार्थना

आज जगातील संपूर्ण दुःखे ही मानव निर्मितच अधिक आहेत. जीवनसंघर्ष आज इतका पराकोटीला जाण्याचे मुख्य कारण म्हणजे माणसाची स्वार्थांध प्रवृत्ती असून या स्वार्थसाधनेपायी माणसाने आपल्या विवेकबुद्धीस संपूर्णपणे तिलांजली दिलेली आहे. आज जर संपूर्ण जग सुखसंपन्न व्हावयाचे असेल तर सर्वप्रथम माणसातील हा विवेक-दीप प्रज्ज्वलित व्हावयास हवा. विवेकाशिवाय वैराग्य उत्पन्न होत नाही. वैराग्य म्हणजे ज्ञानाची परिपक्व अवस्था. एकदा ही अवस्था प्राप्त झाली म्हणजे मनुष्य मानवी जीवनाकडे आत्मवत् भावनेने पाहावयास शिकतो व प्राणीमात्राकडे पाहण्याची ही आत्मवत् दृष्टीच जगातील यच्चयावत् कलह-निर्मूलनाची दिव्यौषधी आहे.

आज जगाची अवस्था अत्यंत विस्फोटक आहे. कधी काय अनर्थ घडेल, हे कोणी सांगू शकत नाही. जागतिक वातावरणही झपाट्याने बदलत आहे. रोज निरनिराळ्या दुःखद घटना कानी येतात. अशा या परिस्थितीत शांततापूर्ण सहअस्तित्वाच्या सिद्धान्ताला संपूर्णपणे फाटा मिळणार की काय, अशी साधार भीती वाटत आहे. प्रत्येक राष्ट्र आज चिंताग्रस्त असलेले दिसत आहे. जगातील विचारवंत आज घाबरलेल्या मनःस्थितीत आहेत. युनोसारख्या आंतरदेशीय संघटनेकडूनही ही स्थिती सावरल्या जाऊ नये; ही अत्यंत भयानक गोष्ट आहे. तसे पाहिले तर हृदयपूर्वक एकत्र आलेल्या दोन व्यक्तीमध्ये सहसा भांडण होत नाही. आज राष्ट्रसंघटनेचा देखावा जरी करण्यात येत असला, तरी ही राष्ट्रे एक हृदयाने एकमेकांच्या सहाय्यार्थ, संगठित मुळी झालेली नाहीत, असे वाटते. कधी कधी वरून-वरून पाहायला ती एकत्र आलेली दिसतात खरी, पण त्यांचे हे एकत्र येणे म्हणजे

'उपर से तो तन मिले, भीतर फाँके तीन!

या प्रकारचे असते.

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

तेव्हा प्रश्न आहे तो हृदयपूर्वक मिळून जगातील जीवनसमस्या सोडविण्याचा. त्याकरिता मानवी मनाची अवस्था एका अत्युच्च पातळीपर्यंत उंचावणे जरूरीचे आहे. मानवी जीवनाचा व्यापक साक्षात्कार होवून जीवमात्राविषयी सदयताच नव्हे, तर आत्मभाव निर्माण झाल्याशिवाय कुणी कुणावर उगाच प्रेम करणार नाही; प्रेम, भूतदया, वात्सल्य आदी शब्द वापरून तो भाव प्राप्त होत नसतो तशा प्रकारची प्रत्यक्ष अनुभूती होणे महत्वाचे असते.

माझ्या मित्रांनो! या जीवनाभूतिचे वास्तविक अधिष्ठान सामुदायिक प्रार्थना हेच आहे. संपूर्ण विश्वातील धर्मात, जो प्रार्थनेचा या ना त्या प्रकाराने आग्रह केल्या जातो. तो पाहून मला समाधान वाटते. आज जगाच्या पाठीवर एकही धर्म नाही, की ज्यात प्रार्थना व उपासनेला स्थान नाही. या संपूर्ण प्रार्थनेतून एक 'विश्व धर्म- प्रार्थना' निर्माण होणे कठीण नाही. तशा प्रकारची प्रार्थना संपूर्ण विश्वात प्रसारित होणे आज आवश्यक आहे. कारण अशा प्रार्थनेतून विश्वाचे कल्याण आपण साधू शकू. प्रार्थनेतील आदर्श तत्त्वामधून मानवास महामानवाची शिक्षा-दीक्षा मिळत राहिली पाहिजे. प्रत्येक माणूस हा अंतर्मुख होऊन मानवी-जीवनाचा सातत्याने अभ्यास करू शकला पाहिजे. या त्याच्या अभ्यासातूनच विश्व-व्यक्तित्व' उदय पावेल. विश्वाच्या कल्याणासाठी विश्व व्यक्तित्वाची माणसेच काही करू शकतात. स्वार्थानी लडबडलेले लोक स्वार्थासाठीच. राष्ट्रगट निर्माण करणारे लोक मानवतेचा सर्वांगीण विचार करूच शकत नाही. मार्ग कोणताही असो, आपणास सर्व विश्वाच्या कल्याणास हातभार लावला पाहिजे - ही प्रामाणिक भावनाच, विश्व-कल्याणाची खरी जननी आहे. आपणास आपल्या अनुकूल कोणत्याही मार्गे शेवटी याच मुक्कामी जाणे आहे. ही गोष्ट प्रथम सर्वांतरी पटली पाहिजे व ती पटण्यासाठीच मी सामुदायिक प्रार्थनेचा प्रचार संपूर्ण विश्वात व्हावा - यासाठी सारखा धडपडत आहे.

जी प्रार्थना प्रत्येकास आपली वाटेल; ज्या प्रार्थनेत कुणाच्याही भावना दुखविल्या जाणार नाहीत, ज्या प्रार्थनेत कुणालाही आपले अभीष्ट चिंतन साधता येईल - अशी सर्वमान्य प्रार्थना शोधीत असता मला जो अनुभव आला, त्या अनुभवाच्या आधारावर मी एक प्रार्थनाविधी भारतात

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

प्रसारीत करीत आहे. या प्रार्थनेचा योग 'विश्वयोग' आहे व विश्वात्मदेव या प्रार्थनेचा देव आहे. विश्वाच्या चालकाला या प्रार्थनेत – 'मुझमें समझ दे विश्व की' - अशी करुणा भाकिली आहे. या भावनेतूनच आम्ही संपूर्ण विश्वाला कवटाळू शकू, प्रेमाने जवळ करू शकू; असा माझा विश्वास आहे एरव्ही आपण कितीही कंठशोष करून विश्वाच्या गोष्टी बोललो, तरी त्यातून विश्वकल्याणाचे काडीमात्रही निष्पन्न होणर नाही, हे उघड आहे.

माझ्या बंधूंनो, या! आपण विश्व-मानव बनू या. या चिंतनाचे तुमचे सर्वच मंगल होईल. त्यासाठी सा. प्रार्थनेच्या आसनावरच आपली वृत्ती स्थिर करावी लागेल. कारण सामुदायिक प्रार्थनाच विश्व मानव निर्मितीचे विद्यापीठ आहे.

★★★

मी सांगतो गुज आपुले, भजने तुम्ही बहु ऐकिली ।
सत्कार्य प्रभुचे घ्या करी, जी वेळ आता पातली ॥
विश्वस्थ माझ्या बंधुनो ! करितो तुम्हा प्रस्तावना ।
उठ आर्यपुत्रा ! झडकरी, कर सामुदायिक प्रार्थना ॥

★

जगताचि ही गति पाहुनी, मम दुःख होई मानसा ।
भांबावल्या सकला मती, चढल्या अहंतेच्या नशा ॥
ऐशा स्थितीतुनि मानवा! धरि धीर अणि करि चिंतना ।
उठ आर्युपुत्रा ! झडकरी, कर सामुदायिक प्रार्थना ॥

★★

हे गाव माझे, देश माझा, राष्ट्र माझे कां करी ?
ही जात माझी, कर्म माझे, धर्मि मी धर्म्यापरी ॥
रे! विश्वची माझे म्हणोनी कां न म्हणशी ? बोलना ?
उठ आर्यपुत्रा! झडकरी, कर सामुदायिक प्रार्थना ॥

★★★

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

बुद्धिवाद आणि प्रार्थना

प्रिय वाचकांनो! कोणत्याही विषयाचा किंवा योजनेचा पूर्ण अभ्यास न करता 'यात काय आहे, त्यात काय आहे' असे भरमसाटपणे बोलणारे शब्दांच्या वाहत्या ओघात किती लोकांची गळचेपी करीत असतात याची कल्पना त्यांना येणे कठीण असते. माझ्या प्रवासात मला तर नेहमी असे कितीतरी लोक आढळतात की जे प्रार्थनेचा केवळ एकांगी दृष्टीने विचार करितात आणि त्यामुळे साशंक होऊन म्हणतात - "प्रार्थनेत काय ठेवले आहे? काय होते त्या प्रार्थनेने? आमच्या हिंदुस्थानात काय प्रार्थना करणारे लोक कमी आहेत! मग का आली अशी दुःखाची वेळ? का मरतात त्या गावची माणसे जेथे प्रार्थना नेहमी होते? का होतात ते भिकारी, ज्यांच्या घरी प्रार्थना अखंड चालते? का होते त्यांना दुष्टबुद्धि ज्याचा मुलगा नियमितपणे प्रार्थनेस जातो?"

ते म्हणत असतात की - "अहो! एवढे कशाला, आम्ही तर एके ठिकाणी असे पाहिले की प्रार्थना चालूच आहे तरी त्या गावातील एका प्रार्थना करणाराच्या घराला आगही लागली मग काय सांगे तुमची प्रार्थना? तिने जर काही गुणच दिसत नाही तर न केलेलीच काय वाईट? आम्ही पहात आहोत की भारतवर्षात कितीतरी देवळे, मशीदी, चर्च वगैरे आहेत शिवाय प्रार्थनावादी कितीतरी पोटपंथ आहेत नि प्रार्थनेचे अधिकारी कितीतरी महाराज लोक, अवलिया, महात्मे व ख्रिश्चनांचे धर्मगुरू आहेत. मग सांगा हिंदुस्थानात काय फायदा झालेला दिसतो त्या प्रार्थनांमुळे? काय बंगालमध्ये अन्नांचा तुडवडा पडला नाही की लोक मेले नाहीत? काय काय नुकसान होण्याचे वाचले तुमच्या प्रार्थनेने? बरे, जे लोक प्रार्थना करीत नाहीत त्यांचं तरी काय वाटोळ झालं आहे? प्रार्थनाच काय पण ईश्वराचे अस्तित्व देखील मानायला जे तयार नाहीत त्यांना काय मूलबाळ नाही, की नोकऱ्या मिळाल्या नाहीत, की जगात मान नाही त्यांचा! सांगा तर तुमच्या प्रार्थनेचा काय परिणाम आहे तो? आणि ज्यात काहीच तथ्य नाही असा उगीच खेळ-खंडोबा करण्यात आपल्या व्यवहार कार्याची महत्त्वाची वेळ व्यर्थ का घालवावी?"

"निदान तुमच्या प्रार्थनेत एवढी तरी शक्ती असावयास पाहिजे होती

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

की, प्रार्थना करीत असता जर कोणी काठी मारली तर ती अधर उडून जावी, बंदुकीची गोळी लागूच नये किंवा प्रार्थना जेवणापूर्वीच केल्यास जेवायचे कामच उरू नये, परंतु असे कुठे दिसले आहे का? आणि यापैकी जर आम्हाला काहीही दिसत नाही तर 'प्रार्थनेमुळे लोक केवळ भिकार नि बेकार बनून आपले विकार पुष्ट करण्याकरता दुसऱ्यावर भार टाकण्यासाठीच हा अविर्भाव आणतात' असे म्हणायला काय हरकत आहे?'' असे म्हणतांना मी कितीतरी लोक पाहिले आहेत. सुशिक्षित बुद्धिवादी किंवा अशिक्षित तर्कशील लोक अश्याच प्रकारची चिकित्सा करताना आढळतात. त्यांच्या मांडणीत थोडा फार फरक दिसला तरी भावार्थ साधारणतः तोच असतो ही एक मनोवृत्ती झाली.

दुसरी मनोवृत्ती अशी दिसते की तेथे विचाराला वावच नसतो. कपाळाला मनमाने भस्मचंदन फासून फक्त "देव-देव" करीत असलेले नि दिवसभर प्रार्थनेचा पोथा वाचीत बसलेले, 'माझे सर्व देवच करील' म्हणून उदासपणे प्रयत्न न करता पडलेले, मुलाबाळापासून तो नोकरीपर्यंत, फोडफुनसीपासून तो इंद्रियरोगापर्यंत, आपला सर्व भार साधुसंतांच्या कृपेवरच घालून बसलेले, असे हे लोक असतात. त्यात त्यांना जेव्हा जेव्हा अपयश येईल तेव्हा तेव्हा ते 'देवाचा आमच्यावर कोप आहे' म्हणून शनिमहाराजांचा शांतिपाठ करून पुन्हा निष्क्रियतेचे भांडार बनलेले दिसून येतात. ज्यांना माणुसकीही कळत नाही व कळवून घेण्याची इच्छाही नाही, अशांना देव सर्व पुरवणार नि हे एकदम स्वर्गाला जाणार, असल्या वेड्या समजुतीचे कितीतरी लोक आढळून येतात.

अशा या गोंधळलेल्या परिस्थितीत 'सत्य काय असावे' याचा भ्रम निर्माण होऊन साधारण लोक संशयात पडलेले दिसतात. कित्येक नुसत्या परंपरेच्या ओघाने कसा तरी कित्ता गिरवीत जातात तर कित्येक 'सब झूठ' म्हणून वेगळाच मार्ग काढू पाहतात. परंतु मला हे कळत नाही की यांची अशी अवस्था कां होते? ती लोकांच्याकडे पाहून होते की मूळचे तत्त्वज्ञान ऐकून? मला तर वाटते कीं प्रार्थनेचे तत्त्वज्ञान जर बुद्धिवादी लोकांच्या निदर्शनास येईल तर त्यांना प्रार्थना करणेच योग्य आहे' असे वाटावयास काही हरकत दिसत नाही. परंतु जर आंधळा हट्ट धरून ते 'देवाच्या व

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

धर्माच्या बाबतीत आम्ही काहीही ऐकावयास तयार नाही' असे म्हणत असतील तर त्यांच्यापुढे असल्या लिखाणाचा अर्थही काहीच होऊ शकणार नाही. हे उघडच आहे.

वास्तविक प्रार्थनेचे तत्वज्ञान तत्त्वज्ञ लोकांनी बुद्धीच्या व कर्तव्याच्या चिकित्सक कसोटीवर घासूनच लोकापुढे मांडले आहे, पण त्याची यथासांग व यथोचित मांडणी करणारे लोकच कमी प्रमाणात असल्यामुळे लोकांना ते कळणे कठीण झाले आहे. माझे मत तर प्रार्थनेविषयी असे व्यवस्थित बनले आहे की या प्रार्थनेकडे कोणत्याही दृष्टीनी पाहिले असता मला या मार्गात उणीव मुळीच दिसून येत नाही, परंतु ती प्रार्थना केवळ लोकात चालू असलेली नव्हे तर प्रार्थनेच्या खऱ्या भूमिकेवरून केलेली प्रार्थनाच खरी धारणा वाढविणारी आहे.

मला सांगा की, कोण मनुष्य उन्नत कार्यांचा दृढ विचार केल्याशिवाय आपला पाय पुढे टाकून यशस्वी होऊ शकतो? जगात असा उन्नत होणारा एकही मनुष्य नसेल की ज्याने आपली धारणामूर्ती पुढे ठेवून तिचे चिंतन केल्याशिवायच आपली उन्नती करून घेतली असेल. त्या धारणाशक्तीला मदत म्हणून, या जगात जे जे आदर्श पुरूष झाले आहेत त्यांची आठवण डोळ्यासमोर ठेवल्याने मनाची वृत्ती त्या उच्चतम कार्याकडे अधिक वळू लागते आणि आपण जीवापाड परिश्रम घेऊन करीत असलेल्या प्रयत्नाला सुलभपणा प्राप्त होऊन जीव निर्भयपणे त्या मार्गाने चालू लागतो. अशाप्रकारे, आपणास ज्या सत्कार्याची जरूरी आहे त्या कार्याच्या मननालाच आम्ही प्रार्थना समजतो. एवढेच की आपल्या आदर्श पुरुषांचे स्मरण करून आम्ही ती कार्यदिशा दृढ करतो व देव न मानणारे आपल्या उत्तम मित्रांच्या विचारसरणीवर अवलंबित असतात.

प्रार्थनेने मरण चुकते, दरिद्रता नष्ट होते किंवा जगात दुःखच येत नाही या अपेक्षेने किंवा भावनेने जे लोक प्रार्थना करितात, त्यांना वास्तविक प्रार्थनेचे मर्मच अजून कळावयाचे आहे असे मी म्हणतो. अज्ञानी लोकांना साखरेचा पुडा दाखवून त्यांच्याकडून नकळत यथार्थ तत्त्वज्ञानाचा मार्ग अनुभवून घ्यावा, या पवित्र उद्देशामुळे थोर थोर पुरुषांनी या बाबतीत सडेतोड उत्तर लोकांना देऊन त्यांचा भ्रमनिरास मात्र केला नाही; हेही खरे आहे. वास्तविक

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

हा विषय प्रार्थनेच्या क्षेत्रातीलच नव्हे की 'आम्हास फक्त प्रार्थनेनेच ऐहिक लाभ मिळावेत. त्याकरिता प्रयत्नांची आवश्यकताच नको.' प्रार्थना ही मानसिक भावावेश वाढवून आपल्या उच्चतर ध्येयाची निश्चिती शरीरात जागृत करते आणि अभ्यासाने ती वृत्ती दृढ झाल्यावर ज्या देवतेची प्रार्थना केली जाते त्या देवतेच्या अदृश्य सहाय्याने अभ्यासूला समाधानकारक मदत मिळते व कर्तव्य आणि साहाय्य या दोन्हीचे मिश्रण यथायोग्य झाल्यावरच इच्छित फलप्राप्ती होते.

जगाच्या घडामोडी तोडणे ईश्वरालाही एकदम करिता येणार नाही. कारण ज्या ज्या निसर्गशक्तीच्या तर्फे जे जे कार्य त्याने उभारले आहे, त्या त्या शक्तीकडूनच ते कार्य तो करीत असतो. परंतु पाण्याच्या प्रवाहाला जसा एखादा पदार्थ आपल्यापरीने अडवण्याचे काम करीतो, तसे साधकाचे साहस हे आपल्या विरुद्ध शक्तींस प्रतिबंध करण्याचा प्रयत्न प्रार्थनेच्या आंतरिक शक्तीने करीत असते. आपणास हे सांगायला नकोच की भावनेच्या एकतानतेमागे कोणत्याही जीवाला शक्ती मिळत असते. क्रोधाची भावना जागृत झाली की त्याचे मदतगार षड्विकार त्यास मदत करून वृत्तीमध्ये महदंतर पाडीत असतात आणि विचाराची धारणा वाढली की कुणाकडून मारण्याएवढी जरी तयारी असली तरी तेथे समाधानच पहावयास मिळते! विकार व विचार या दोहोतही शक्ती आहे, परंतु एक दुःख परिणामी तर दुसरी सुखकारक!

प्रिय मित्रांनो! आपणास माहीत असेलच की जे लोक परमेश्वराचे स्मरण करीत होते त्यांनाही दुःख भोग भोगावेच लागले. परंतु त्याबरोबर एवढी गोष्ट मात्र खरी की, त्यांच्यातील समाधान वृत्तीची धारणा काही अपूर्ण होती आणि कार्यातील उत्साहशक्ती व निर्भयता असामान्य होती, हे कोणासही मानावेच लागेल. अर्थात् हे सामर्थ्य, ज्यांची भावना सदैव कुविचाराच्याच चिंतनात खर्च होते अशा मामुली माणसाला कसे मिळणार? प्रार्थनेमुळे देवाच्या अलभ्य शक्तीचा लाभ होऊन आपल्या अंगी सुख दुःख सहन करण्याचे सामर्थ्य येते व त्यामुळे आघातही आघातरूप न वाटता त्याचा योग्य तऱ्हेने प्रतिकार करण्याची निर्भीड कर्तव्यशक्ती आपल्यात निर्माण होते.

बाह्यांगाची ताकद अभ्यासाने व समाधानाची शक्ती प्रार्थनेने म्हणजे शुभचिंतनाने वाढत असते. केवळ प्रार्थनेनेच प्रयत्नाचेही काम पूर्णतया झाले

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

पाहिजे हे म्हणणे अयोग्य आहे. मी म्हणेन की देवाच्या भक्तीने जर आघातच बंद करावयाचे असतील तर देवाने आघात निर्माण तरी का करावे? आणि हे जर खरे तर श्रीकृष्णाने अर्जुनास नसती फूस देऊन युद्धाला प्रोत्साहित तरी का केले? करवावयाचा होता एखादा व्यापार नि खाऊन पिऊन सुखी ठेवावयास पाहिजे होते! पण तसे न करता असे का सांगितले की 'अर्जुना! असे भित्र्यासारखे पळून जाऊन काय होणार? तुला युद्ध केलेच पाहिजे आणि हे कर्तव्य करीत असता महापर्वत जरी कोसळले तरी वाईट वाटण्याचे कारण काय? आम्हाला त्याचा प्रतिकार केलाच पाहिजे व तसे करित असताही 'आम्ही आनंदात आहोत' असेच मरेपर्यंत म्हटले पाहिजे. किंबहुना मरण आले तरी 'आमच्या कार्याला हे पोषकच आहे' असेच समजले पाहिजे" ह्याच ज्ञानलाभ श्रीकृष्णाने अर्जुनाच्या प्रार्थनेने त्याला करून दिला आहे. असे म्हटलेले आम्ही ऐकले नाही की - 'बंधूनो! प्रार्थना करा म्हणजे काहीही प्रयत्न न करता तुम्हास राज्य मिळेल. प्रतिकार न करता सुद्धा तुमच्या घरात एकही बाण पडणार नाही.' काय? तुमच्यापैकी कोणी असे ऐकले आहे काय? तसे जर आपण समजत नाही तर 'प्रार्थनेने मृत्यू टळतो, बाण लागत नाहीत, आग विझून जाते' अशी भलती समज आपण कां करून घ्यावी?

प्रिय वाचकांनो! प्रार्थना म्हणजे अद्भूत किमया नसून, यथायोग्य कर्तव्य करण्याची यथार्थ प्रवृत्ती प्रार्थनेने निर्माण होते. प्रार्थना म्हणजे भित्रेपणा नव्हे तर बाणेदारपणाने वागण्याकरिता जगात ताकद आणणे आहे. "मला योग्यमार्गाने जाण्याकरिता शक्ती दे व पुढे सरसावू दे. मागील अन्याय सोडवून. असत्यातून मला सत्याकडे ने" अशी नम्रतेने आपल्या प्रिय देवतेजवळ याचना करणे, अर्थात् भिकारवृत्तीने नव्हे तर 'मी तुझ्यापासून ही वृत्ती घेईन नि जीवापाड कष्टही करीन' असे अंतःकरणापासून चिंतणे यालाच प्रार्थना म्हणतात. 'प्रार्थना ही मनुष्याला उदास व दीन बनवते' असे म्हणण्याचे वास्तविक काहीच कारण नाही. त्या प्रार्थनेचा खरा अर्थ न जाणणारेच बहुधा गोते खात असतात. एरव्ही जगात जी लहान स्थाने मोठी होतात - व्यक्तीची प्रगती होत जाते ती प्रार्थनेने होय. हा प्रार्थनेचा खरा भाव सर्वांच्या मनात सक्रियतेने भरो एवढीच त्या जगन्नियंत्याजवळ प्रार्थना करितो.

★★★

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

सामुदायिक प्रार्थनेचे तात्त्विक स्वरूप

प्रार्थना ही कुणाकरिता नि कां?

प्रिय वाचकांनो! आज जरी 'सामुदायिक प्रार्थने' चा प्रारंभदिन म्हणून आम्ही कार्तिक-पौर्णिमेला 'प्रार्थना-दिन' या नावाने संबोधीत असलो आणि या उत्सवावर विशेष भर देत असलो तरी, प्रार्थना व प्रार्थनेचा आराध्य देव काही नव्याने निर्माण केला गेला नाही. देवाप्रमाणेच प्रार्थनेचा मार्गही सनातन आहे आणि याच पौर्णिमेलगतची एकादशी 'प्रबोधिनी' म्हणजे 'देवाचा जागृतिदिन' या नावाने पूर्वीपासून ओळखली जात आहे, त्यातही प्रार्थनेचे महत्त्वच दर्शविले आहे. अर्थात् हा प्रार्थनादिनाचा उत्सव या दृष्टीनेही नवीन असा नाही!

प्रार्थना ही 'देवाला जागृत' करण्याकरिता उपयोजिली जात होती, असे पुराणांतरी अनेक दाखले आहेत. वास्तविक सदैव जागृत असणाऱ्या देवाला जागवण्यासाठी प्रार्थना नाही, तर आपल्यामधील सुप्त देवत्व जागवण्यासाठीच तिचा उपयोग आहे. थोडक्यात म्हणजे 'प्रार्थना हाच देव' असून त्याच्या संसर्गाने जीवही देवपणास प्राप्त होतो - आपल्या मूळपदी आरूढ होतो. यथार्थ प्रार्थना व प्रार्थनेचा देव हे मुळांत भिन्न-भिन्न असूच शकत नाहीत व प्रार्थना ही प्रार्थीपणात राहूही शकत नाही. म्हणून 'प्रार्थना कुणी, कुणाची व कशाकरिता करावयाची, याविषयी विचारांती दिसून येते की, हे प्रार्थनेचे बंड देवाकरिता नसून, आम्ही देवाबद्दल आमच्यात जो अविश्वास उत्पन्न करून घेतला आहे आणि दुःखदायक असा झाला आहे, त्याचा परिहार करण्याकरिताच प्रार्थना आहे. तो दुष्परिणामी भ्रम एका मोठ्या सात्विक परिणामाने काढून टाकावा, याकरिताच ही प्रार्थनेची योजना थोरांनी करून ठेविली आहे.

अज्ञानी व तत्त्वज्ञानी यांना 'एकपंक्ती लाभ'

रज्जूवर सापाचा भास व्हावा आणि त्याच्या परिणामाने अंगावर

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

शहारे यावेत, अंग थरकांपू लागावे, भीतीने बोबडी वळावी; इत्यादी प्रकार हे एका विकृत भावनेचे होतात, अर्थात त्यांचा नाश दुसऱ्या कोणत्याही औषधोपायांनी होणे शक्य नसते. याकरिता एकच उपाय करावयाचा असतो. तो म्हणजे, दिवा आणून 'ती दोरीच आहे' याविषयीची खात्री-ज्ञानयुक्त विश्वात-प्राप्त करून घेणे. परंतु एवढ्यानेच एकदम आटोपते असे नाही. त्याला पहिल्या परिणामाच्या इतकाच हा विवेकाचा परिणामही आपल्या वृत्तीवर दृढ करावयास पाहिजे असते. त्याला पुनःपुन्हा आपल्या वृत्तीस समजावयाचे असते की - 'आपण उगीच भ्रमलो, तो साप नव्हता-दोरीवर सापाचा भास झाला होता तो!' या स्थितीत काही वेळ गेला म्हणजे त्याची भीती व तज्जन्य परिणाम नष्ट होऊन तो पूर्ववत होतो. या दृष्टांताप्रमाणेच आमचीही स्थिती आहे. आमच्या वृत्तीवर 'मी देह आहे, देहाचा व्यवहार हे माझे जीवन आहे' अशा समजुतीच्या अज्ञानामुळे जो पगडा बसला आहे नि अनंत दुःखक्लेशांना कारण झाला आहे, तो समूळ काढून टाकण्यासाठी आम्हास यथार्थ ज्ञान हवे आहे आणि ते मिळविण्यासाठी तसेच मिळाल्यावरही रुजविण्यासाठी व टिकविण्यासाठी प्रार्थनेची आवश्यकता आहे. जगास जड, भिन्न व भोग्य किंवा त्याज्य समजल्याने आमच्यात जी एकांगी किंवा संकुचित वृत्ती निर्माण झाली आहे आणि रागद्वेषास वाढवून जगात कोलाहल माजविण्यास कारण झाली आहे, तिचे उच्चाटन देखील केवळ ज्ञानाने होणार नाही, तर त्यासाठी 'जे जे दृष्टी दिसे ते ते हरिरूप' किंवा 'सियाराममय सब जग जानी' हे तत्त्वानुसंधान दृढ झाले पाहिजे; अर्थात् हा रज्जुसर्पाप्रमाणे भासलेला जगद्भ्रम नाहीसा करण्यासाठीही प्रार्थनेचा महत्त्वाचा उपयोग आहे यात शंका नाही.

प्रभूपेक्षा प्रार्थनाच थोर!

सखोल दृष्टीने विचार करिता, प्रार्थना ही सामान्य लोकांपासून तो तत्त्वज्ञ पुरुषांपर्यंत सर्वांनाच आवश्यक आहे असे दिसून येते. प्रार्थना ही देवाकरिता करावयाची नसून आपल्याच अंतःशुद्धीकरिता, आत्मविकासाकरिता व आपले देवत्त्व प्रगट आणि प्रस्थापित करण्याकरिता करावयाची असते.

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

'देवापाशी मोक्षाचे गाठोडे' नाही परंतु प्रार्थना मात्र त्याची प्राप्ती करून देऊ शकते; आणि तात्त्विक प्रार्थनेने ज्याचा अंगीकार केला नाही त्यास प्रत्यक्ष परमात्माही तारू शकत नाही. देव दुर्जनांचा नाश करण्यासाठी अवतार घेईल परंतु प्रार्थना ही दुष्ट व पापी लोकांचा नाश न करिता त्यांचे दुर्जनत्व नष्ट करून त्यांनाही देवत्व देऊ शकते. इत्यादी गोष्टीचा विचार करूनच संतांनी 'राम न सकही नामगुण गाईं' किंवा 'तुझे भक्तिसुख तुज नाही ठावे' म्हणून रामापेक्षा नाम अर्थात् देवापेक्षा प्रार्थनाच श्रेष्ठ असल्याची ग्वाही दिली आहे; आणि बहुधा प्रत्येक धर्मप्रवर्तकाने आणि धर्मग्रंथाने प्रार्थनेवर भर दिल्याचे दिसून येत आहे! तेव्हा या प्रार्थनेच्याच आधारे आजही आम्हास आमची उन्नती कां नाही करून घेता येणार?

समाजहितार्थ देवा-भावात परिवर्तन

रोग्यांच्या रोगांचा जसा एकच नियम किंवा प्रकार नाही, तद्वतच मनुष्यसमाजाच्या प्रवृत्तीचेही एकच रूप नाही. प्रकृतीत ज्या ज्या योजनेने 'समत्व' निर्माण होईल ती ती योजना त्या त्या काळी श्रेष्ठ होय, हा आरोग्यशास्त्राचा सिद्धान्तच समाज-स्वास्थ्यासही लागू आहे. देशकाल विचाराने एके वेळी जी मनोवृत्ती समाजात निर्माण करणे अगत्याचे ठरते. तींच दुसरे वेळी 'समता' घालविणारी, एकांगी किंवा बाधक म्हणून नाहीशी करणे अथवा बदलणे प्राप्त होते. अर्थात् त्या त्या कालानुसार देवाची कल्पना व प्रार्थनेची प्रक्रिया यात देखील योग्य परिवर्तन करावेच लागते; ही गोष्ट आपणास, वेदकाळापासून आतापर्यंत मनुष्यसमाजाला किती वेळा देव व प्रार्थनेची पद्धती बदलावी लागली याचे इतिहासावरून दिसून येण्यासारखी आहे. अडाणी लोक जरी ही गोष्ट जाणू शकत नसले तरी, तत्त्वज्ञ लोकांना व सामाजिक जीवनाची घडी कालानुरुप बदलविण्याचा प्रयत्न किंवा अभ्यास करणाऱ्या पुरुषांना हे केव्हाच माहीत झालेले असते की, प्रसंगानुसार कधी अरुणवरूणाला, कधी नदी-पर्वताला, कधी अग्नि-सूर्याला, कधी इंद्रनागेंद्राला आणि कधी मासा-कासव-डुकर अथवा खांब त्यातून गुरगुरणाऱ्या दैवी शक्तीला सुद्धा देव मानावे लागले व तदनुसार प्रार्थनेचे बाह्यरूप देखील बदलावे लागले.

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

आजवर देव बदलत आले व त्यांचे साधनपंथही बदलले याचे एकच कारण आहे की, समाजाला ज्या काळी ज्या शक्तीची किंवा ज्या आदर्शाची जरूरी होती, ज्या प्रकारचे कर्तव्य त्याजकडून करून घेणे आवश्यक होते व ज्यायोगे त्याची प्रगती होणे स्वाभाविक होते, तसाच देव व त्यांची प्रार्थना लोकांसमोर मांडण्याचा प्रयत्न महापुरुषांनी त्याकाळी केलेला आहे. ज्यांची कल्पनाही करता येणे कठीण, असे कितीतरी देव त्यांनी वेळोवेळी लोकांसमोर मांडले आहेत. तेहतीस कोटी देवांच्या नावांची यादी कोठे सापडू शकेल काय? तुम्ही म्हणाल, ते तर भारतवर्षातील जनतेलाच उद्देशून म्हटले आहे. असेल कदाचित; पण विस्तीर्ण आणि भावनाशील अशा या भारतवर्षात, वेदकालापासून आतापर्यंतच्या निरवधि कालात, किती देव मानले गेले असतील त्यांचे मोजमाप तरी करता येईल काय? ते काही असले तरी त्यातून एकाच सूत्राकडे मला आपले लक्ष वेधावयाचे आहे की, समाजाला प्रसंगानुसार जसे वळण द्यावयाचे होते तसेच हे सर्व देव प्रस्थापित करण्यात आले आहेत; पुढे त्यांचा काही विपर्यास झाला असल्यास तो प्रश्न वेगळा!

भक्तांच्या विभक्तेवर प्रार्थनेचा प्रयोग

बंधूंनो! प्राचीन काळी कोणतेही देव कोठेही राहोत परंतु त्यांचे सख्य कायम राहत होते आणि त्यांची सभासंमेलनेही होत होती. परंतु आजच्या एकूण देवगणांत व भक्तजनांत अशी परिस्थिती निर्माण झाली आहे की, दुष्ट माणसे सुद्धा कधीकाळी 'जीवश्च कंठश्च' मित्र बनून ऐक्याने नांदू शकतील, असंख्य ठगांची एकजूट कोणासही नष्ट करता येणार नाही इतकी मजबूत राहू शकेल, परंतु या सांप्रदायिक लोकांचे विवेकशाली व सत्वशील देव मात्र मुळीच एक होऊ शकणार नाहीत आणि हे विश्वव्यापी प्रेमाचा एक 'एकं सत' तत्त्वाचा पाठ पढणारे भक्तही एकत्र बसू शकणार नाहीत. याचे मुख्य कारण हेच आहे की त्यांच्या समोर खऱ्या व्यापकतेचा आदर्श नाही, सामाजिक जीवनाची जबाबदारी त्यांच्या एकांगी पारमार्थिकतेपुढे त्यांना महत्त्वाची वाटत नाही व सामाजिक उत्कर्षासाठी आज काय करावयास हवे याची त्यांना जाणीव नाही. 'संघटित झाल्याने आपले देव बाटतील, महंत

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

कोपतील आणि मंत्र निःसत्त्व होतील' असा विपरीत भाव त्यांच्यात दृढ झाला आहे. हा सर्व परिणाम घालवण्याकरिता, आपापल्या ठिकाणी प्रार्थना किंवा अन्य साधने करीत अथवा एकेका विशिष्ट पुरुषाच्या ज्ञानाचे अनुसंधान करीत बसून परस्परांविषयी आत्मीयता वाढविता येईल हे शक्य दिसत नाही. म्हणूनच सामुदायिक प्रार्थनेच्या प्रांगणात सर्वांच्या इष्ट देवता भावनारूपाने बसवून त्यांच्या भक्तगणांत ही गोष्ट कळवणे आवश्यक आहे की, "या अनेक देवांच्या भावनामूर्तींना एकाच ठिकाणी विलीन करून त्यापासून जो कोणी मोठा देव प्रगट होईल त्याचीच आपणाला आवश्यकता आहे. आणि 'ब्रम्हा विष्णु हरिहर। हे जयाचे आज्ञाधार' अशा देवाधिदेवास प्रसन्न करावयाचे तर त्याकरिता प्रार्थना ही सर्वात्मकच पाहिजे आहे; अर्थात् ती त्याच्या कोणत्या तरी एका विशिष्ट शक्तिदर्शक वा गुणवाचक नावारूपास किंवा मूर्तीस कवटाळून बसलेली असू नये".

हे सर्व लक्षात घेऊनच 'सेवामंडळा'ची सामुदायिक प्रार्थना बनविण्यात आली आहे व तिचा परिणाम समाजावर कार्यरूपाने विशेष व्हावा म्हणून हा 'प्रार्थनादिन' निश्चित केलेला आहे. पूर्वी प्रार्थना नव्हती असा याचा अर्थ नसून, पूर्वकालीन प्रार्थनापद्धती बहिरंगतः निराळ्या स्वरूपाची होती तिलाच आता कार्यानुरुप काही वेगळे स्वरूप देण्यात आले आहे; उपास्यापासून आसनापर्यंत व मागणीपासून शिस्तीपर्यंत धोरणानुरूप नि कालानुरूप बाह्यदर्शनी बदल करण्यात आला आहे. या प्रार्थनेचे बीज आपणास 'समानी व आकृतिः'; 'सर्वेऽपि सुखिनः सन्तु' किंवा 'सहवीर्यं करवावहै' इत्यादी ऋषिकालीन प्रार्थनांतून आढळून येऊ शकेल व पूर्वीच्या भक्तांच्या धारणेतही त्याचा सुगावा लागेल!

आमचा अपेक्षित ईश्वर व्यक्त केव्हा होणार?

प्रिय सज्जनवृंद! आपणाला आज कोणता देव आणि त्याचा कोणता पंथ वा मार्ग आवडतो हे निवडता येत असेलच ना? अहो, देवाची कल्पना आपण सामाजिक दृष्ट्या जी समोर ठेवली आहे ती म्हणजे "जो सर्वांना सुख व शांती देणारा, अभ्युदयासह निःश्रेयसाकडे नेणारा, मनुष्यमात्रास

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

आरोग्यापासून तो जागतिक कर्तव्यापर्यंतचे ज्ञान देणारा आणि आत्मयोगाकडे नेणारा, समाजावर आघात करणाऱ्या व सर्वांच्या नीतिसुखाच्या आड येणाऱ्या अन्यायी दुष्ट लोकांचा नाश करणारा व मनुष्यसमाजास मानवतेच्या तराजूवर तोलून धरणारा, लहानापासून थोरापर्यंत सर्वांस समबुद्धीने पाहणारा व गुणकर्मानुरूप योग्य फळ देणारा, आणि हे सर्व करूनही आपले व्यापकत्व व अमरत्त्व न विसरणारा तोच आमचा देव'' अशाच स्वरूपाची आहेना? मग त्याच्या प्राप्तीचा मार्गही आपणास शोधता येणार नाही का? आपल्या वृत्तीवर व्यक्तित्वाचे जे स्थायी परिणाम झाले आहेत त्यामुळे वृत्ती आंधळी होऊन दुसऱ्यांच्या सुखदुःखांचा विचार अवलोकन करण्याची शक्ती तिच्यात राहिली नाही; ती निस्तेज नि निराश होऊन प्रवाहपतिताप्रमाणे वाहत जात आहे. तिला सामुदायिक भावनेचा आधार दिला, 'आत्मवत् सर्वभूतेषु' च्या ज्ञानांजनाने डोळस केले आणि न्यायबुद्धिपूर्वक अभ्युदयनिःश्रेयस साधण्याचा मार्ग दाखविला तर तिला आपली ध्येयमूर्ती प्रत्यक्षांत आणता येणार नाही का? क्षुद्र व्यक्तिभाव व परहितनाशक दुष्ट स्वार्थबुद्धि नष्ट होऊन मनुष्य हा सर्वच गुणांनी सौंदर्यवान व्हावा आणि ऐहिक व पारमार्थिक विषयांतही दुसऱ्यास विघातक न होईल असेच आचरण त्याने करावे; नि असे करणाराच खरा भक्तीमान होऊ शकतो असेच सर्वांचे मत आहे ना? आणि त्याकरिताच ना ही उपासनेची शाळा आहे? तसे नसेल तर मग ही आहे तरी कशाकरिता? नि देव मांडण्यात व भक्ती करण्यात दुसरा हेतू तरी कोणता?

संतांचा मायावाद कर्तव्य-विरोधी नाही!

शांतीरूप व न्यायमूर्ती परमेश्वरास समाजात अवतीर्ण करण्याकरिताच सर्व धर्म-संप्रदाय व उपासनादी मार्ग आहेत, हे सर्वत्र होऊन गेलेल्या संतांच्या व देवांच्या आचरणावरून सुद्धा दिसून आले आहे. धर्माचा किंवा तत्त्वज्ञानाचा अर्थ ग्रंथावरून लावण्यापेक्षा सर्वांच्या हृदयात घर करून बसलेल्या सर्व श्रेष्ठ महापुरुषांच्या कार्यप्रवृत्तीवरून लावणे अधिक सोयीचे आहे. त्यांनी 'जगत् मिथ्या' म्हटले असले तरी 'अनावश्यक आसक्ती नाहीशी करून उत्तम काम करण्याला तयार व्हा' असाच त्याचा भावार्थ आहे

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

ना? तसा नसता तर त्यांनी स्वतः लोककल्याणासाठी इतक्या धडपडी कां केल्या असत्या? शुकाने भागवत कां सांगितले असते आणि शंकराचार्यांनी अथवा रामदासांनी मठ कशाला स्थापन केले असते? श्रीगुरु ज्ञानेश्वरांनी 'हे विश्वचि माझे घर' म्हणून संतसंघटनेचे महत्कार्य केले ते काय 'जग मिथ्या म्हणून आपण डोळे लावून बसावे, खाणेपिणे व सर्व व्यवहारही मिथ्याच म्हणून भोजनादी कार्यक्रम सोडून द्यावेत आणि प्राणांचे विसर्जन करून 'मरण ती मुक्ति' मिळवावी, असा का त्याचा अर्थ होता? कदापि नाही! आमची वृत्ती सत्‌तत्त्वावरून तसेच सत्यत्त्वावरून ढासळू नये, ती व्यापकत्वाला विसरून संकुचित स्वार्थाने आंधळी बनून मूळच्या समत्वाला आचवू नयेत अर्थात् त्याचा परिणाम दुसऱ्यावर अन्याय करण्यात होऊ नये, तसेच नामरूपाच्या आसक्तीमुळे स्वतःचे सत्त्व गमावले जाऊ नये अर्थात् आत्म्याच्या अमरत्वाचे भान असावे, हाच ना ते ज्ञान सांगण्यातील उद्देश?

ज्ञानाने सृष्टी बदलते की दृष्टी?

एरव्ही काय 'जग मिथ्या' म्हटल्याने ते नाश पावते की 'सत्य' म्हटल्याने त्यांत परिवर्तन होण्याचे थांबते? 'आत्मा सत्य' म्हटल्याने का कामे चालतात नि 'शरीर सत्य' म्हटल्याने का नुसते 'जड'च कार्य करू शकते? होते तरी काय? - एवढेच ना की, अमर व नाशमान वस्तूंचे ज्ञान होऊन पुरुष त्याचा साक्षी होतो व सत्यतत्त्वावर स्थिर राहून त्यामुळे विपरीत परिणामाला प्राप्त होत नाही. एकच नितांत गांभीर्य धारण करून जगास निसर्ग समजून लीलाविहार करतो, काय खेळायचे तसे खेळतो व त्याकरिता पुन्हा येतो. अर्थात् तो 'परिणामी' असला तर दुःख भोगतो व ज्ञानारूढ असला तर सत्य स्वानंदात मस्त असतो; आणि 'तयाच्या लीलेमाजी नीति, जियाली दिसे' असे मर्मज्ञांना आढळून येते. अर्थात् 'ब्रह्म सत्य जगन्मिथ्या" हे ज्ञान सृष्टीत बदल करण्याकरिता नसून वृत्तीत बदल करण्याकरितांच आहे. तसे म्हटल्याने सृष्टीचे स्वभाव कधी बदलतात किंवा कोणी बदलले आहेत काय? समजणारे सुखी झाले असतील, बदलणारे पुढे गेले असतील, पण सृष्टी ज्या क्रमाने चालली आहे त्या तिच्या क्रमात कधी खंड पडला नाही; तिने आपल्या ठरीव गतीशिवाय स्वतःला बदल केला असे कधीही झाले

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

नाही. सृष्टीचा स्वभाव आणि जीवाचे कर्तव्य यांचे यथार्थज्ञान पुरुषात नेहमी जागृत रहावे, या शिक्षणाची 'प्रार्थना ही शाळा आहे' असे मी समजतो. परंतु या शाळेत बसण्याचे बाबतीत आम्ही इतके उदासीन वा बुद्धिहीन आहोत की, जन्मचे जन्म 'परिणामी' बनून दुःख भोगीत असताही जीवांस त्याचे ज्ञान होत नाही, किंबहुना प्रेमही वाटत नाही. ते प्रेम लोकहृदयात उत्पन्न व्हावे नि ते ज्ञान परिणामकारी बनावे याकरितांच अशा प्रकारचे उत्सव, नित्यनैमित्तिक कर्मे, तीर्थ ग्रंथ व जयन्ती-पुण्यतिथी आदी स्मृतिदिन यांची योजना श्रेष्ठांनी करून ठेवलेली आहे. "ज्ञान सर्वांठायी आहे हे साच। भक्तिविण तेच ब्रह्म नोहे।।" (तुका.) हाच त्यांचा भावार्थ!

प्रार्थनेचा मूलोद्देश व तत्त्वनिष्ठ परिवर्तन

वास्तविक खऱ्या देवांत कधीही बदल होत नाही; आणि प्रार्थना हा काही देवासाठी आपल्यावर लादलेला कोणी परका विषय नाही. देवाकरिता प्रार्थना मुळीच नाही व प्रार्थना ऐकण्याकरिता देवही नाही. आमचेच स्वभाव सृष्टीच्या नियमांना अनुसरून रहावेत म्हणून व आमच्यांतील सुप्त शक्ती नि खरी सत्ता प्रगट व्हावी म्हणून सर्वश्रेष्ठ आदर्शांनी प्रार्थना आम्हांस करावयाची आहे. ईश्वराच्या सत्तेने जे आमच्यात प्रगट झाले व ज्यांनी त्याच्या एकरूप सत्तेचा मार्ग दाखविला, त्यांना देवत्व देऊन आम्हाला त्यांची प्रार्थना करणे आहे. ती कधी आत्मयोगाने केली गेली आहे. परोक्ष तर कधी पंचतत्त्वांचा आश्रय घेऊन तर कधी राम-कृष्णादिकांची रूपे दृष्टिपुढे ठेवून ती करण्यात आली आहे. कधी एकेश्वरभावनेने तर कधी अनेक देवांच्या रूपांनी तिचा अंगीकार केला आहे. परंतु या सर्वांच्या मुळाशी अंतिम हेतु हाच की प्रकृतीच्या या पसाऱ्याचे व जीवाचे मूलज्ञान पुरुषाला व्हावे व त्याला हा सर्व संसार खेळण्याप्रमाणे वाटावा. अर्थात् हा हेतु देशकालादिभेदांचा विचार करून ज्या ज्या मार्गाने सफल करता येईल तो तो मार्ग श्रेष्ठांनी वेळोवेळी प्रचलित केला आहे, हे सांस्कृतिक इतिहासावरून दिसून येते.

सामुदायिक प्रार्थनेचा सर्वात्मक दृष्टिकोण

बंधूंनो! आजवरचा परंपरानुक्रम लक्षात घेता, आजच्या परिस्थितीस

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

अनुसरून, लोकांच्या पंथाभिमानाच्या व जातीयतेच्या भावना एकमुखी करण्याकरिता सामुदायिक प्रार्थनेशिवाय गत्यंतर नाही व ते ज्ञान सुगमपणे नि सोप्या पद्धतीने लोकांना दुसऱ्या प्रकारे आपण देऊ शकणार नाही, असे वाटते ना तुम्हांला? तुम्हांला जर आपला अधिक विकास करून घ्यावयाचा असेल तर, या 'सामुदायिक प्रार्थने' च्या मुळाशी जी दिशा व जी तत्त्वे अवलंबिली आहेत त्यांचा स्वीकार या-ना-त्या रूपात करावाच लागेल; अर्थात् दृष्टिकोण हाच राखावा लागेल. मग ते कार्य तुम्ही 'प्रार्थना' या नावाने विभूषित करा अथवा त्याचा नामनिर्देश न करिताच तसा परिणाम करू लागा, पण क्रम मात्र बदलता येणे शक्य नाही. आजच्या परिस्थितीत जनतेत खरे जीवन नि धर्मतेज निर्माण करावयाचे तर, सर्वसाधारण अशा भूमिकेवरच सर्वांना एकत्र आणून, त्याच्या हृदयांतील भावनांच्या तारा हळुवारपणे छेडीत त्यांच्यात सुसंवादित्व निर्माण केले पाहिजे. जी कांही कोमल अथवा कठोर भावना त्यांच्यात निर्माण करावयाची असेल ती या मार्गानेच आज सुगमपणे अभिव्यक्त करता येईल आणि तीच अधिक परिणामकारक व दृढमूल होईल. हे सर्व विचार समोर ठेवूनच ही 'सामुदायिक प्रार्थने' ची योजना पुढे मांडण्यात आली आहे. यांत, कोणताही वेदान्तवाद आपले मत अलग राखू शकत नाही; कोणतेही पंथ 'आपण भिन्न आहो' असे प्रतिपादू शकत नाही आणि कोणताही सुधारणावाद किंवा सुधारक राष्ट्र आपली बाजू सरसावून दाखवू शकत नाही. कारण या योजनाचा पाया जगाच्या मूलाधारावर-विश्वाच्या अधिष्ठानरूप तत्त्वावर आधारलेला असून सर्वांच्या हृदयांतील साररूप भावनांनाच आत्मीयतेने त्यांत गुंफण्यात आले आहे. याप्रमाणे तत्त्वज्ञानाच्या-अध्यात्मवादाच्या व उपासनावृत्तीच्या कसोटीवरच केवळ कसलेली ही योजना नाही, तर समाजशास्त्राच्या व सुधारणावादी बुद्धीच्या अपेक्षा पूर्ण करण्याचेही सामर्थ्य तिच्यात आहे. ती सर्वांगीण उन्नतीच्या शिक्षणाचे माध्यम आहे, हे विचारांती कोणाही तज्ज्ञास पटेल इतकी ती खंबीर व गंभीर आहे.

तौलनिकदृष्ट्या मौलिक भेदावर प्रकाश

जगातील प्रमुख धर्मांपैकी काही धर्मांत किंवा धर्मपंथात 'सामुदायिक

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

प्रार्थने'चा जो उपक्रम केला गेला आहे तो पूर्णतया याच तत्त्वावर आधारलेला किंवा ही तत्त्वे जाणू केलेला जरी नसला, तरी ते आमच्या तत्त्वाचे प्रचारक आहेत असेच मी म्हणेन. 'तुम्ही सामुदायिक प्रार्थना कां करिता?' असा प्रश्न जर त्यांना केला तर ते योग्य कारण दाखवू शकतीलच असे नाही. कित्येक 'पूर्वजांच्या परंपरे' कडे बोट दाखवून मोकळे होतील, कित्येक 'पापनिष्कृतीसाठी क्षमायाचने' ची आवश्यकता पटवितील नि कित्येक फार तर 'एकजातीयता किंवा एकराष्ट्रीयता' यांचे स्मरण करून 'संघटनेची शक्ती' दाखवितील. परंतु सामुदायिक प्रार्थनेचे तत्त्व वास्तविक याहूनही अधिक उच्च, व्यापक व गंभीर आहे; मूलग्राही व सर्वस्पर्शी आहे! सामुदायिक प्रार्थनेचे कांही अंशी इष्ट परिणाम त्यांचेवर झाले असले तरी तिचे मूलतत्त्व त्यांच्या हाती अजून देखील आलेले दिसत नाही. तसे झाले असते तर मूठभर लोकांच्या एका राष्ट्राकरिता कोट्यवधी लोकांचे प्राण घ्यावेत व तेही न्यायासाठी नव्हेत तर फक्त स्वार्थासाठी घ्यावेत, असे त्यांना कधीही वाटले नसते; त्यांनी सर्व शोधांचा, सुधारणांचा व शास्त्रीय प्रगतीचा ओघ मानवजातीच्या संहाराकडे न वळविता सर्वांच्या सुखाची तरतूद केली असती; परंतु तसे आढळत नाही. याचे कारण हेच आहे की त्यांनी सामुदायिक प्रार्थना केली पण ती सामुदायिक प्रार्थनेच्या शुद्ध तत्त्वानुसार मात्र केली नाही. संघटना वाढवली पण ती अंतःशुद्धीच्या पायावर मात्र उभारली नाही. अर्थात् ही गोष्टच विश्वात अशांतता-हाहाःकार माजवण्यास कारण होऊन, त्याच्या मुळाशी असणाऱ्या लोकांवरही तिची प्रतिक्रिया होणे क्रमप्राप्त आहे. ही अनर्थावस्था नष्ट होऊन स्वतः संपूर्ण सुखी, समर्थ व उन्नत व्हावे; आणि हे 'होणे' जगास ताप देणारे न ठरता शांतिसुख देण्यास कारणीभूत व्हावे, या दृष्टीची 'सामुदायिक प्रार्थना' आमच्या लोकांत रूढ व्हावी म्हणूनच आम्ही या गोष्टीस विचारपूर्वक चालना दिली आहे व त्याच उद्देशाने हा 'प्रार्थना-दिन' आमच्या लोकांत रूढ व्हावा म्हणूनच आम्ही या गोष्टीस विचारपूर्वक चालना दिली आहे व त्याच उद्देशाने हा 'प्रार्थना-दिन' पाळण्यात येत आहे.

पौर्णिमेच्या प्रकाशांत

सर्व लोकांना एकाच विशिष्ट दिवशी, एकाच वेळी, एकाच भावनेने

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

हांक देता यावी व अशा प्रकारे त्या कार्याची जाणीव टिकून रहावी म्हणून, तसेच दैनिक किंवा साप्ताहिक 'सामुदायिक प्रार्थना' करणाऱ्या सर्व लोकांत प्रतिवर्षी नवा उत्साह निर्माण व्हावा म्हणून "सामुदायिक प्रार्थनादिन" निश्चित करण्यात आला आहे. चंद्र स्वतः पूर्ण असूनही छायावरणामुळे तो एरव्ही अपूर्ण भासतो आणि पौर्णिमा तिथीस मात्र आपल्या पूर्ण वैभवाने झळकू लागतो हे लक्षात घेऊन, अपूर्ण भासणाऱ्या जीवास आपले पूर्णत्व प्राप्त करून घेण्याचें भान व्हावे म्हणून, पूर्णत्वाकडे नेणाऱ्या या 'सामुदायिक प्रार्थने' चा तोच उत्सवदिन ठरवणे आम्हास योग्य वाटला. शिवाय 'पूर्ण' झालेल्या अनेक महापुरुषांच्या पुण्याईचा दिवस म्हणूनही पौर्णिमेकडेच दृष्टी वेधल्याशिवाय राहत नाही. श्रीगुरु दत्तात्रेय, त्रिपुरान्तक शिव, सर्वदर्शी व्यास, भक्तवीर हनुमान, महासती सावित्री, योगेश्वर श्रीकृष्ण, मानवधर्मप्रचारक महात्मा कबीर व गुरू नानकदेव, ब्रह्मनिष्ठ संत श्रीआडकोजी महाराज इत्यादी अनेक दिव्य पुरुषांचे स्मरण पौर्णिमेशी निगडित झालेले आहे. तसेच इस्लामधर्मादी अन्यधर्मीय बांधव व प्राचीन-अर्वाचीन कलाप्रेमी लोक सुद्धा चंद्राचे चाहते आहेत. हे सर्व जाणून आणि पंढरपुरातील सर्वपंथीय संतांच्या सम्मेलनाची प्राचीन प्रथा लक्षात घेऊन कार्तिकपौर्णिमेचाच सोयीस्कर दिवस आम्ही 'सामुदायिक प्रार्थनादिन' म्हणून निश्चित केला आहे, तो सज्जनांना आवडेल असा विश्वास वाटतो.

'प्रार्थना-दिना' चा कार्यक्रम

बंधूंनो! 'श्रीगुरुदेव सेवामंडळा'च्या अनेक योजनांत 'पंचमहोत्सव ही पण एक आवश्यक योजना आहे; आणि त्या पाच उत्सवांत 'प्रार्थनादिना'चा उत्सव प्रमुख आहे - केंद्रस्वरूप आहे! या उत्सवात, आकाशातील तारकांचा मेळावा पृथ्वीवर आणून अर्थात् 'नभामाजी तारांगणे। तैसे लोक' - (समर्थ) संघटित करून स्वर्गीचे दिव्यत्त्व पृथ्वीवर उतरविण्याचा प्रयत्न आपणांस करावयाचा आहे याची जाणीव प्रत्येकास झाली पाहिजे. एक प्रशस्त व प्रशांत स्थळ आणि स्फूर्तिदायक निवांत वेळ ठरवून सर्वांना एका व्यापक अधिष्ठानावर एकत्रित केल्यानेच ते शक्य होणार आहे! त्याकरिता सर्वांनी एकाच गावी जमले पाहिजे असे मुळीच नाही. ज्यांना जसे शक्य असेल

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

त्याप्रमाणे त्यांनी आपापल्या गावी अत्यंत परिणामकारक रीतीने, सर्वसंग्राहक दृष्टीने व उत्साहवर्धक पध्दतीने तो प्रसंग घडवून आणावा. 'प्रार्थनादिना' निमित्त सर्वांनी आपापले गाव स्वच्छ करून, स्वच्छ कपड्यानिशी सकाळी 'रामधुन' व सायंकाळी नित्याच्या पद्धतीप्रमाणेच 'सामुदायिक प्रार्थना' करावी आणि सर्वांना 'सेवामंडळा'चे तत्त्वज्ञान समजावून सांगून अत्यंत गंभीरतेने प्रसंग आटोपावा; ही माझी सर्वांना सविनय सूचना आहे.

अखिल विश्वातील माझ्या बंधूभगिनींनो! तुमच्यात सामुदायिक प्रार्थनेचे शुद्ध तत्त्व तात्त्विकतेने नि सक्रियतेने भरावे आणि सर्वांनी ईश्वराच्या उद्देशानुसार परस्पराशी बंधुभावनेने वागून शांतिसुख भोगीत पूर्णत्वाकडे जावे एवढीच माझी हार्दिक इच्छा आणि त्या जगन्नियंत्यास एकमेव प्रार्थना आहे!

★★★

कार्तिक पौर्णिमा - 'प्रार्थना-दिन'

नच प्रार्थना एकांगि ही, नच व्यक्तिची ना पंथिची ।
सद्बोध जो त्या वृत्तिची, ज्ञानादि निज निवृत्तिची ॥
ही भावना धरुनी मनी, करि याजना तू सज्जना ।
स्मर प्रार्थना-दिन-पौर्णिमा, कर सामुदायिक प्रार्थना ॥

★

नच प्रार्थनेची शक्ति ज्या, त्याचे भजन वेड्यापरी ।
नच प्रार्थनेचे प्रेम ज्या, योगांग हे वेड्यापरी ॥
जंव तार लागे प्रार्थनी, तंव सर्व साधे साधना ।
उठ आर्यपुत्रा ! झडकरी, कर सामुदायिक प्रार्थना ॥

★★

जी सामुदायिक प्रार्थना, ती विश्वशक्ती-धारणा ।
जंवरी नये ही प्रार्थना, तंवरी फजीती या-जनां ॥
या प्रार्थनेची एक शक्ति, देव कैसा मानिना ?
उठ आर्यपुत्रा ! झडकरी, कर सामुदायिक प्रार्थना ॥

★★★

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

सामुदायिक प्रार्थनेचे हृदय आणि उपांगे!

पूर्वार्ध

संप्रदायांचा 'सावळा गोंधळ'

'श्रीगुरुदेव सेवामंडळा'ची योजना ज्यांच्या कानी ओझरती पडली असेल, त्यांना असे वाटणे स्वाभाविक आहे की, "आतापर्यंतच्या सांप्रदायिकांनी किंवा पंथवाद्यांनीच तर आमच्या देशात इतका गोंधळ माजवून ठेवला आहे व एवढा कहर केला आहे की त्यामुळे तत्त्वदर्शन बाजूलाच राहून आपसात भेदविरोध व देवभक्तीच्या नि धर्माच्या नावाखाली आचरट रूढिवाद माजून देश अवनतीला गेला आहे. कन्याकुमारीपासून तो गौरीशंकरापर्यंत अखिल भारतवर्षांतील प्रत्येक लहानसहान खेड्यांतसुद्धा अगणित देवळे निर्मूम त्यांस करोडो रुपयांच्या देणग्या देण्यात आल्या असता आणि त्यांनीही भागत नाही असे जाणून गावोगावी व घरोघरी असंख्य मोकळे देव मांडून त्यांची भक्ती मोठ्या जोरजोराने केली जात असताही अवनतीचा शेवटचा टप्पा गाठण्याची भारतावर पाळी आली आहे. याला आमच्यातील सांप्रदायिक गोंधळ, संकुचित पंथाभिमान व त्यामुळे परस्परात होणारी फूट ह्या गोष्टी प्रामुख्याने कारणीभूत झाल्या आहेत असेच म्हणावे लागेल. असे असता त्यात 'श्रीगुरुदेव सेवामंडळ' (स्थापना १९४३) या एका नव्या संप्रदायाची भर घातल्यास आणखी काय हाल होतील ते देवच जाणे!" ही भीती प्रत्येक जाणत्या माणसाला लांबून पाहताना किंवा दुरून ऐकताना वाटणे साहजिकच आहे, याची मला पूर्ण जाणीव आहे. परंतु अनेक संप्रदायांना एक करण्याचा व त्यांच्यामधील दोषाभास दूर करून गुणांचा विकास करण्याच्या भरीस पडणारा उद्योगही संप्रदायच होत असल्यास त्याला माझा नाइलाज आहे!

तत्त्वनिष्ठ संप्रदायांची आवश्यकता

आजपर्यंतच्या इतिहासात अनेक प्रसंगी साधुसंतांना त्या त्या काळच्या परिस्थितीत अनुसरून आपले उन्नत विचार वेगवेगळ्या स्वरूपात लोकांसमोर मांडावे लागले आहेत; आणि त्यांचा प्रसार होऊन महत्त्वाचे कार्यही त्या त्या

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

काळी घडून आले आहे, हे कुणाही तज्ज्ञाला कबूलच करावे लागेल. अर्थात् त्या त्या कालखंडात त्या त्या संप्रदायाची बहुधा उपयुक्तता आढळून येते. परंतु ती परिस्थिती बदलून कालांतराने दुसऱ्या प्रकारची परिस्थिती निर्माण झाली असता, त्यांनी आपले नियम देशकालपरत्वे बदलावयास पाहिजे होते ते न बदलल्यामुळे – अर्थात आसक्तीचा स्वभाव तसे करण्यास लौकर धजत नाही म्हणूनच त्या संप्रदायांना एकांगी व विचित्र स्वरूप येत गेले; आणि याच कारणाने त्या त्या नूतन परिस्थितीस अनुरूप असे नवनवे संप्रदाय थोरांना निरूपायाने काढावे लागले व संप्रदायांची वृद्धी होत गेली. जुन्या सांप्रदायिकांनी जर परिवर्तित परिस्थितीचा विचार करून आपल्या संप्रदायास नवे वळण दिले असते तर आतापर्यंत हजारो भिन्न संप्रदाय दिसलेच नसते. वास्तविक कार्याचे महत्त्व साधण्याकरिता कितीही वेळा मंडळ बदलावे लागले, संप्रदायांत परिवर्तन करावे लागले, तरी तसे करणेच उचित आहे; मात्र तत्त्वांत कोणताही फरक पडता कामा नये, असे मला वाटते.

विविध संस्थाही उपयोगीच

संप्रदायाबरोबरच कितीतरी संस्था मी आतापर्यंत पाहिल्या आहेत व पाहात आहे; परंतु त्यांचे एकीकरण हे त्यांनी निवडून घेतलेल्या विभिन्न कार्यक्षेत्रांमुळे होत नाही. त्यांनी उचलून घेतलेले एकेक कार्यच एवढे मोठे आहे की त्यातून डोके वर काढणे त्यांना कठिण होऊन बसले आहे; आणि आपल्या देशात आज एकच एक कार्य करून भागणार नाही, तर अशी अनेक कार्ये अनेक मार्गांनी एकाच वेळी करण्याची अत्यंत आवश्यकताही आहे. शिवाय कोणत्याही संस्थेने एखादे कार्य हाती घेतले की ते पूर्णपणे तिनेच पार पाडावे अशी आमच्या लोकांची खुळी समज होऊन बसल्यामुळे, त्या कार्याच्या लहानसान अंगोपांगाकडेही त्याच संस्थेला किंवा व्यक्तीला लक्ष द्यावे लागते व त्यामुळे आपले महत्त्वाचे कार्य बाजूलाच ठेवणे भाग पडते; अर्थात् ते महत्कार्य योग्य त्या प्रमाणात वर येऊ शकत नाही. यासाठी, मुळाकडील दृष्टी न सूट देता जर कार्याची वेगवेगळी अंगे भिन्न भिन्न लोकांना सांभाळता आली तर राष्ट्राचा उत्कर्ष अगदी थोड्या अवकाशात

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

झाल्याशिवाय राहणार नाही. एका साधारण घरातील पाच बंधूंनासुद्धा आपापल्यापरीने कामगिरी वाटूनच घ्यावी लागते आणि 'आमची सर्वांची कामगिरी आमच्या तर राष्ट्राचा उत्कर्ष अगदी थोड्या अवकाशात झाल्याशिवाय राहणार नाही. एका साधारण घरातील पाच बंधूंनासुद्धा आपापल्यापरीने कामगिरी वाटूनच घ्यावी लागते आणि 'आमची सर्वांची कामगिरी आमच्या एका घराकरिताच आहे' अशी समज ठेवावी लागते; व अशा रीतीने परस्परांच्या सुखोद्देशाने, ऐक्याभावाने नि सर्वांगीण धोरणाने त्यांनी उद्योग केला तरच ते आपला संसार थाटाचा करून दाखवू शकतात, नाहीपेक्षा भूमीला भार होऊन बसण्याची त्यांच्यावर पाळी येते. राष्ट्रातील विविध संस्थांना सुद्धा हाच नियम लागू आहे.

बंधुभाव जागृत असेल तर!

प्रिय बंधूंनो! समाज, देश किंबहुना विश्व हे सुद्धा एक घरच आहे आणि त्यातील संस्था हे कर्तेसवर्ते बांधव आहेत. ते आपापल्यापरीने जेव्हा कामे वाटून घेतील तेव्हाच त्या देशाची भरभराट होऊ लागेल, हा नियमच आहे. प्रश्न एवढाच आहे की आपापले नियोजित कार्य करीत असता त्यात जो संकुचित अहंकार व इतरांपासून आपण भिन्न असल्याचा भाव निर्माण होतो तो नाहीसा करता आला पाहिजे. संघटनेच्या समुद्रमंथनात स्वार्थी अहंकाराची सुरा आणि वैरभावनेचे हलाहलविष यांचा जो प्रादुर्भाव होतो तो बाजूस सारल्यास साऱ्या विश्वाला जीवन देणारे अमृत त्यातूनच वर आल्याशिवाय राहणार नाही. त्यासाठी देवत्त्व किंवा शिवत्त्व आमच्यात आले पाहिजे; बुद्धी महत्कार्याचे वेगवेगळे विभाग' म्हणून बंधुत्वदृष्टीने पाहिल्यास, - अर्थात व्यक्तिद्रोह, समाजद्रोह, पंथ किंवा धर्मद्रोह इत्यादी दूषितभाव मुळीच न ठेवल्यास, तसेच सर्वांनी आपापल्यापरीने काम करून परस्परांना पोषक व राष्ट्राचा उत्कर्ष करणारे बनल्यास जे प्रभावी परिवर्तन होईल त्याची कल्पना तरी करता येते का?

परंतु आमच्या भारतवर्षाची स्थिती या तत्त्वापासून अतिशय दूर व भिन्नस्वरूपाची होत गेली आहे. त्याचा विपरीत परिणाम धर्मापासून तो

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

समाजापर्यंत आणि संप्रदायापासून तो व्यक्तित्वापर्यंत सर्वांत बिघाड करण्यास कारणीभूत झाला आहे; नव्हे या विकृतीची भरमसाट भरभराट चालू आहे आणि त्यामुळे सर्व संप्रदाय, धर्म संस्था किंबहुना सर्व लोक अशांतसे दृष्टीस पडत आहेत. मुळांतील हे पोटभेदच जर सुरळित नसतील - किंबहुना प्रत्येक अवयवच जर परस्परास खाण्याकरिता धडपडत असेल तर सुस्थितिनिर्मितीचे पुढील कार्य कोणी आणि कसे करावे? मोठ्या संस्था किंवा प्रकाशातील व्यक्तीच जर परस्परात ओढाताण करीत राहतील तर अंधारातील सामान्य जनांना मार्गदर्शन कसे होणार? व्याघ्रांच्या लढाईत कोल्ह्याकुत्र्यांची काय घाबरगुंडी उडते याची त्या व्याघ्रांना कसली जाणीव, असेच अखेर म्हणावयाचे काय?

श्रेष्ठांच्या संमिलनांत राष्ट्राचा भाग्योदय

सध्याच्या या कोंडीतून बाहेर पडण्याचा मार्ग आपसात भांडणे हा नसून; परस्परांची तत्त्वे समजावून घेणे, एका ध्येयाकडे व सद्‌भावाकडे दृष्टी देऊन आपसातील अन्य मतभेदांना गौणत्व देणे आणि आपापल्यापरी कार्य-सेवा करीत सर्वांनी मिळून एक सर्वांगपूर्ण शांतिमूर्ती किंवा सुखाचा स्वर्ग निर्माण करणे, हेच सर्वांस श्रेयस्कर आहे. पण तसे भाग्य आम्हाला लाभण्याचे दिवस अजून यावयाचे आहेत, असेच म्हणावे लागते. आपापली मते समजावून देण्याचा प्रसंग जेव्हा-जेव्हा येतो तेव्हा-तेव्हा तो प्रत्येक कार्यकर्ता जर आपली निर्भेळ ध्येयदृष्टी किंवा थोर कार्यबुद्धी आपल्या जवळ घेऊन येईल तर सर्वांचे आंतरिक ऐक्य साधण्याला वेळच लागणार नाही; परंतु ते केव्हा शक्य होणार? त्यासाठी सर्वांना 'सर्वसाधारण' अशी एक पातळी गाठता आली पाहिजे. आपल्या सर्वांच्या विविध भेदांतही एक अभेदाचे अभेद्य सूत्र आहे याचे ज्ञान झाले पाहिजे, स्वार्थ आणि अभिमान इकडे दृष्टी केंद्रीभूत न होता एकाच उच्च ध्येयाकडे सर्वांची दृष्टी लागली पाहिजे व सर्वांना विचारविनिमयासाठी एकत्र येता आले पाहिजे. परंतु काही संस्थामध्ये कित्येक लोक केवळ व्यक्तीसुखाच्याच आशेने घुसलेले असतात आणि त्यांचा मार्गच हा असतो की दुसऱ्या दोघांशी शक्य तो जुंपून देऊन आपला लाभ करून घ्यावयाचा. अशाही अनेक अडथळ्यामुळे समाज आज

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

या दुर्गतीला पोचला आहे! सर्वांच्या कार्यशक्तीनी एक उत्कृष्ट वैभवमंदिर तयार होण्याऐवजी सर्वांच्या ओढाताणीमुळे या जीर्ण गडाचा एकेक दगड खिळखिळा होऊन गडगडत आहे. जोवर सर्वांची वल्ही एकाच दिशेने नावेला गती देण्याचा प्रयत्न करणार नाहीत तोवर ही नाव अशीच गटांगळ्या खात राहणार हे उघड आहे!

श्रेष्ठांच्या संमिलनांत राष्ट्राचा भाग्योदय

सध्याच्या या कोंडीतून बाहेर पडण्याचा मार्ग आपसात भांडणे हा नसून; परस्परांची तत्वे समजावून घेणे, एका ध्येयाकडे व सद्‌भावनेकडे दृष्टी देऊन आपसातील अन्य मतभेदांना गौणत्व देणे आणि आपल्यापरी कार्य-सेवा करीत सर्वांनी मिळून एक सर्वांगपूर्ण शांतिमूर्ती किंवा सुखाचा स्वर्ग निर्माण करणे, हेच सर्वांस श्रेयस्कर आहे. पण तसे भाग्य आम्हाला लाभण्याचे दिवस अजून यावयाचे आहेत, असेच म्हणावे लागते. आपापली मते समजावून देण्याचा प्रसंग जेव्हा जेव्हा येतो तेव्हा-तेव्हा तो प्रत्येक कार्यकर्ता जर आपली निर्भेड ध्येयदृष्टी किंवा थोर कार्यबुद्धी आपल्या जवळ घेऊन येईल तर सर्वांचे आंतरिक ऐक्य साधण्याला वेळच लागणार नाही. परंतु ते केव्हा शक्य होणार? त्यासाठी सर्वांना 'सर्वसाधारण' अशी एक पातळी गाठता आली पाहिजे. आपल्या सर्वांच्या विविध भेदांतही एक अभेदाचे अभेद्य सूत्र आहे याचे ज्ञान झाले पाहिजे. स्वार्थ आणि अभिमान इकडे दृष्टी केंद्रीभूत न होता एकाच उच्च ध्येयाकडे सर्वांची दृष्टी लागली पाहिजे व सर्वांना विचारविनिमयासाठी एकत्र येता आले पाहिजे. परंतु कांही संस्थांमध्ये कित्येक लोक केवळ व्यक्तीसुखाच्याच आशेने घुसलेले असतात आणि त्यांचा मार्गच हा असतो की दुसऱ्या दोघांशी शक्य तो जुंपून देऊन आपला लाभ करून घ्यावयाचा. अशाही अनेक अडथळ्यामुळे समाज आज या दुर्गतीला पोचला आहे! सर्वांच्या कार्यशक्तींनी एक उत्कृष्ट वैभवमंदिर तयार होण्याऐवजी सर्वांच्या औढाताणीमुळे या जीर्ण गडाचा एकेक दगड खिळखिळा होऊन गडगडत आहे. जोवर सर्वांची वल्ही एकाच दिशेने नावेला गती देण्याचा प्रयत्न करणार नाहीत तोवर ही नाव अशीच गटांगळ्या खात राहणार हे उघड आहे!

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

एकीकरणाचा अमोघ उपाय

या सर्व आपत्तीतून कोणता मार्ग काढावा की जेणे करून सर्वांची कार्ये परस्परांस पोषक ठरतील आणि सर्वांच्या आवडत्या व सर्वोपयोगी गोष्टी आपणास जनतेपुढे मांडता येतील? तसेच, प्रत्येकाने आपापल्या नियोजित मार्गानेच जाऊन गावांची देशाची उन्नती करावी ही गोष्ट कशाप्रकारे साधता येईल? इत्यादी गोष्टींच्या विवंचनेत मी असता, एकच एक मार्ग माझ्या दृष्टीपुढे स्पष्ट दिसू लागला की, आपण प्रथम सर्व संप्रदायांच्या लोकांना एकत्रित आणून 'सामुदायिक प्रार्थना' करू, त्यांच्यातील भिन्न-भिन्न देवता व वेगवेगळे आचार-विचार किंवा धर्मपंथादी भेद याविषयी कोणाच्याही मनांत द्वेष किंवा दोषबुद्धी येणार नाही अशा प्रकारची सहिष्णु व उदार भावना यांत निर्माण करू आणि प्रत्येक संप्रदायांतील शुद्ध तत्त्वांचा ओघ त्यांच्या त्यांच्या परीने हळुवारपणे वळवून एका मोठ्या प्रवाहाशी मिळविण्याचा प्रयत्न करू, तरच काही साधणे शक्य आहे. भारतात संस्थाभेद किंवा जातिद्वेष, याबरोबरच, किंवा याहूनही अधिक प्रमाणात, संप्रदायांनी संप्रदायाची भावना ही सर्वांत अधिक दृढमूल झालेली आहे. तीत योग्य परिवर्तन झाल्याशिवाय बाहेरच्या संस्थांचे एकीकरणाचे प्रयत्न हे वरवरचेच ठरतात. यासाठी बहुजनसमाजाच्या अंतरंगात घुसलेल्या बाबी पुढे मांडून एके ठिकाणी आणणे हाच मानसिक ऐक्य साधण्याचा यशस्वी उपाय ठरणार आहे. हा विचार लक्षात घेता मानवधर्मावर अधिष्ठित व सर्वव्यापी परमेश्वराचे चिंतन करणारी अशी एक 'सामुदायिक प्रार्थना' हीच मला या कार्यासाठी सर्वांगीण दृष्टीने योग्य उपाययोजना वाटली.

मानवधर्माच्या विस्तीर्ण छत्र-छायेत

'आपण सर्वांआधी मनुष्य आहोत व नंतर भिन्न-भिन्न धर्माचे किंवा संप्रदायाचे अनुयायी आहोत' हा विचार प्रामुख्याने समोर मांडून, माणुसकीचा धर्म आपल्यातून जो लोपल्यासारखा झाला आहे तो फिरून कसा प्रचलित करता येईल; व आपणास मनुष्यत्वाने एका गावात, एका समाजात किंवा एका धर्मातच नव्हे तर एका देशात किंबहुना अखिल विश्वात एकदिलाने

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

कसे वागता येईल; या विचाराला वागणुकीची जोड देऊन प्रत्यक्षात आणण्याच्या हेतूनचेच मी 'सामुदायिक प्रार्थना' हे माध्यम निश्चित केले व तसा प्रयत्न जवळ जवळ १५-२० वर्षांपूर्वीपासून (१९२६ पासून) सुरू केला. त्यात आवश्यकतेनुसार विकास होत जाऊन आज त्याचे स्वरूप विविध व विस्तीर्ण बनले आहे हे कोणासही सहज दिसून येईल.

माझी कार्यपद्धती व कार्योद्देश

माझ्या या प्रयत्नाचा प्रारंभिक इतिहास पुढील प्रमाणे आहे. लोकातकोणतेही कार्य सुरू करावयाचे तर त्यापूर्वी लोकांचे प्रेम संपादन करणे, त्यांच्या सद्भावनांना संतुष्ट करीत वळवून घेणे आणि परिचय वाढवणे या गोष्टीची महत्त्वाची आवश्यकता असते. त्या गोष्टी साधण्याकरिता, प्रेमाने लोकांचे काम करणे व त्यांच्यातील रूढ भजनपूजनात सामील होणे असे धोरण काही वर्षे (१९२३ ते १९३३) मी सुरू ठेवले. नंतर तो इतस्ततः पसरलेला परिचित समाज एकत्रित करण्याकरिता, सप्ताह यज्ञ दान व तपादिकांनी समाज एकत्र येऊ शकतो ही भावना मनाशी धरून, त्या कार्यातून लोकांची प्रेमभावना वाढविण्याचा प्रयत्न केला व साधारणतः आपल्या संकल्पित कार्याला उपयोगी असे काहीतरी लोक मिळतील ही गोष्ट दिसून येताच स्वतः भाषणाने मते तयार करण्यास प्रारंभ केला; अर्थात् त्यातूनच सामुदायिक प्रार्थनेचे बीज-मागे सांगितलेल्या भावनेनुसार हळूहळू रुजविण्याचा उद्योग सुरू केला व त्यात वेळोवेळी प्रसंगोचित फरक करीत जाऊन, अखेर काही सज्जन लोकांची त्यांच्या कार्याच्या दृष्टीने योग्य ती मदत घेऊन हे सर्वांगीण विकासाचे महत्कार्य उभारले.

या कार्यात प्रथमपासून माझा एकच उद्देश नंदादीपाप्रमाणे तेवत आहे की, विश्वधर्म हा जगात मनुष्यत्वाच्या विकासाच्या मार्गाने कसा नांदू शकेल नि सर्व संस्था परस्परांशी बंधुत्व-भावनेने वागून आपापल्यापरी प्रगतीचे व सेवेचे कार्य कशाप्रकारे करतील या विषयीचे बौद्धिकशिक्षण जनतेला देणे, तसेच इहलोकीचे सार्थक व परलोकीची सुकृतसामुग्री सक्रिय तत्त्वज्ञानाच्या रूपाने प्राप्त करून घेण्याचा मार्ग जनतेला कसा दाखवता

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

येईल याविषयी विचार व प्रयत्न करणे! हे प्रयत्न जेव्हा वाढत्या प्रमाणात लोकांसमोर येऊ लागले; परंतु कित्येक संस्थांना या प्रार्थनादी कार्यांचे महत्त्व न वाटून त्यांनी त्याला विरोध करण्यासही कमी केले नाही, तथापि तो आपोआपच विराम पावला. अर्थात् जेव्हा त्यांच्या निदर्शनास येऊ लागले की ह्या गोष्टी म्हणजे कार्याचे संपूर्ण रूप नसून ही एका महत्कार्याची प्रस्तावना आहे, एका महत्वाच्या कार्यासाठी हे सर्व केले जात आहे; तेव्हा त्यांतील थोर माणसांनी दुरून का होईना याला प्रोत्साहनच दिले. त्याचप्रमाणे कित्येकांना 'कसा बुवा हा व्याप वाढला' म्हणून नवल वाटून त्यांनी मला याविषयी अनेकदा विचारणाही केली व मी माझे विचार मोकळेपणाने त्यांचे समोर मांडले.

सेवामंडळाचा उपद्व्याप कशाकरिता?

कित्येकांना वाटले की, "आध्यात्मिक तत्त्वाच्या दृष्टीने असला व्याप अनिष्ट आहे. ह्या खटपटी म्हणजे परमार्थ नव्हे. हरिभजन करीत देवावर भार टाकून स्वस्थ बसावे हेच पारमार्थिकांचे काम!" या मताच्या पुरुषांना मी असे सुचविले की, 'ईश्वराचे आवडते लोकसेवा - कार्य न करिता स्वस्थ बसणे हा ईश्वराच्या दृष्टीनेच गुन्हा आहे. भूतदया, परोपकार, दान यांचेच समष्टिरूप राष्ट्रसेवा व विश्वसेवा हे आहे. कर्मयोगाचा आदर्श साधुसंतांनी व रामकृष्णादिकांनी आपणासमोर आचरण्यासाठी म्हणूनच ठेवला असून या सक्रिय सेवाभक्तीतच त्यांस संतोष होणार आहे. ईश्वरभावनेने जगाचे कार्य करणे हा व्याप बाधक नसून साधक होणारा आहे. अमूर्त तत्त्वज्ञानाचे मूर्तस्वरूप विश्वव्यापी प्रेमात व सर्वांगीण लोकसेवेतच दिसून येत असते. आत्म्याचे अमरत्व कर्तव्य करीत मरण्याच्या धडाडीत व ब्रह्माचे व्यापकत्व सर्वभूतहिताच्या कार्यांतच दिसून आले पाहिजे, नाहीतर तो नुसता एकांगी व भेकड विचार ठरेल!! ऋषिमुनींचा आदर्श समोर ठेवून विश्वात शांती निर्माण करण्याच्या दृष्टीने आपण सर्वांनी मिळून शक्य तेवढा प्रयत्न करणे यातच आपल्या भक्तीची व ज्ञानाची खरी कसोटी व सार्थकता आहे!"

वरील दृष्टीच्या लोकांखेरीज कित्येक लोक असे विचारणारेही मिळाले

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

की -"काय हो! जगात इतक्या संस्था लोककार्य करणाऱ्या असतांना फिरून तुम्ही हा नवा उपद्व्याप कां केला?" तेव्हा मी त्यांना असे सांगून गेलो कि 'बंधूनों! देवाची, धर्माची किंवा देशाची सेवा एकाच मार्गाने होते असे नाही; आणि त्याचबरोबर भिन्नभिन्न मार्गांनी आपापल्यापरी लोक जी कार्ये करतात त्यातील काही सांधे जुळतीलच असेही दिसत नाही. ते सर्व सांधे जुळविणाऱ्या या सर्वसंग्राहक मार्गाने विश्वमयाची सेवा करण्याचे मी योजिले आहे. आपण पाहात आहोतच की, संप्रदायांचे परस्परांशी मुळीच जुळत नाही; तसेच कुणाला देशभक्तीच मोठी वाटते तर कुणाला देवभक्तीच अधिक महत्त्वाची दिसते. कुणाला आपला धर्म किंबहुना रूढ्यांच महत्त्वाच्या वाटतात, कुणाला 'सब झूट" वाटून स्वैराचारच आवडतो. कुणाला 'जगात श्रीमंत लोकच नकोत' असे वाटते तर कुणाला 'त्याशिवाय कसे चालेल' असा प्रश्न पडतो. अशा भिन्न-भिन्न समजुतींच्या रानात घोटाळणारे हे जन समंजसपणाने एखाद्या सुरक्षित व व्यवस्थित अशा मार्गास लागावे याची मला आवश्यकता वाटल्यावरून मी ही 'श्रीगुरुदेव सेवामंडळा'ची योजना आखलेली आहे आणि त्याची उद्देशपत्रिका नियमासह जाहीर केलेली आहे."

सर्वांगीण उन्नतीसाठी सर्वांचा समन्वय

मुख्यविचारणीय गोष्ट ही आहे की, कोणतेही एकांगी कार्य करून राष्ट्राची संपूर्ण उन्नती होत नसते. एकांगाची प्रमाणाबाहेर वाढ हा रोग ठरतो तसेच अनेक कारागिरांनी भिन्न भिन्न अवयव आपापल्या कल्पनेने निर्माण करून त्यांची एक मूर्ती करू म्हटल्यास तेही हास्यास्पद व विद्रूप होण्याचा पूर्ण संभव असतो. यासाठी एका परस्पर-विचारविनिमयाच्या मर्यादेत जर सर्वांकडून वेगवेगळ्या अंगांची वाढ झाली आणि सर्वांचा कोठेतरी समन्वय करता आला तर ते कार्य अत्यंत उपयुक्त ठरणे स्वाभाविक असते. ही गोष्ट लक्षात घेऊन, या दृष्टीने कार्याचा आदर्श व क्षेत्र सर्व संस्थांच्या व संप्रदायांच्या लोकांकरिता निर्माण करून देण्यासाठीच आम्ही हे 'मंडळ' स्थापन केले आहे.

कोणतेही एक कार्य चांगले व दुसरे वाईट, असे म्हणता येत नाही.

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

प्रसंगी सर्वच गोष्टींची सर्वांनाच जरूर लागते. देशभक्ताला म्हटले की 'देवभक्ती नको' तर एका देवळातच तो देवाचे महत्व मर्यादित करील व देवाला आवडणारी जनसेवा करणार नाही. श्रीमंत लोक नसले तर गरीबांचे आर्थिक चालक म्हणून कोणी राहणार नाहीत नि श्रीमंत उन्मत्त झाले असले तर गरीबांना भोजनही मिळणार नाही. याप्रमाणे प्रत्येक गोष्टीची जी सांगड अनुभवी पुरुषांनी घालून दिली आहे. ती मोठ्या मनाने समजून घेण्याची अत्यंत आवश्यकता आहे आणि ती न समजल्यामुळेच आज सर्वत्र मोठा घोटाळा माजलेला दिसून येत आहे, नव्हे-काम बंद पडण्याची पाळी आली आहे. याकरिता तो मार्ग सर्वांना मोकळा करून, मनुष्याच्या सर्वांगीण उन्नतीस ज्या ज्या कार्याची जरूरी आहे ती सर्व कार्ये 'सेवामंडळा'तून आपण सुरू करू या उद्देशानेच, 'उदक अग्नि धान्य झाल्या घडे पाक। एकाविण एक कामा नये॥' (-संत तुकाराम) हे सूत्र समोर ठेवून मी या महत्कार्यास प्रारंभ केला आहे!

★★★

मनि रंगवी ही प्रार्थना, तनमन करी ही प्रार्थना ।
आचार सगळा प्रार्थना, सुविचार तोही प्रार्थना ॥
जिव प्रार्थना, शिव प्रार्थना, प्रत्येक स्वासी प्रार्थना ।
उठ आर्यपुत्रा ! झडकरी, कर सामुदायिक प्रार्थना ॥

★

हे सर्व जे जे वर्णिले, ते 'प्रार्थना' शब्दांतुनी ।
तुकड्या म्हणे 'तत्वार्थ' हा 'युग-धर्म' कालापाहुनी ॥
गुरुदेव दे 'आदेश' हा सम्पूर्ण करितो लेखना ।
उठ आर्यपुत्रा ! झडकरी, कर सामुदायिक प्रार्थना ॥

★★

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

सामुदायिक प्रार्थनेचे हृदय आणि उपांगे!

उत्तरार्ध

ग्रामीण संस्कृतीची मंगल प्रभात

भारतातील बहुसंख्य जनता खेड्या-खेड्यांतून राहत असून शिक्षण, स्वच्छता, शिस्त इत्यादी बाबीत ती अत्यंत मागासलेली आहे आणि संघटनेच्या दृष्टीने सर्वत्र गोंधळ माजलेला दिसत आहे. आमच्या राष्ट्राची उन्नती किंवा धर्मांचे पुनरूज्जीवन करावयाचे तर जनतेच्या आचारविचारात सुधारणा केल्याशिवाय गत्यंतर नाही. 'सेवामंडळा' ने या धोरणाने सुरू केलेल्या कार्याची दिशा पुढे देण्यात येत आहे.

आरोग्याच्या दृष्टीने शरीर, कपडेलत्ते व घरेदारे वगैरे स्वच्छ ठेवण्याची जेवढी आवश्यकता आहे, तेवढीच ती संपूर्ण गांव स्वच्छ ठेवण्याचीही आहे, केवळ आपल्या घरादारापुरताच विचार करणे हे अस्वच्छ मनाचेच लक्षण आहे. गांव हेही एक शरीर असून त्याला मधुनमधुन स्वच्छ करीत गेले पाहिजे याची जाणीव सर्वांना होणे अगत्याचे आहे. परमार्थदृष्ट्याही अंतर्बाह्य शुचित्वाचे अत्यंत महत्त्व आहे. हे लक्षात घेऊन गावाची स्वच्छता करण्याचे कार्यही मंडळाने अंगीकारले आहे. वास्तविक आपले गाव स्वच्छ राहावे व लोकांत उल्हास आणि प्रसन्नता नांदावी म्हणून तसेच सर्वांत परस्पर-बंधुभाव निर्माण व्हावा, राहणीतील टापटीप कळावी, कोणतेही कार्य सर्वांनी मिळून-मिसळून केले म्हणजे त्यास किती महत्त्व व सौंदर्य प्राप्त होते याची जाणीव सर्वांना व्हावी, परस्परांच्या उतेजनाने-हर्षाने व अहमहमिकेने सर्वांनी आपापली घरे सुंदर ठेवावी आणि त्याचे दृश्य सामुदायिकरित्या आपल्या गांवच्या लोकांच्या नजरेस आणावे - अर्थात् हे सौंदर्य आम्ही आमच्या अंगमेहनतीनेच कसे निर्माण करू शकतो याचा सक्रिय आत्मविश्वास त्यांच्यात जागृत रहावा म्हणून आपल्या पूर्वजांनी 'नगर-प्रदक्षिणे'चा नियम लावलेला होता व तो अजूनही क्षेत्राचे ठिकाणी किंवा कित्येक गांवी नैमित्तिक प्रसंगी चालू असल्याचे दिसून येते. पण त्यांतील तत्त्वयोजना लोक विसरून गेल्यामुळे ते आवश्यक कार्य निर्जीव झालेले दिसत आहे आणि म्हणूनच 'सेवामंडळा'ने 'रामधुन'

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

हे नांव त्यास देऊन त्याचा पुनरुद्धार करण्याचे कार्य सुरू केले आहे.

सर्व रस्ते स्वच्छ, संमार्जित आणि रांगोळ्यांनी युक्त झाले असून त्यावरून भजने गात गात शिस्तीने चालणारे ते उत्साही 'सेवक' पाहताच गावात एक प्रकारे नवचैतन्य संचरू लागते आणि लोकांना आपल्या सामुदायिक कर्तव्याची व ग्रामसेवेची जाणीव होते. असे अनेक लोक आपला अनुभव सांगतात की - "शेकडो रुपये खर्चूनही आमची गावगल्ली जेवढी दुरुस्त झाली नसती तेवढी या 'रामधनु' च्या उत्साह-निर्मितीने झाली असून गावास नंदनवनाची शोभा येऊ लागली आहे!" त्यांचे हे आनंदोद्गार लोकांत उल्हास निर्माण करीत असून हजारो गावे त्या कार्यक्रमात भाग घेत आहेत आणि हिंदुजनतेप्रमाणेच मुसलमानबंधु देखील त्यात सहभागी होत आहेत.

सामुदायिक प्रार्थनेची विशालता व उपयोगिता

बंधूंनो! या 'रामधुन' च्या अत्यंत गोड व उपयुक्त कार्यक्रमाप्रमाणेच कितीतरी जीवनोपयोगी असे महत्त्वाचे कार्यक्रम 'सेवामंडळा'त योजिले गेले आहेत. त्यांतील 'सामुदायिक प्रार्थने'चे सामान्यस्वरूप पुढीलप्रमाणे आहे.

आजच्या कालमानाचा विचार करिता आपणाला भिन्नभिन्न संप्रदाय व स्पृशास्पृश्यता ठेवून भागणार नाही हे लक्षात घेऊन, आज आपण या गोष्टीला समन्वयाच्या साचांत आणलेच पाहिजे या हेतुने, तसेच सर्वांच्या थोरपणाला मान देऊन त्या सर्वांचे आदर्श आपल्यासमोर ठेवण्याकरिता म्हणून, सर्वांनी एकत्र होऊन सर्व थोरांना व देवांनेच्या प्रार्थना अधिष्ठानी बसवून त्यांची प्रार्थना करणे अगत्याचे आहे आणि अशा तत्त्वांवरच सामुदायिक प्रार्थना आधारलेली आहे.

या प्रार्थनेत अनेक संप्रदायांचा समावेश - त्यातील महापुरुषांच्या वचनांच्या रूपाने करून घेतलेला आहे. प्रार्थनाष्टक (है प्रार्थना...), आणि वेळीवेळी निरनिराळ्या देवतांचे नामस्मरण यांचा व स्वतःच्या नि विश्वाच्या हितार्थ करण्यात येणाऱ्या ध्यानाचाही अन्तर्भाव प्रार्थनेत होतो. प्रार्थनेच्या शेवटी 'प्रार्थनेचे तत्वज्ञान व प्रार्थनेची आवश्यकता' या विषयावर सेवामंडळाच्या अधिकाऱ्यांकडून अथवा त्याच्या मर्यादा ओळखून असणाऱ्या तज्ज्ञांकडून गोड नि गंभीर भावनेत चार शब्द सांगितले जातात व बौद्धिक शांतिपाठानंतर

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

'सूचक सेवक' सर्वांकडून उत्साहवर्धक जयघोष करवून घेतो.

या सामुदायिक प्रार्थनेचा परिणाम इतका व्यापक, गंभीर आणि उत्कृष्ट होतो, की लोकांना सामाजिक शांती कशी असते याचे ज्ञान होऊ लागते. चार लोकात बसतांना व उपासना करतांना किती गंभीरतेची नि शिस्तीची आवश्यकता आहे याचा सक्रियपाठ मिळतो आणि जीवनाच्या विकासाच्या दृष्टीने प्रत्येक मनुष्याचा प्रार्थनेशी काय संबंध आहे हे अनुभवास येते. सामुदायिक वृत्ती, शिस्त, परस्पर-प्रेम, शांतता, एकतानता, उत्साह आणि ज्ञानविकास या दृष्टीने सामुदायिक प्रार्थना हे सक्रिय शिक्षणाचे केंद्र म्हणणे अधिक समर्पक होईल!

सामुदायिक प्रार्थनेचे 'विराट दर्शन'

सामुदायिक प्रार्थना कशी असते आणि ती मोठ्या समुदायांत तेवढ्याच गंभीरतेने कशी होऊ शकते हे बघण्याच्या हेतूने, बुलढाणा (वऱ्हाड) जिल्ह्यांतील युरोपियन जिल्हाधिकारी (डी.सी.) व मुसलमानधर्मीय कप्तान (डी.एस.पी.) हे एकदा मजकडे आले. ते नुसते भेटीला आले असावेत या भावनेने मी त्यांना म्हणालो - "ही माझी प्रार्थनेची वेळ आहे." मी म्हणालो - "अवश्य! परंतु नंतर आपणांस भजनासही यावयाचे आहे तेव्हा आपण पांच-दहा मिनिटे बाजूला थांबून निघून जाऊ शकता; अर्थात् तेव्हा मात्र मी आपणास भेटू शकणार नाही." त्यांनी कबूल केले व त्याप्रमाणे त्यांना बाजूला बसविण्यात आले. सरासरी २० हजार लोकांची अत्यंत गंभीरतेने व शिस्तीने चाललेली प्रार्थना नि भोवताल संरक्षक स्वयंसेवकांची ती सुंदर योजना बघून त्यांचे मनावर असा गंभीर परिणाम झाला की ते सर्व आपोआपच प्रार्थनेला उभे राहिले आणि प्रार्थना संपेपर्यंत (अर्थात् सव्वा तास) तेथून जाऊच शकले नाहीत (मलकापूर येथे दि. २७-८-१९४५).

प्रार्थना संपल्यावर मी जेव्हा त्यांना घेऊन जाऊ लागलो तेव्हा जिल्हाधिकारी म्हणाले - 'हमको तो यहाँ चर्चकी याद हो आयी और मालूम होने लगा कि हमारीही प्रार्थना है!" कप्तान म्हणाले - "महाराज! बडी ताज्जुबकी बात है! यहाँ तो बिलकुल नमाजकाही रंग छाया हुआ नजर आया।" एक हिंदु

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

ऑफीसर म्हणाले - "नहीं जी सभी पाठ तो हमारे हिन्दुधर्मकाही था।" तेव्हा मी म्हणालो - "बंधूंनो! ईश्वराच्या प्रेमाला का कुठे धर्म आणि देशाच्या मर्यादा असतात? ईश्वर प्रेमाची हांक वास्तविक एकाच स्वरूपाची आहे, मग तिच्यावर कोणत्याही धर्माचा शिक्का मारा अथवा कोणत्याही शब्दांचे अलंकार चढवा. हिंदुस्थानांतच नव्हे तर अखिल विश्वात देखील या एकाच भूमिकेवर ऐक्य घडविण्यात आले तर मतामतांचा गलबला आणि परस्परद्वेष नष्ट झाल्याशिवाय राहणार नाही. ही प्रार्थनापद्धती काढण्यात तरी माझा दुसरा हेतु काय आहे? यापासून मला एकच गोष्ट साधावयाची आहे की, भारतवर्षातील सर्व संप्रदायांच्या लोकांनी एके ठिकाणी येऊन प्रार्थना करावी व आपणांमध्ये बंधुभाव निर्माण करून घ्यावा; तसेच जगातील सर्व धर्म हे सर्वांच्या उन्नतीकरिताच असून ते देशकालच्या भिन्न-भिन्न रिवाजामुळे वेगवेगळ्या नियमांनी संपन्न केलेले दिसत आहेत, वस्तुतः त्यांचा पाया सत्यतत्त्वावरच आधारलेला आहे, हे सर्वांना कळून यावे. जगात ही वृत्ती नांदू लागेल तो दिवस कलियुगाचा अंत करून सत्ययुगाचा आरंभ करणाराच ठरेल आणि त्याच्या उदयाचा प्रयत्न करण्याचेच कार्य मी आपल्या लोकांच्या प्रेमाच्या आधारे स्वीकारलेले आहे. माझा हा उद्देश आपणही लक्षात ठेवावा आणि आपल्या अधिकारी लोकांनाही कळवावा हीच माझी अपेक्षा आहे."

चिरंतन तत्त्वांचा समयोजित आविष्कार

प्रिय सज्जनांनो वरील विवेचनावरून आपल्याला प्रार्थनेच्या महत्वपूर्ण योजनेची व ती आजच्या समाजाकरिता किती आवश्यक आहे याची काहीशी कल्पना आलीच असेल. वेदांतील सामूहिक प्रार्थना किंवा ऋषिकालीन सामुदायिक मंत्रानुष्ठान व संतकालीन सामुदायिक भजन-संकीर्तन यापासून ही योजना अगदीच वेगळी किंवा नवीन आहे असे काही आपणाला दिसून येणार नाही; परंतु पूर्वी चालत आलेला पण मधल्या काळाने लोपवून टाकलेला हा 'योग' फिरून देशकालविचारास दृष्टीसमोर ठेवून चालू करण्यात आला आहे हे मात्र आपणास लक्षात घ्यावे लागेल. आमच्या सांप्रदायिक लोकांनी या आवश्यक अशा महत्वाच्या गोष्टीची तत्त्वदृष्ट्या व कार्यदृष्ट्या हेळसांड केली असून सर्वांगीण उन्नतीवर त्याचा महान विपरीत परिणाम

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

घडून आला आहे, हे जाणूनच मूळच्या उच्च प्रथेस उचलून धरण्याचा प्रयत्न मी सुरू केला आहे. यांतील देव किंवा धर्म काही नवा आहे असे नाही; संतमहंतांनी निश्चित करून ठेवलेली जुनीच तत्त्वे यात गोवलेली आहेत. एवढेच की प्रसंगमान पाहून आणि त्यांची पूर्वप्रमाणे शोधीत न बसता आत्मविश्वासाने निर्धारित करूनच ती उपयोजिली आहेत तथापि तज्ज्ञांकडून त्यांवर भरपूर प्रमाणे मिळू लागली आहेत.

'सामुदायिक प्रार्थने' ची गोड कार्यप्रणाली आज हजारो खेड्यांतून सुरू आहे. अर्थात् ती 'प्रार्थना' केवळ आठवड्यातून एक दिवसच घेण्यात येत नसून बहुतेक गांवी दररोज नियमितपणे तो कार्यक्रम करण्यात येतो आणि गुरुवारी सायंकाळी प्रशस्त मैदानात त्याची योजना केली जाते. या सामुदायिक प्रार्थनेचा सर्वत्र प्रचार व क्षेत्रविस्तार होण्याची संस्कृतीचे पुनरुज्जीवन व भारताचा भाग्योदय यांची बीजे साठविली आहेत असा आत्मश्विास अनेकांना वाटू लागला आहे.

'श्रीगुरुदेव उद्योग-मंदिर'

बंधूंनो! येथवर आपण 'रामधुन' व 'सामुदायिक प्रार्थना' या दोनच गोष्टींचे ओझरते दर्शन घेतलेले आहे, परंतु 'सेवामंडळ' म्हणजे या दोनच गोष्टींचे कार्यकेंद्र नसून संस्कृती व संघटितपणाबरोबरच जीवनोपयोगी इतर गोष्टीचाही समावेश त्यात पूर्णपणे केलेला आढळेल. प्रार्थना ही कार्यनिवृत्त बनविणारी नसून आपल्या कर्तव्यात सौंदर्य, पावित्र्य व जोम आणणारी आहे आणि जीवनाच्या दृष्टीने प्रार्थनेला उद्योगाची जोड देणे आवश्यकच आहे. हे जाणून, प्रार्थनाप्रेमी लोकांना जीवनोपयोगी उद्योगधंदे शिकविण्याची व्यवस्थाही त्यात केलेली आहे. ग्रामीण जीवन सुखी करावयाचे तर तेथील उद्योगांची वाढ करून लोकांना स्वावलंबी आणि उद्योगशील बनवणे अगत्याचे आहे म्हणूनच ज्या गावी 'रामधुन' किंवा 'सामुदायिक प्रार्थना' पद्धतशीरपणे घेतली ज़ाते त्या गांवी असा उपक्रम सुरू करण्यात येतो की, तेथील लोकांनी फावल्यावेळी रोज आपल्या घरी सूत कातून तेथे उघडण्यात आलेल्या 'श्रीगुरुदेव उद्योगमंदिर' या विभागातून कपडे विणून घ्यावेत.

'श्रीगुरुदेव उद्योग-मंदिरा'मध्ये कापड विणून देणे, गरीब लोकांचे

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

सूत विकत घेणे, तसेच घोंगडी, नवार, गुंड्या, चटया, स्वेटर, मफलर, कानटोप्या, सतरंज्या, ब्लँकेट्स व खेळणी वगैरे वस्तू तयार करून आणि इतरांना तसे शिकवून सर्व लोकांना उद्योगतत्पर बनविणे इत्यादी गोष्टी केल्या जातात. त्या गावातील सामान्य मजूरसुद्धा उत्तम सूत कातून विकू लागतो अथवा आपले कपडे तयार करून घेतो. कित्येक ठिकाणी तेलघाण्यांही चालविल्या जातात.

धर्मार्थ औषधालयाची योजना

उद्योग व्यवस्थितपणे सुरू झाले आहेत अशा गांवी 'श्रीगुरुदेव धर्मार्थ औषधालय' उघडले जाऊन आयुर्वेदाची व त्याद्वारे गरीब जनतेची सेवा केली जाते. अर्थात् तथील स्थानिक 'सेवामंडळा'तील काही सेवकांनाच आरोग्य व वैद्यकविषयक शिक्षण देण्यात येऊन ग्रामसेवेस तत्पर बनविले जाते आणि त्या गावच्या मानाने आवश्यक तेवढी आयुर्वेदिक औषधे तयार करून दिली जातात. फार मोठ्या आजाराची सोय जरी करता आली नाही तरी सामान्य आजार, साथीचे रोग वगैरेवर परिणामकारक ठरतील अशा बहुगुणी पण अल्पमोली औषधे देण्यात येऊन, ठरलेल्या वेळी त्या सेवकांकडून, औषधालयांत जे कोणी करीब वा श्रीमंत येतील त्यांची निर्वेतन सेवा केली जाते. प्रमुख 'श्रीगुरुदेव औषधालय' अमरावती, या ठिकाणाहून त्या त्या संपूर्ण गांवातर्फे आवश्यक औषधे मागविण्यात येतात आणि त्यात पुष्कळशा नामांकित वैद्यांनी पाठविलेल्या औषधांचा विशेष भरणा केला जातो.

ही योजना लोकांना अत्यंत मानवली असल्याचे दिसून येत आहे. "तुमच्या औषधांनी आम्हाला उत्तम गुण आला आहे" अशी आशयाची शेकडो पत्रे आमचेकडे आली आहेत आणि कित्येक लोकांनी आपल्या काही 'जमिनी' सुद्धा तेथील स्थानिक 'श्रीगुरुदेव औषधालया'स दिलेल्या आहेत. मागील कॉलऱ्याच्या साथीत अनेक ठिकाणी 'सेवामंडळा'च्या मुलांनी धडाडीने केलेल्या कामाबद्दल तेथील अधिकारी व पुढारी यांनी आपापल्या कार्यालयांमध्ये पाठविलेले 'रिपोर्टस' महत्त्वाचे आहेत. शेकडो गावांतून 'मंडळा'ने प्रसृत केलेली औषधेच वापरण्यात आली असून गावोगावी औषधालये उघडण्याबद्दल मागणी व प्रयत्न चालू आहेत. गावकरी सेवकांनी १०० रुपये दिल्यास

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

त्याचे मोबदल्यात त्यांचेकडे २५० रुपयांची औषधे पाठविली जातात व हे सर्व कार्य सेवामंडळांतील सेवकांकडूनच करण्यात येते ही गोष्ट विचारी जनांना महत्त्वाची वाटणे स्वाभाविकच आहे.

'श्रीगुरुदेव व्यायाम-मंदिर'

याबरोबरच 'श्रीगुरुदेव व्यायाम-मंदिरा'ची निर्मितीही त्या त्या खेड्यांतून केली गेली आहे. शरीर मजबूत व निरोगी असणे हे प्रपंचाइतकेच परमार्थासाठी आणि घराइतकेच राष्ट्रासाठी देखील आवश्यक आहे; तेव्हा शारीरिक शिक्षण प्रत्येकास अवश्य मिळालेच पाहिजे हे निर्विवाद आहे. म्हणूनच 'श्रीगुरुदेव व्यायाम-मंदिरा'ची स्थापना करण्यात येऊन प्रत्येक व्यायाममंदिरातून शरीराला आरोग्यदायक नि आत्मसंरक्षण लाठी-काठी, कवायत किंवा व्यायाम, कुस्ती, मल्लखांब, सूर्यनमस्कार व आसने वगैरेचे शिक्षण दररोज दिले जाते; त्या विषयीचे ज्ञान, कला आणि सामर्थ्य वाढविले जाते. त्याकरिता वर्षातून एकदा वर्ग भरविण्यात येतो, मधून-मधून 'दंगल' ठरविले जातात आणि कलेला प्रोत्साहन देण्याच्या दृष्टीने बक्षिसे ठेवण्यात येऊन गुणांची वाढ करण्यांत येते. ही सर्व कार्यकर्ती मुले मंडळाचीच असतात आणि ती आपल्या सामर्थ्याचा उपयोग सत्कारणीच करितात.

'श्रीगुरुदेव वाचनालय' व साक्षरता-प्रचार'

जेथे या वरदर्शित योजना अंमलात आलेल्या आहेत तेथे वाचनालयेही उघडली गेली आहेत. खेड्यांचे जीवन कसे सुधारेल, धर्म व भक्ती म्हणजे काय वस्तू आहे, सामुदायिकता कशी निर्माण होईल, सर्वांगीण उन्नतीचे मार्ग कोणते, जग काय आहे इत्यादी विषयांवरील विचारांची व स्वावलंबी वृत्तीच्या नि विश्वबंधुत्व भावनेच्या थोर थोर लोकांनी दिलेल्या संदेशाची उत्तम परंतु सुगम अशी छोटी-मोठी, पुस्तके, वर्तमानपत्रे, मासिक वगैरे त्या वाचनालयांत ठेवली गेली आहेत आणि त्या विभागाची योजना स्वतंत्ररूपाने करून ठेवूनं 'श्रीगुरुदेव वाचनालय' असे नाव त्यास देऊन ठेवले आहे.

वाचनालयाच्या या योजनेबरोबरच 'साक्षरता-प्रसारा'चे कार्यही त्या त्या गावांतून मंडळाचे सेवक, एक सोयीची वेळ ठरवून करीत आहेत. ज्यांना काहीच शिक्षण मिळालेले नाही अशा लोकांना व्यवहारात पदोपदी

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

अडचणी येतात, प्रत्येक वेळी परावलंबी राहावे लागते आणि अनेकांकडून फसवले जाण्याचा विशेष संभव असतो; त्याचप्रमाणे सद्ग्रंथांचे अध्ययन किंवा जीवनोपयोगी विषयांचे ज्ञान करून घेण्याला त्यांना मार्गच ठरेनासा होतो. ह्या सर्व गोष्टी लक्षात घेऊन निरक्षर जनतेला साक्षर करण्याचे कार्य मंडळाने हाती घेतले आहे आणि ते ग्रामीण जनतेचे मानसशास्त्र, जीवन व संस्कृती यांना धरून शक्य तेवढ्या सुगम पद्धतीने करण्याचे योजिले व आरंभिले आहे.

विविध सेवाकार्यातील 'एकविध भाव'

याप्रमाणे पाहता सामुदायिक प्रार्थनेची अनेक उपांगे दिसून येतात. जनतेचा बौद्धिक, आध्यात्मिक, शारीरिक, आर्थिक, मानसिक व शैक्षणिक इत्यादी सर्वांगीण दृष्टीनी विकास कसा करता येईल, या गोष्टींच्या चिंतनातून प्रगट झालेले हे प्रार्थनेच्या साम्राज्यांतील विविध विभाग पाहिले म्हणजे 'सेवामंडळा'च्या सर्वांगीण कार्याची थोडीफार कल्पना येऊ लागते. हे सर्व पोटविभाग आपापल्या वृत्तीनुसार त्या एकाच संस्थेच्या छत्राखाली काम करीत असतात आणि आठवड्यातून एक दिवस 'रामधुन' व गुरुवारची 'सामुदायिक प्रार्थना' या कार्यक्रमाकरिता मात्र एके ठिकाणी जमून गावास स्वर्गाप्रमाणे शोभवून दाखवीत असतात.

वरील कार्यक्रमांव्यतिरिक्त 'सेवे'च्या अन्य कामातही त्याचं संगनमत व सहकार्य असतेच. प्रसंगी निराश्रित-आजारी-व्यक्तींची सेवाशुश्रूषा करणे, दीनदुर्बलांस सहाय्य देणे, आपत्काली लोकांना धीर देऊन धडाडीने पण विचारपूर्वक योग्य ती मदत करणे, सत्कार्यास हातभार लावणे आणि ज्या ज्या प्रकारे होईल त्या त्या प्रकारे मंडळाच्या उद्देशानुसार जनतेची सेवा करणे हे प्रत्येकाचेच काम असते. बलिदान-बंदी, दुर्बलांचे संरक्षण, धर्मकायास प्रोत्साहन व अस्पृश्यता-निवारण इत्यादी बाबीत कुशलतेने लोकांच्या हृदयपालट घडवून आणून विचारपूर्वक कार्य करणे अथवा कार्यकर्त्यांना सहाय्य देणे या गोष्टीही सेवामंडळाला दूरच्या बिलकूल नाहीत. जनता-जनार्दनाची सेवा आपल्या नियोजित मार्गाने सर्वांनी मिळून-मिसळून करणे हे 'सेवामंडळा'च्या सेवकांचे महत्त्वाचे कर्तव्य आहे!

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

सेवामंडळाचे सर्वस्पर्शी सत्कार्य

थोडक्यात बोलावयाचे तर, सेवामंडळ हे सर्व जीवनोपयोगी शिक्षणाचे माध्यम किंवा केंद्र असून सर्वांगीण उन्नतीचा राजरस्ता आहे. प्रपंच आणि परमार्थ यांची सांगड घालणारा सत्पुरुषांच्या उपदेशाचा तो सक्रिय पाठ असून वेद, ऋषि आणि जगतातील सर्व महापुरुष यांचे अंतरंग त्याच्या द्वारे व्यक्त होऊ लागले आहे. व्यवहारातील साधी टापटीप व स्वच्छता यापासून तो स्थितप्रज्ञाच्या लक्षणांचा, सर्व संप्रदायांच्या समन्वयांचा आणि अखिल विश्वाशी समरस करणाऱ्या विश्वबंधुत्वाचा किंवा शुद्ध मानवतेचा प्रत्यक्ष पाठ त्यात दिला जात आहे. धर्म आणि सुधारणा यांचा सूक्ष्म विचार करून संस्कृतीचे पुनरूज्जीवन करण्याचा व त्याद्वारे खेड्या-खेड्यांतून स्वर्गीय नंदनवन फुलविण्याचा हा एक सत्प्रयत्न आहे; आणि म्हणूनच थोरांच्या आगमनाच्या वेळी त्यांचे 'स्वागत करण्याची पद्धती' काय असावी अशा लुप्तप्राय झालेल्या अनेक आवश्यक शिष्टाचारांची देखील माहिती त्यांत दिली जाते. प्रार्थनेचे हृदय आणि तिची ही उपांगे किंवा शाखोपशाखाचा विस्तार पाहिल्यावर, 'प्रार्थना' ही डोळे मिटून बसणाऱ्यांची एकांगी निष्क्रिय विचार-धारा आहे असे कोण म्हणू शकेल?

सेवामंडळाचा संजीवनी मंत्र

बंधूंनो! सेवामंडळातील अशा कितीतरी कार्ययोजना अजून पुढे यावयाच्या आहेत की ज्यांची मनुष्याच्या जीवनाला अत्यंत आवश्यकता आहे. ह्या सर्व बाबीवर विचारच नव्हे तर सक्रियतेने अंमल करण्याकरिताच सेवामंडळाचा जन्म झालेला आहे. असे कितीतरी प्रचारक लोक आज या मंडळात आहेत की ज्यांनी आपले जीवन त्याच कामाकरिता वाहिलेले आहे आणि आश्चर्य हे की त्यांतील शेकडा ९० लोक हे अगदीच कमी म्हणजे मराठी ३-४ वर्ग शिकलेलेच आढळून येत आहेत; यावरून सामान्य लोकसमाजाच्या हृदयांतील ईश्वर जागृत होत असल्याचे प्रत्यंतर येत आहे व ते योग्यच आहे. कारण 'सेवामंडळ' हे संप्रदायांच्या संख्येत उगीच भर घालण्याकरिता किंवा प्रचलित संप्रदाय, संस्था, जाती व धर्मांशी विरोध करण्याकरिता निर्माण झाले नसून, त्यांच्यातील गुणांचे संमिलन व चुकांचे

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

निराकरण करण्याकरिता, अर्थात् परस्परांवर आज जे शिंतोडे उडवले जातात ती प्रवृत्ती नाहीशी करून सर्वांत बंधुभाव निर्माण करण्याकरिताच उत्पन्न झाले आहे. या दृष्टीने पाहता, आजच्या प्रत्येक भावनाशील व विचारी-अशिक्षित व सुशिक्षित मनुष्याचे हे आवश्यक कर्तव्य आहे की या नवयुगाच्या तत्त्वनिष्ठ परिवर्तनप्रेमी योजनेकडे आपले लक्ष वेधून त्याने आपल्याबरोबर आपले गावही उन्नत करण्याच्या हेतूने या 'श्रीगुरुदेव सेवामंडळा'चे आत्मीयतेने स्वागत करावे; आणि स्वतः त्यांत भाग घेऊन त्याचे तत्त्वज्ञान दुसऱ्यांनाही अवश्य समजावून सांगावे. असे आपण करू तरच आपली पुढे धडगत? आहे, नाहीपेक्षा सध्याच भिकेला लागलेले राष्ट्र, लोळत असलेली माणुसकी, रसातळात गेलेला धर्म आणि छिन्नभिन्न झालेले सामर्थ्य उद्या कोणत्या थराला जाईल हे कोणीही अंदाजे सांगू शकेल. परंतु तसे होऊ नये म्हणूनच आपणांसमोर ही 'सेवामंडळा'ची सर्वांगीण विकासाची योजना ठेवून मी आपणा सर्वांना त्यात भाग घेण्यासाठी आवाहन करीत आहे. तो जगच्चालक परमात्मा आपणा सर्वांना सद्बुद्धि देवो आणि आपल्या पूर्वजांच्या ऋषिमहर्षींच्या यथार्थ उपदेशाने दर्शविलेल्या उन्नति-शिखरावर आपणास सक्रियतेने नेवो, एवढीच त्या विश्वव्यापकाला प्रार्थना करून ही शब्दांची फुले त्याच्या सगुण विश्वरूप चरणी अर्पण करितो.

★★★

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

सामुदायिक प्रार्थनेचे अंतरंग

आपण जगात कसे रहावे, काय करावे, आपली प्रगती करावी की अधोगती व्हावी हे आपल्या मनावर अवलंबून आहे. मनाच्या या अवस्थेला व्यवस्थित ठेवण्यासाठी स्थानमहात्म्यांची सुद्धा काही प्रमाणात आवश्यकता असते. जोपर्यंत माणूस जरा प्रयत्न करून अशा स्थानाची प्राप्ती करून घेत नाही तोपर्यंत त्याला खरे सुख, खरा आनंद मिळू शकणार नाही.

कोणताही आनंद हा दोन गोष्टीवर अवलंबून असतो. मग तो ब्रह्मानंद असो की विषयानंद असो. विषयानंदाला सुद्धा नवरा-बायको-स्त्री-पुरुष हे दोन लागतात. आध्यात्मिक आनंदाची सुद्धा तीच गोष्ट आहे. पवित्र वातावरण आणि मनाची प्रवृत्ती या दोन गोष्टी एकत्र जमविल्याखेरीज आध्यात्मिक आनंद हाताला लागत नाही. ही वृत्ती, ही शक्ती आपण सारखी वाढविली पाहिजे, नाही तर आपण देवळात गेल्यावरही तेथे दगड दिसू लागतील. तीर्थात गेल्यावर फक्त माणसे दिसतील. गंगेत पाणी दिसेल. खरे रूप दिसणार नाही. त्यासाठी आपण आत्मानुभव घेतला पाहिजे. परमेश्वराचे स्वरूप प्रत्येक ठिकाणी शोधायला शिकले पाहिजे. दगडात, माणसात, वाघात, डुकरात सर्वात परमेश्वर आहे अशी भावना आपली पक्की झाली पाहिजे. त्यासाठी सामुदायिक प्रार्थना ही बाब गंभीरतापूर्वक आपण निर्माण केली आहे. समोर रिकामे व स्वच्छ आसन ठेवायचे, एक निरांजन-दिवा लावायचा आणि प्रसन्नपणे श्रीगुरुदेवाचे ध्यान करायचे.

आमची गुरुदेवाची व्याख्या कोणा एका व्यक्तीपुरती मर्यादित नाही. चराचरात भरलेल्या अविनाशी आणि श्रेष्ठ तत्त्वाला आम्ही गुरुदेव म्हणतो. ही शक्ती जळी-स्थळी, काष्ठी-पाषाणी आहे. असा आमचा विश्वास आहे. ती कोणा एका धर्मापुरती जातीपुरती, पंथापुरती मर्यादित नाही. तर सर्व पंथ, धर्म, तीर्थ आणि संप्रदाय जिथं शून्य होतात अशी ती चेतन शक्ती आहे. या शक्तीच्या प्रसन्नतापूर्वक उपासनेला आम्ही सामुदायिक प्रार्थना म्हणतो. ती सत्प्रवृत्तीने, श्रद्धेने आणि शिस्तीने जोपर्यंत आपण करणार नाही तोपर्यंत

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

ती परिणामकारक होऊ शकणार नाही.

अशा प्रकारच्या प्रार्थनेसाठी स्थानही सुंदर असावे. पवित्र असावे, जागृत आणि निवांत असावे. आपल्या भाग्याने गोंदोळ्याची गुंफा हे एक असे ठिकाण आहे. आम्ही आमची साधना याच पवित्र जागी केली.

स्थळाचा सुद्धा काही एक परिणाम असतो. तिथल्या वातावरणाप्रमाणे माणसाच्या वृत्ती बनत असतात. आपण आपल्या रोजच्या व्यवहारात रमलो की माणूस मोहात आणि संसारात फसतो. रिकामी तिजोरी त्याला भरावीशी वाटते. लहान घर मोठे करावेसे वाटते. जुनी वस्त्रे नवी घ्यावीशी वाटतात. पण तोच माणूस स्मशानात गेला की सारेच बदलून जाते. तिथे त्याला एकदम वैराग्याची भावना गिळून टाकते. माझ्या सोबत घरदार, मुलेबाळे, पैसा अडका काही काही येणार नाही याची त्याला जाणीव होते. मी ज्यांच्यावर प्रेम केले, ज्यांच्यासाठी रात्रंदिवस कष्ट केले ते सुद्धा माझ्यासोबत येणार नाही याबद्दल त्याची खात्री पटते. असा हा स्थान-माहात्म्याचा परिणाम आहे.

प्रार्थनेचाही असाच काही परिणाम असतो. तिथे बसल्यावर आपल्या वृत्ती रोजच्या बऱ्या वाईट गोष्टीतून बाहेर निघाल्या पाहिजे. फक्त देवाच्या चिंतनाचाच विचार आपल्यासमोर राहिला पाहिजे. आपल्या मनात आले पाहिजे की देवा, तू कितीतरी लोकांना भेटलास. पुंडलिकासाठी उभा राहिलास. दामाजीसाठी महार झालास. चोख्यासंगे ढोरे ओढलीस. जनीबरोबर गोवऱ्या वेचल्यास. सावत्याला भाजी धुवू लागलास. पण मला केव्हा भेटशील? आपले मन पवित्र करून अशाप्रकारे देवाला हाक मारण्याची जागा प्रार्थना ही आहे. आपल्या मनातले व्यभिचारी, अभिमानी, वाईट विचार काढून टाकण्याचीही जागा प्रार्थना हीच आहे. आपण सारे या भावनेचे प्रार्थना करू तर देवाजवळ जाऊ. देवाचे होऊ.

देव समाजाहून भिन्न नाही. आपल्या सर्व संतांनी देवाचे रूप माणसाच्या रूपात पाहिले, गोरा कुंभाराने समाजासाठी मडकी घडवून देवाचे दर्शन केले. रोहिदासाने जोडे शिवून हे काम साधले. नामदेवाने कपडे शिवले आणि विठोबाला प्राप्त केले. आपण या भावनेने समाजाची काही

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

सेवा करू, समाजासाठी काही त्याग करू तर त्यातून आपोआपच आपली प्रार्थना सफल होईल आणि आपल्याला देवाचे दर्शन होईल.

पण सध्या भलताच जमाना आला आहे. मंदिरात घंटी वाजवली म्हणजे देव भेटतो. नाकापासून शेंडीपर्यंत गंध लावले म्हणजे देव भेटतो अशी माणसाने आपली समजूत करून घेतली आहे. पण माझे तुम्हाला छातीवर हात ठेवून सांगणे आहे की असे करून तुम्ही मराल पण देवाचे दर्शन तुम्हाला होऊ शकणार नाही.

आजचा माणूस स्तुतीसाठी हपापला आहे. कोणी आपल्या गावात काही श्रमदान केले की त्याचे कौतुक झाले पाहिजे असा प्रयत्न करतो. रस्ता झाडला की लोकांनी सत्कार करावा अशी त्याची इच्छा असते. पण त्याला हे समजत नाही की मी माझ्या गावासाठी केले त्यात विशेष काय केले? आपण सर्वांनी सामुदायिक प्रार्थना केली त्यात विशेष असे काय केले? कोल्हेसुध्दा एकत्र येऊन एका स्वरात ओरडतात. मग आपण तर माणसे आहोत. जनावरापेक्षा काही विशेष करणे हे आपले कर्तव्य आहे. अशा प्रकारची जाणीव आपण प्रार्थनेतून उचलली पाहिजे. आपल्या ज्ञानेश्वर महाराजांनी त्या काळात प्रार्थना करून ठेवली आहे.

जे खळांची व्यंकटी सांडो,
तया सत्कर्मी रती वाढो ।
भूता परस्परे जडो,
मैत्र जीवाचे ॥

आमची जात एक, आमचा धर्म एक, आमची सुखदुःखे एक हे यातून आम्हाला शिकता आले पाहिजे.

प्रार्थना ही माणुसकी शिकविण्याची शाळा आहे. आपल्या ऋषी-मुनींनी, साधुसंतांनी याबाबत खूप विचार करून ठेवला आहे. ज्या गोष्टीमुळे आपले हृदय पवित्र होईल त्या गोष्टी आपण कराव्या. दिवसभराच्या रामरगाड्यात चित्त अप्रसन्न झाले असेल तर प्रार्थनेने ते पवित्र व्हावे. माणूस कुठे संतापला असेल, चिडला असेल तर प्रार्थनेमुळे तो शांत व्हावा. विषयी, आसक्त अशी प्रवृत्ती प्रार्थनेमुळे पवित्र आणि अनासक्त व्हावी. अशा प्रकारचे

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

शुभपरिणाम घडून येतील यासाठी प्रार्थना-ज्ञान-चिंतन-मनन या गोष्टी आहेत.

तपस्वी माणसाची शक्ती लाखो मैलावरून एखाद्या पवित्र ठिकाणी काम करीत असते. गोंदोड्याची ही पवित्र गुंफा त्यापैकीच एक ठिकाण आहे. त्या वातावरणाचा फायदा आपण घेतला पाहिजे. त्याचा व्यवस्थित अभ्यास केला पाहिजे.

लोक स्वार्थाने आणि भीतीने देवाची उपासना करतात. ही गोष्ट अत्यंत वाईट आहे. वाघाची भीती वाटते म्हणून लोक 'वाघोबा' देव मानतात. सापाची भीती वाटते म्हणून लोक 'नागोबा' देव मानतात. काही लोक आपल्या लोभी इच्छा पूर्ण करण्यासाठी देवाची स्थापना करतात. त्या देवाला त्या गोष्टी मानतात. माझ्याकडे बाया येतात आणि मुले मागतात. पण कोणाले पोर देण्याचा कारखाना आपण सुरू केला नाही रे बाप्पा! (हंशा)

'नवसे कन्यापुत्र होती,
तरी का-करणे लागे पती'

तुकाराम महाराजांनी असे म्हटले ते एवढ्यासाठीच. नाही तर काम सोपे झाले असते. 'लाग बुवाच्या पाया की होय पोरगं' असें कुठे होत नसते. कोणाच्याही स्वार्थी वासना पूर्ण करण्यासाठी देवाने जन्म घेतला नाही. समाजाची सेवा करा. आंधळ्या-लंगड्यांना मदत करा. उपाशी असतील त्यांना जेवण द्या. अशिक्षित असतील त्यांना शिक्षण द्या. तेव्हा मग देव सापडतो.

कोणताही माणूस सदासर्वकाळ देव राहू शकत नाही. त्याला व्यवहार आहेत, विकार आहेत, रागलोभ आहेत. हे सारे त्याने सोडून द्यावे असे मी म्हणणार नाही. परंतु या सर्वांतून दिवसाकाठी काही काळ तरी तो वेगळा राहिला पाहिजे. ही गोष्ट प्रार्थनेमुळे शक्य होते. प्रार्थनेने सर्व चांगल्या गोष्टीचे, समाजाच्या गरजांचे, उणीवांचे स्मरण व्हावे. आपली सामुदायिक प्रार्थना ही समाजसेवेची, ईश्वर सेवेची दीक्षा देणारी शाळा आहे ही गोष्ट सर्वांना कळावी, तसा अनुभव यावा. यासाठी ही सारी खटपट आहे.

★★★

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

प्रार्थना : राष्ट्रपुरुष निर्मितीची योजना

प्रार्थनाप्रेमी बंधुभगिनींनो,

कोणत्याही कामाला शिस्तीपासून सुरुवात केली की तीत हळूहळू सुव्यवस्था निर्माण होते. पहाडातील दगडातही एक प्रकारचे सौंदर्य असते. परंतु या दगडांना मानव तासून तासून अधिक सौंदर्यसंपन्न बनवितो. एका रांगेत त्याची योजना करून त्यांच्या सहाय्याने महाल उभा करतो. हे दुसऱ्या प्रकारचे सौंदर्य आहे. एक सौंदर्य नैसर्गिक आहे तर दुसरे मानवनिर्मित आहे.

मानवी जीवाकडेही परमेश्वराच्या नजरेतून पाहिले तर त्याचे स्वाभाविक सौंदर्य नजरेस पडते. या दृष्टीला बाह्य संसाराचे महत्व नाही बाह्य सुखदुःखे आणि व्याधि उपाधि यामुळे काहीही परिणाम होत नाही. ही समदृष्टि होय. इथे केवळ आल्यानेच दर्शन होते. याउलट सामान्य माणसाच्या नजरेतून पाहणाऱ्यांना हे सौंदर्य अजिबात दिसणार नाही. तेथे त्याला विषमतेचे, सुखदुःखाचे दर्शन होईल. जशी ज्याची दृष्टी तसे त्याला दर्शन. चोराचे डोळे धनाकडे जातात. विषयांध माणूस भलतीकडे पाहतो. तर सात्त्विक माणूस समोरच्या सात्त्विक बाबींकडे पाहतो. याचा अर्थ एवढाच की सौंदर्य दोन्ही ठिकाणी आहे. परंतु डोंगरात सौंदर्य पहायचे असेल तर वेगळी दृष्टी हवी. राजवाड्यांत सौंदर्य पहायचे असेल तर वेगळी दृष्टी हवी.

मानव-मंदिराची घडण

सामाजिक मूल्ये वेळोवेळी बदलत जातात. त्यानुसार चालीरीतीत, वागणुकीत बदल होत जातो. असे का? तर जगाची इच्छा माणूस सुंदर, सभ्य, सुशील बनावा अशी आहे म्हणून. हे स्वप्न जर साकार करायचे असेल तर आमच्या सामाजिक जीवनातही ही दृष्टी आली पाहिजे. जन्मापासून मरणापर्यंत आणि पूजेपासून लग्नापर्यंतच्या सर्व कार्यक्रमात या सामाजिक प्रवृत्तीचे प्रतिबिंब नाही. आमची दृष्टी बदलली नाही. तर ज्या प्रकारचा समाज बनविण्याची आपली अपेक्षा आहे तसा तो बनणार नाही.

माणसाचे मूळ संस्कार पशूसारखे असतात. काही शास्त्रज्ञ तर

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

सांगतात की मनुष्य हा किडा-मुंगीपासून उत्क्रांत होतहोत वर आला आहे. संस्काराशिवाय माणूस तयार होत नाही. त्याच्या मनावर भोगाचे संस्कार असतात. त्यागाचे नसतात. परंतु माणसात त्याग, सेवा, शिस्त हे गुण वाढीला लागणार नाहीत तोपर्यंत या समाजाला मानवमंदिर मानता येणार नाही.

मित्रांनो, प्रार्थनेची सुंदर रचना पाहिली की एखाद्या सुंदर बागेची आठवण होते. या बागेत समाजपुरुषाचे दर्शन होते. नव्या समाजपुरुषाचे बोलणे, चालणे, उठणे, बसणे सारे काही लक्षात येते. या सर्व गोष्टी काटेकोर अंमलात येण्यासाठी प्रार्थना हाच एक उपाय आहे. ही प्रार्थना जेवढी नीटनेटकी होईल तेवढे आमचे सामाजिक जीवन उन्नत होईल.

जीवन उन्नत करायचे ते आपले की सर्वांचे? स्वतःचा विचार राक्षस करीत असतात. दुसऱ्याचा विचार देव करीत असतात. घरातील फक्त एकच माणूस शिकलेला आणि बाकीची आंगठाछाप असतील तर मी शिक्षित आहे असे कोणत्या तोंडाने त्याला म्हणता येईल? ज्याच्या घरच्या नोकरचाकरापर्यंत हे शिक्षितपणाचे लोण पोहलेले असेल तोच खरा शिक्षित मानला पाहिजे. आपल्या प्रत्येक वागणुकीचा परिणाम आपल्या घरावर, आपल्या भोवतालच्या वातावरणावर व्हायला पाहिजे. हीच गोष्ट शिक्षणाची. असा सुसंस्कारी शिक्षित माणूस घरी आला तर संत दारात आल्यासारखे वाटले पाहिजे.

नवा समाजपुरुष येथेच घडेल

असा नवा समाज निर्माण करतांना राम, कृष्ण हनुमान इत्यादि अवतारी पुरुषांच्या तत्त्वज्ञानाचे दर्शन आम्हाला व्हायला पाहिजे. केवळ देवाच्या मूर्तीच्या दर्शनाने आम्ही आता थकलो. आम्हाला कृष्णाचे दर्शन गीतेतून झाले पाहिजे. मारुतीचे दर्शन म्हणजे त्याच्या एकनिष्ठ सेवावृत्तीचे दर्शन आहे. कृष्णाने या भारतात भक्तीचे आणि कर्माचे वातावरण निर्माण करावे आणि आम्ही मात्र कृष्णाची एक मूर्ती हातात घेऊन मिरवावे ही दशा आता संपली पाहिजे.

आता हे दर्शन विश्वाच्या प्रत्येक अनुरेणूतून झाले पाहिजे. हे सारे

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

बळाने, धनाने, सत्तेने किंवा पांडित्याने होणार नाही तर मानवावर चांगले संस्कार घडवूनच ते होणार आहे. आज अशा पुरुषाला पाहण्याची साऱ्या जगाला भूक लागून राहिली आहे. आणि सर्वांची अशी खात्री आहे की असा पुरुष भारतच निर्माण करील.

भारताची त्यागवृत्ती

या भारतात एकपत्निव्रताचे तेज आहे. अध्यात्माचे रक्त अंगात खेळत आहे. ज्या महात्म्याने केवळ सत्याचा आश्रय घेऊन भारतात रक्तहीन क्रांती घडवून आणली त्या महात्मा गांधींना सारे जग आदर देते. आणि म्हणूनच असा माणूस निर्माण होऊ शकणारी भूमी भारत आहे. पण आज जणु तो महानिद्रेत आहे. पाश्चिमात्य देशात आपण सगळीकडे भोग प्रवृत्ती वाढलेली पाहतो. पण भोगाने कधीच शांती मिळत नाही हे सत्य भारताला समजलेले आहे. भारतीय माणूस हा एवढ्यामुळे अल्पसंतोषी, पापभीरू आहे. म्हणून हीच भूमी नव्या पुरुष्याच्या जन्मासाठी योग्य अशी आहे आणि असा पुरुष आमच्या येथे निर्माण व्हावा एवढ्यासाठी आमची सामुदायिक प्रार्थना आहे.

मित्रहो, ही प्रार्थना आपल्या जीवनात मुरू द्या. पावसाळ्यात भरपूर पाणी आणि उन्हाळ्यात कोरडे ठणठण अशी स्थिती नको. चातुर्मास्यानंतरही प्रार्थना ही तुमच्या जीवनातील एक आवश्यक बाब म्हणूनच चालू राहिली पाहिजे.

★★★

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

प्रार्थनेमुळे जीवनोद्धार

बंधु-भगिनींनो,

तुमच्या हृदयात प्रार्थनेची आठवण सुरू होते तेव्हापासूनच तुमची प्रार्थना सुरू होत असते. तो क्रम असा की आधी प्रार्थनेची आठवण होते. नंतर संकल्प जागा होतो. त्यानंतर प्रार्थनास्थळी जाण्याचे विचार सुरू होतात. नंतर बुद्धीचा निश्चय होतो आणि या सर्वानंतर मनुष्य प्रार्थनेला जाऊन बसतो. हे कार्य अधिक संस्कारित होण्यास प्रार्थनेतील प्रत्येक शब्दाचा ठसा अंतःकरणावर उमटावा लागतो. सामुदायिक प्रार्थनेचा रंग मनावर पक्का उमटला पाहिजे. मेल्यावरसुद्धा हा संस्कार टिकला पाहिजे. हेच प्रार्थनेचे बीज आहे. ईश्वर-भजनाचे हेच तात्पर्य आहे. त्याचा संस्कार मनावर इतका झाला पाहिजे की मरणकाळी सर्व संसाराची आठवण न राहता फक्त हा प्रार्थनेचा संस्कारच समोर दत्त म्हणून उभा राहिला पाहिजे.

"याच साठी केला होता अट्टाहास
शेवटचा दिस गोड व्हावा"

असे तुकाराम महाराज म्हणतात ते याच अर्थाने.

मित्रांनो, तारुण्याचे आयुष्य तारुण्य असेपर्यंतच असते. धनाचे आयुष्य धन असेपर्यंत टिकते. पण ईश्वर-भजनाचे आयुष्य जगात देव आहे तोवर राहणार आहे. मनुष्याच्या जन्मोजन्मी ते टिकणारे आहे. म्हणून या प्रार्थनेत चित्त शुद्ध करून आपल्या मनात परमेश्वराचे प्रेम निर्माण करायला पाहिजे. या गोष्टीचा निदिध्यास लागला पाहिजे.

"विषय तो त्याचा, झाला नारायण"

अशी अवस्था प्राप्त झाली पाहिजे.

वृत्ती ईश्वरचरणी लीन ठेवा

जो पुरुष ज्या वस्तूवर पूर्ण प्रेम करू लागतो तेव्हा त्या दोघात एकरूपता निर्माण होते. लैला-मजनूची गोष्ट सर्वांना माहीत आहे. मजनू हा भोवतालच्या निर्जीव वस्तूतही लैलाचे रूप पाही. एकदा ईश्वराला त्याच्या

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

भेटीची इच्छा झाली. देवाने मजनूला म्हटले,

"तू लैलाचे प्रेम माझ्यावर केले असतेस तर मी तुला मोक्षाचा अधिकार बनविला असता."

पण बेफिकीर मजनू म्हणाला,

"जर तुला माझ्या भक्तीची गरज होती तर तू लैलाच्या रूपात का नाही आलास?"

मजनूची वृत्ती ज्याप्रमाणे आपल्या लैलाजवळ स्थिर होती त्याप्रमाणे आपली वृत्ती परमेश्वराजवळ स्थिर झाली पाहिजे. असे झाले म्हणजे,

भुलली वो माय आता, कवणा ओवाळू
जिकडे पाहे तिकडे, अवघा कृष्णगोपाळू

अशी आपली स्थिती होईल. किंवा गोपींची ज्याप्रमाणे,

लाली मेरे लालकी जित देखू उत लाल
लाली ढूंढन मैं गयी मैं भी हो गयी लाल

अशी तन्मय स्थिती होते असे त्याप्रमाणे आपली होईल.

सर्व जीव सारखेच

ईश्वराचे ठिकाणी मनुष्य लीन झाला की मनात सर्व समभाव येईल. नाटकातली पात्रे ज्याप्रमाणे वेगवेगळ्या भूमिका वठवूनही आपली ओळख विसरत नाहीत त्याप्रमाणे परमेश्वरापाशी लीन झालेला माणूस जगात वावरत असतो. एकदा माणसाला ही अवस्था प्राप्त झाली की गरीब-श्रीमंत, लहानथोर असे भेद आपोआपच गळून पडतात.

काही लोक प्रार्थनेला येतांना आपल्या शारीरिक व्याधी दूव व्हाव्यात या भावनेने येतात. असे होणेही वाईट नाही. अहो, जेथे कोणीच मदत करीत नाही तेथे देवाचा धावा करणे काय वावगे आहे? त्या माणसाची आज तेवढीच प्रगती आहे. परंतु ही पहिली पायरी होय. देव शेवटच्या पायरीवर असणार. प्रार्थना करतांना ही जाणीव आपल्याला असली पाहिजे. त्याशिवाय नराचे नारायण होता येणार नाही.

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

बंधुंनो, या प्रार्थनेत थोडी कसरतही आहे. पण प्रार्थनेचा परिणाम आमच्या व्यवहारात उमटला पाहिजे. प्रार्थना आपण मानवजातीच्या आरंभापासून करीत आलो आहोत. परंतु मध्येमध्ये प्रार्थनापद्धतीचा तोल सरकत असतो आणि भावनेऐवजी पद्धतीला महत्त्व मिळत असते. आणि मग त्या प्रार्थना-पद्धतीचा जीर्णोद्धार होत असतो. आपली सामुदायिक प्रार्थना हीसुद्धा जीर्णोद्धार झालेली प्रार्थनाच आहे.

नव्या विचारांना प्रचारक हवे

या प्रार्थनेतून जी माणुसकी शिकवण देण्यात येते ती भाषणातूनही देता येईल. पण हा मार्ग तितकासा प्रभावी नाही. जगात मत परिवर्तनाचे मार्ग दोन. एक सक्तीचा आणि दुसरा प्रेमाचा. सक्तीचा मार्ग टिकाऊ नाही. पण प्रेमाचा मार्ग मात्र अंतःकरणाचा ठाव घेत असतो. हाच धर्ममार्ग होय. यासाठी कीर्तने, देवळे, तीर्थाटने इत्यादि साधने आहेत. ही साधने अपुरी असू शकतात. आज तर त्यातील मूळ दृष्टीही निघून गेलेली आहे. आज पुन्हा भारतात सामुदायिक भावना निर्माण करावयाची असेल तर नवे विचार पसरविणाऱ्या प्रचारकांची संख्या वाढत गेली पाहिजे. एकेका गावात एकेका प्रचारकाने किंवा साधूने बसून तेथील लोकांना माणुसकीचे धडे दिले पाहिजेत.

स्वामी विवेकानंदाना अमेरिकेच्या प्रवासात काही गुराखी बेटले. त्यांना स्वामींनी विचारले, "हा कोणाचा देश आहे?"

गुराखी चटकन् म्हणाले, "आमचा."

विवेकानंदांना ते उत्तर ऐकून गहिवरून आले. ते म्हणाले,

"माझ्या देशातील शिकलेल्या तरुणांनाही ही जाणीव नाही हे केवढे दुर्दैव!"

बंधूनो, ही प्रार्थना एवढ्यासाठीच आहे. प्रार्थनेद्वारे आपल्याला नवा समाज निर्माण करावयाचा आहे. असे पवित्र विचार आपल्या मनात येऊ द्या. आणि या भारताच्या नव-निर्मितीला हातभार लावा. ईश्वर तुमच्याकडून हे काम करवून घेतो.

★★★

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

शंका-समाधान

प्रश्न : तुम्हाला कोणत्याही संस्थेची, पक्षाची व धर्माची माणसे प्रार्थनेत आलेली चालतात काय?

उत्तर : प्रार्थना ही विश्वातील सर्व पक्षांना, जातींना, धर्मांना व्यापणारी आहे. ज्यांना ही जाणूनबुजून अमान्यच असेल त्यांच्याकरिता नाइलाज आहे. परंतु वास्तविक ती सर्वांकरिताच आहे आणि म्हणूनच सर्वांनी तिच्यात अवश्य संमिलित व्हावे असा आमचा मानस आहे.

प्रश्न : 'सर्व धर्म समान' असे तुम्ही मानता काय?

उत्तर : धर्मामध्ये 'सर्व' व 'आपला' असा भेद मंडळाला आवडत नाही. जे भिन्न आहे ते त्याचे कर्म किंवा साधन आहे. धर्म हा एकच असतो. तरी परस्परांनी भिन्न मानलेल्या धर्माबद्दल परस्परांनी आदराने पहावे व आपापली साधना, धर्माचे यथार्थ स्वरूप जाणून, योग्य त्या तत्त्वज्ञानावर चालवावी, त्याकरिता मानलेले धर्म सोडण्याचे मुळीच कारण नाही.

प्रश्न : धर्म समान आहेत म्हणजे काय?

उत्तर : समान असणे म्हणजे समान आदराला पात्र असणे. ज्याप्रमाणे बापाच्याच इतके चुलते अथवा इतर वडील पुरूषही आदरास पात्र असतात त्याप्रमाणे.

प्रश्न : धर्माधर्मातील भेद विसरून प्रार्थनेसाठी एकत्र येणे कसे शक्य आहे?

उत्तर : सर्वांनी आपापले विशिष्ट धर्म सोडून एकच प्रार्थना करावी याला मी महत्व देत नाही, तर प्रत्येकाने प्रत्येकाच्या मानलेल्या धर्माला आदराचे स्थान देऊन, परस्पराकडे सहानुभूतीने बघावे, एवढेच मला त्यात पाहिजे आहे.

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

प्रश्न : भिन्न धर्माचे असो, पण एकाच धर्मातील पंथोपंथाचे व सांप्रदायांचे लोक एकत्र येतील असे तुम्हाला वाटते काय?

उत्तर : त्यांना जर आपण हे पटवून देऊ शकलो आणि त्यात हेच प्रचारित करू लागलो तर हे सर्व शक्य आहे. पंथोपपंथ नव्हते तेव्हा जर निर्माण झाले, तर आहेत त्यातून नाहीसे कां होणार नाहीत? विचारपूर्वक प्रयत्न मात्र असावा.

प्रस्न : समाजसेवा, राष्ट्रसेवा, यांचा प्रार्थनेशी काहीच संबंध नसतांना, तुम्ही तो ओढून कां लावता?

उत्तर : प्रार्थनेशिवाय जी जी सेवा आहे, ती कार्याला विशुद्ध ठेवू शकत नाही. त्यामुळेच सर्व सेवेला स्फूर्ती व पूर्ती प्राप्त होते. यासाठी सेवा कोणत्याही ध्येयाची असो, प्रार्थना ही करावीच लागते. जगाचे सर्वोच्च ध्येय आणि सर्वांगीण उन्नती साधण्याला प्रार्थना मदत देऊ शकते. प्रार्थनेमुळे बुद्धीला योग्य चालना मिळू सकते. सामर्थ्य व अनुभव मिळू शकतो, असे मंडळाचे मत आहे.

प्रश्न : संघटना करणे हाच प्रार्थनेचा उद्देश असेल तर दुसऱ्या एखाद्या पायावर संघटना का उभारत नाही?

उत्तर : संघटना अनेक कार्यासाठी असू शकते व त्यानुसार संघटनांचे मार्गही विविध राहू शकतात. प्रार्थनेच्या द्वाराने केलेली संघटना ही विश्वव्यापक वृत्ती निर्माण करणारी संघटना आहे.

प्रश्न : हल्ली जगाची प्रवृत्ति धर्मापेक्षा विज्ञानाकडे अगर भौतिक शास्त्रांकडेच जात आहे. अशा परिस्थितीत धर्माच्या पायावर संघटना होणे कितपत शक्य वाटते.

उत्तर : जगातील सर्व तत्वांचे विज्ञान शेवटी 'धर्म'च सांगणार आहेत, शब्दभेद वगळल्यास, विज्ञानाची धडपड ही धर्माचे यथार्थ स्वरूप जाणण्यासाठी आहे असेच सिद्ध होईल. धारणा अखंड टिकविण्याच्या नियमांसच धर्म म्हटले जाते. म्हणून धर्मदृष्टी सोडून बाजूला जाणे मंडळाला आवडत नाही. धर्माकरिताच विज्ञान शोधावे, विज्ञानामागे

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

धर्म क्षणोक्षणी नाचवू नये असे मला वाटते. आजपर्यंत धर्मानेच संशोधन केले व मग त्याचे विज्ञान ठरविले गेले.

प्रश्न : प्रार्थनेमुळे मनुष्य प्रयत्नाचा अभाव दाखवील ती प्रार्थनाच असू शकत नाही. दैवी शक्तीलाही प्रयत्नच हवे असतात आणि प्रयत्नास शुद्ध ठेवण्यासाठी प्रार्थना पाहिजे असते.

उत्तर : जी प्रार्थना प्रयत्नाचा अभाव दाखवील ती प्रार्थनाच असू शकत नाही. दैवी शक्तीलाही प्रयत्नच हवे असतात आणि प्रयत्नास शुद्ध ठेवण्यासाठी प्रार्थना पाहिजे असते.

प्रश्न : जगामध्ये देव नाही असे मानणाऱ्या लोकांना प्रार्थनेत स्थान कोणते?

उत्तर : धारणा ही सर्वच मतांच्या लोकांना गोड वाटली पाहिजे. ही धारणा ईश्वराकरिता नसून समाजसुधारणे करिताच आहे. ईश्वराला प्रार्थना नको, काम हवे आहे. ते काम निर्माण करण्याची कला म्हणजे प्रार्थना.

प्रश्न : प्रार्थनेत 'श्रीगुरुदेवा'-ना उद्देशून संबोधण्यात येते ते कोणाला उद्देशून?

उत्तर : ज्ञानमय बोधाला, दैवी शक्तीला मार्ग - दर्शकाला, जगद्व्यापी ईश्वराला, 'गुरुदेव' असे संबोधण्यात येते.

प्रश्न : 'श्रीगुरुदेव' ही व्यक्ती आहे की शक्ती?

उत्तर : शक्ती भरलेली व्यक्ती आहे. पण ही व्यक्ती म्हणजे कोणतीही एकादी माणसाची आकृती नसून, ज्ञानाची मूर्ती आहे.

प्रश्न : सामुदायिक प्रार्थनेमुळे नवीन संप्रदायच निर्माण होत नाही काय?

उत्तर : सर्व संप्रदायांना एकत्रित करणारा हा संप्रदाय म्हटला तरी आज त्याची जरूरी आहे असे मंडळ समजते. हा संप्रदाय विशिष्ट सांप्रदायिकतेसाठी नाही, तर आवश्यक कार्यासाठी आहे.

प्रस्न : संप्रदाय समन्वयाचा हेतु धरणाऱ्याने नवीनच संप्रदाय करणे कितपत इष्ट आहे?

उत्तर : यात नवीन असे काहीच नाही. जुनेच परंतु आजच्या भाषेतून

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

सुलभतेने एकत्रित करणे व समयोजित स्वरूपात चांगल्या गोष्टींना चालना देणे या कृतीला संप्रदायाचे स्वरूप जर आले, तर त्याला मंडळाचा नाईलाज आहे. उद्देश मात्र तसा नाही.

प्रश्न : सर्व धर्म समन्वय, विश्वबंधुत्व, याचा अर्थ तुम्ही काय करता?

उत्तर : परस्परात असलेली परस्परांची उत्तम तत्त्वे परस्परांना आदराने कळविणे व योग्य ते सर्वांनी मान्य करणे हाच उचित समन्वय आहे. जग हे सर्वांकरिता आहे. त्यात सुखी रहाण्याचे जे मार्ग आहेत ते अवलंबिणे याला मी विश्वबंधुत्व समजतो. या सर्वांचा अर्थ एवढाच की आम्ही सौंदर्याने भिन्नत्व दाखवावे, साधन दृष्ट्या भिन्न असावे पण तत्त्वाने वा हेतूने भिन्न असू नये. मानव्यतेने रहावे व परस्परांना पोषक व्हावे हाच देवाचा मार्ग आहे.

प्रश्न : 'धर्म हेच भांडणाचे मूळ आहे' असा इतिहास असताना धर्मालाच ऐक्याचा पाया करू पहाणे धाडसाचे नाही काय?

उत्तर : बुद्धीने पूर्ण नसलेल्या लोकांनी असा इतिहास बनविण्याचे धाडस केले आहे. पण हे खरे नव्हे. भांडणाचे मूळ स्वार्थ, विषयासक्ति,आपल्या वर्चस्वाची महत्वाकांक्षा व अज्ञान हे आहे. धर्म नव्हे. विचाराने सर्वांना हे कळेल. निमित्त कोणतेही असो, पण धर्म भांडण मुळीच शिकवीत नाही असा मंडळाचा भाव आहे.

★★★

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

सामुदायिक प्रार्थनेचा महामंत्र

प्रिय सज्जनांनो!

मनुष्य हा आशातंतूच्या आधारेच वर चढत असतो आणि निराशावृत्तीनेच खाली खेचला जात असतो. ज्याची आशा ज्या योग्यतेची असेल तो त्या योग्यतेचा धनी क्रमाक्रमाने व कर्तव्याच्या तयारीने होत असतो. वस्तुतः आशा नसेल तर कर्तव्यच उरत नाही व कर्तव्य नसेल तर फलप्राप्तीही होत नाही. आशा व कर्तव्य ही जोडगोळी परमेश्वराने प्रत्येक जीवाच्या आत भरलेली आहे. पण त्या जोडगोळीचा स्फोट किंवा विकास मनुष्याच्याच जन्मामध्ये होऊ शकतो; इतर योनीमध्ये त्या गुप्तच राहतात. आणि मनुष्यालाही कोणत्या गोळीचा स्फोट कसा करावा हे सहवासाने कळले नसल्यास तोही इतर जीवयोनीप्रमाणे तसाच काळ कंठीत राहून जन्म गमावून बसत असतो.

बंधूंनो! ज्याने आपल्या आशेला कर्तव्याची जोड देऊन बुद्धिविकासाच्या मार्गाने अवलंबन केले असेल तो पुरुष बुद्धिपेक्षाही वरिष्ठ अशा ब्रह्मधीपर्यंत किंबहुना ईश्वराच्या स्वरुपापर्यंत पोहोचत असतो. अर्थात् तो जेव्हा ते विकासज्ञान प्राप्त करीत जातो तेव्हा त्याच्या कार्याचेही मोजमाप समाजात वाढत राहत असते. बुद्धिचा पूर्ण विकास म्हणजे आध्यात्मिक तत्त्वाची उभारणी व आध्यात्मिक तत्त्वाची पूर्णता म्हणजे ब्रह्मधीस्थितीचा अनुभव! हा अनुभव ज्या महापुरूषाला येतो, त्यालाच 'स्थितप्रज्ञ' असे म्हटले जाते. अर्थात् तो दुःखाने दुःखी होत नाही आणि सुखात हर्षही मानीत नाही, तर दोन्हीच्या ठिकाणी आपल्या स्वाभाविक वृत्तीचीच धारणा ठेवीत असतो.

त्या महापुरूषाच्या वृत्तीचा जगाशी असा घनिष्ट संबंध येतो की विश्वात जेथे कोठे जे काही विपरीत दिसत असेल ते सर्व माझ्याच ठिकाणी झाले आहे, असे समजून तो त्याची व्यवस्था लावण्याच्या विषयाकडे कर्तव्याने ओढल्या जात असतो; कारण 'सर्व जग सुखी राहो' अशी निर्मळ व प्रेमळ भावना त्याला वरत असते. खऱ्या नैराश्याचा अनुभव घेणाऱ्या त्या महाभागाच्या हृदयात ही विश्व हिताची आशा मात्र, देहप्रारब्ध आहे तोपर्यंत

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

राहत असते व या स्थितीलाच 'मनुष्याच्या विकासाची परिसीमा' म्हणत असतात. अर्थात् हे कार्य ज्याचे कडून आशेने व कर्तव्यबुध्दीने होऊ लागते तोच 'साधु' म्हटला जातो आणि ज्याच्यासमोर ही आशा वेगाने काम करते त्यालाच 'अवतार' म्हणण्यात येत असते.

उपासकांनो! ही स्थिती प्राप्त करून घेण्याचे जर काही साधन असेल, तर ते-अभेद, अविरोध, पंथादिविरहित, धर्म व देश यांची आकुंचित वृत्ती ज्यात नाही व जो आपल्या अनंत ब्रह्मांडातील सर्व भूतमात्रांच्या कर्तव्याप्रमाणे ज्याला त्याला स्थान देतो, अशा सर्वगत् परमात्म्यांची प्रार्थना करणे, हेच होय! त्याची महान गती आकलन होत नाही म्हणून आपापल्या परीने धर्माची, संप्रदायाची व विविध साधनांची पाऊलवाट किंबहुना पळवाट काढणे हे विद्याध्ययनाप्रमाणे ठीक आहे. ज्याप्रमाणे मॅट्रिक म्हणजेच विद्या नव्हे किंबहुना एम.ए. होणेही पूर्ण विद्या संपन्न होणे नव्हे; त्याप्रमाणेच पंथ, धर्म किंवा देश यांनी मर्यादित अशा भावनेनी केलेली प्रार्थना म्हणजेच प्रार्थनेची पूर्तता नव्हे! वास्तविक पाहिले तर प्रभू ज्या दिशेने, ज्या उद्देशाने व ज्या कार्य पद्धतीने जगात व्याप्त आहे, त्या पूर्ण ईश्वरीतत्त्वाला अनुसरून त्यात समरस होण्याकरिता जे धारिष्ट्य, जे चिंतन किंवा जो बोध अंगिकारला पाहिजे त्यालाच 'खरीखुरी प्रार्थना' म्हणता येईल.

जी गोष्ट ज्याचेजवळ विशेषत्वाने असते, ती त्याला मागणे याचेच नाव प्रार्थना! जी गोष्ट ज्याने जवळ अंशत्वाने आहे ती त्यास आपल्या स्वार्थबुद्धीने मागितल्यास त्या मागणीस स्वार्थाची याचना किंबहुना आत्मवंचना म्हणणेच योग्य आहे, अर्थात् त्यामुळे देणारा संतुष्ट होत नसून तसली 'प्रार्थना' करण्याची किंमत करून त्याला क्षुद्र स्वार्थी समजून-तो फळ देत असतो आणि त्यातच जर तो संतुष्ट झाला तर त्याची किंमत करून जात असतो. कामधेनूपुढेताकाची याचना करणे जसे हास्यास्पद, तसेच सर्व सामर्थ्यापुढे तुच्छ याचना करणे हेही मूर्खपणाचेच नाही का? फळ घेण्यापेक्षा फळ देणाराच जर प्राप्त करून घेतला; त्याची शक्ती हृदयात साठविण्याचा जर प्रयत्न केला तरच ती प्रार्थना उचित समजली जाईल!

बंधूनो! तुमची आशा ज्या ज्या मार्गाने जात असेल त्या त्या मार्गाने ती सर्व प्रार्थनाच होत आहे; पण आशेचा फळ देणारा ज्या किंमतीचा असेल

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

त्याप्रमाणेच तो कमी अधिक फळ आपणास देणार हे निश्चित आहे. पहिलवानाची प्रार्थना शरीराच्या मजबूतीचे ज्ञान देईल, वैद्याची प्रार्थना निरोगी राहण्याची युक्ती सांगेल. स्त्री-संपत्तीची प्रार्थना आपली दैहिक सोय उत्तम ठेवील व मित्रांची प्रार्थना त्यांच्या शक्तीप्रमाणे काय ते फळ देईल. पण तुम्ही जर ईश्वराच्या अगाध सामर्थ्याची, अखंड सुखाची व दिव्य ज्ञानाची इच्छा करीत असाल तर तुम्हाला आपली बुद्धि जगव्यापी करीत व ईश्वराच्या अफाट वृत्तीशी मिळवून त्या अखिल विश्वात नटणाऱ्या परम परमेश्वराची प्रार्थनाच त्याच्या नियमाप्रमाणे करावी लागेल व तेव्हाच जीवाचे पूर्ण समाधान होईल!

सज्जनांनो! तुम्हाला प्रार्थनेची तत्त्वे जसजशी कळतील तसतशी तुमची आत्मचिंतना वाढू लागेल नि ज्या प्रमाणात ही चिंतना वाढू लागेल त्याच प्रमाणात कार्यही तुमच्याकडून घडत जाईल. जशी पाण्याच्या नळाची 'डिग्री' वाढती दिसली की पाणी सगळीकडून वाढले असे समजण्यात येते, त्याप्रमाणेच प्रार्थना वृत्ती वाढली की तितक्याच प्रमाणात कार्यही प्रत्ययाने वाढले असे दृष्टीस येत असते. प्रत्येकाचे कार्य ही त्याची कृतप्रार्थनाच होय. प्रार्थना म्हणजे कार्यशक्ती, प्रार्थनेला सक्रियतेची व कार्याला प्रार्थनेची तेवढीच आवश्यकता आहे. यादृष्टीने स्वधर्म-सेवेच्या खऱ्या धर्माची आपल्याला जाणीव व्हावी धर्माच्या समष्टिभावाने पुनरुज्जीवन व्हावे, निरूढधर्मतत्त्व प्रस्थापित व्हावे, आज परिस्थितीतील भिन्न संप्रदाय समाज व संस्था यांचे वैयक्तिक व कार्यांतर्गत मतभेद एकाधिष्ठानी तरी लीन व्हावेत व त्यातील ऐक्यातून जनसेवेचा मोकळा मार्ग सर्वांचे हाती लागावा, या दृष्टीने श्रीगुरुदेव सेवामंडळाची आखणी निसर्गाने घडवून आणली आहे.

मित्रांनो, सर्व साधारण जनसमाज एका पद्धतीत आणावयाचा म्हणजे प्रत्येकाला आपले स्वतंत्र मत अमलात आणण्याचे होत नसते, त्याला एकसूत्रता ही अत्यावश्यक आहे. ती एकसूत्रता आमच्यात मानवधर्माच्या नात्याने निर्माण व्हावी म्हणून सामुदायिक प्रार्थनेचा उपक्रम अत्यावश्यक आहे.

★★★

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

सामुदायिक जीवनासाठी सामुदायिक प्रार्थना

प्रिय बंधुभगिनींनो,

प्रार्थनेतून सामुदायिक जीवनाचा विकासही होत होता. ही कामे गावातील साधू, भटजी किंवा जोशीबुवा यांच्यामार्फत चालत. त्यांना दुसरी कर्मेच नसत. त्यांचे भरणपोषणही - गावामार्फत चाले. गावातील सर्वांनाच ते सन्मार्गाचेच धडे देत. पण तो जोशीबुवा दक्षिणा आणि लाडू यातच पुढेपुढे दंग राहिला. ती प्रथा गेली आणि सामुदायिक विकासाचा डोलाराही ढासळला. बरोबरच आहे. पाण्याचा धंदा आग विझवायचा पण उद्या पाणीच ज्वालाग्राही निघाले तर आग कशी विझवणार? कुंपणानेच शेत खाल्ले तर पिकाचे रक्षण कसे होणार? राजाच अन्यायी आणि स्वार्थी निघाला तर न्याय कुठे मिळणार? तसाच हा पंडित स्वार्थी झाला आणि त्यामुळे अशी स्थिती झाली. आज तीच गोष्ट नव्याने शिकवावी लागत आहे ती यामुळेच. ही प्रार्थना आमच्या जीवनाचे पैलू शुद्ध करते. ही प्रार्थना मंदिरातच होत नसून ती आपल्या कार्यक्षेत्रातही होऊ शकते. मात्र त्यात सामुदायिक विकासाची आठवण आम्हाला असावी. शेतकऱ्यांची प्रार्थना देशाला भरपूर धान्य पुरविणे ही आहे. तर शिक्षक उत्तम, सुशील तरुण निर्माण करण्याने प्रार्थनेचं फळ मिळवू शकेल. दुकानदार गिऱ्हाईकाला समाधान देऊन आपली प्रार्थना करीत असतो. याप्रमाणे आमच्या वैयक्तिक जीवनाचा शुद्ध प्रवाह सामाजिक प्रवाहाशी मिळण्याकरिता धाव घेत असेल तर आमचे काम हीच प्रार्थना होऊ शकेल. या सर्व गोष्टींचे धडे देण्यासाठी आणि सामुदायिक जीवनाचे दर्शन घडण्यासाठी आम्ही सामुदायिक प्रार्थना करायला पाहिजे.

मनोरंजनात विशुद्ध जीवनप्रवाह

मनुष्य नेहमीच गंभीर राहू शकत नाही. त्याला कुठेतरी मनोरंजन पाहिजे. त्याकरिताच शिमग्यासारखे सण निर्माण झाले आहेत. त्यातसुद्धा काही तत्त्वे भरलेली आहेत. पण आज त्यांचा विपर्यास झाला. आमच्या ऋषींनी तर दिवाळीत शेणाच्या महिषासुराचीही पूजा करायला सांगितले आहे.

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

ज्या खतापासून जीवनोपयोगी वस्तू प्राप्त होतात त्याचीसुध्दा पूजा करावयाची ही थोर दृष्टी त्यामागे आहे. आमच्या धर्मात अशी कोणतीही प्रथा नाही की जिच्यात जीवनाचा अर्थ भरलेला नाही. पण त्यातील अर्थ आज विसरला गेल्यामुळे सारा घोटाळा झाला आहे. आता हा प्रवाह पुन्हा जीवनात वाहविण्याचा आपण प्रयत्न केला पाहजि. प्रत्येकाच्या जीवनांत सौंदर्य आणण्याचा आपण प्रयत्न केला पाहिजे. प्रत्येकाच्या जीवनांत सौंदर्य आले की त्याचे राहण्याचे गाव आपोआपच सुंदर होईल. हाच परमेश्वर प्रसन्न करण्याचा मार्ग आहे. पूर्वीच्या काळी ही दृष्टी होती, म्हणून सर्व लोक सुखी होते. त्यात जर कोणी दुष्ट प्रवृत्तीचे लोक निर्माण झाले तर त्यांचा नाश करण्यासाठी अवतारी पुरुषांची बलाची उपासना सांगितली आहे.

दुर्बलाला काहीच करता येत नाही.

जो मनुष्य बलहीन आहे तो या जगात काहीच करू शकत नाही. दुर्बल समाजावरही तो प्रसंग येतो. म्हणून दुर्जनावर विजय मिळविण्याकरिता आणि दुष्ट प्रवृत्तीला नष्ट करण्याकरिता आपण बलवान झाले पाहिजे. यात देशाचेही भले आहे. अशा रीतीने बलवान, चारित्र्यवान असे जे कर्मयोगी आहेत त्यांच्या पाठीशी देव उभा राहिलेला आहे. गोरा, सावता, जनाबाई यांच्या उदाहरणावरून हेच दिसते. अशा तऱ्हेने आजही आपणास या गोष्टी अंगी बाणवावयाच्या आहेत. या वर्गात एक महिनाभर हेच सांगितले गेले. जे अप्रगत आहेत. त्यांना प्रगत करा. कोणाचा द्वेष करू नका. कोणावर टीका करू नका. श्रमदान गावागावातून सुरू करा. हीच तुमची प्रार्थना आहे आणि यासाठी,

"जे जे आपणासी ठावे ते ते इतरांशी शिकवावे
शहाणे करूनी सोडावे सकळजन"

ही समर्थांची उक्ति लक्षात ठेवा आणि

"अवधाचि संसार सुखाचा करीन आनंदे भरीन तिन्ही लोक"

अशी महत्वाकांक्षा मनात घेऊन हा संदेश घरा-घरात पोचवा.

★★★

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

Digitization by Arya Samaj Charitable Foundation, Chennai

धर्ममूर्ती राष्ट्रसंत तुकडोजी महाराज

राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराज म्हणजे मानवांचे महादैवत! भूलोकींचे ब्रम्हकुंवर! भारताचे महर्षी व धर्माचे बोधचिन्ह! वेदान्त अर्भकाप्रमाणे त्यांच्या पुढ्यात खेळत असे. जगावे म्हणून तत्वज्ञान त्यांच्या आश्रयाने जगत असे. सन्मान प्राप्त व्हावा म्हणून धर्म त्यांच्या आकाराने हिंडत असे. ओज नि तेजाने, वैभवाने नांदावे म्हणून भारतवर्ष त्यांच्या मनात प्रेमोर्मी होऊन भजनात रंगत असे. संपन्न व्हावे म्हणून समाज त्यांच्या वाणीतून आपले मनोगत वदवीत असे. देव, धर्म व देश या त्रयीसाठी निधड्या छातीने लढत देणारी धर्ममूर्ती म्हणजे श्रीसंत तुकडोजी महाराज! नेत्र ब्रम्हस्वरूपी, कृती धर्मरूपी व वाणी अमृतरुपी हा दिव्य सोहळा राष्ट्रसंतांच्या अंगरुपाने नटून क्रीडत असे. ज्ञानोबांच्या दिव्य परंपरेचा वारसा त्यांना लाभला होता.

आपल्या गुरु घराण्याची महान थोरवी सिद्धपणे जतन करणारा महापुरूष गेल्या अडीचशे वर्षात तरी राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराजशिवाय अन्य कोणी आढळत नाही. कठोर तपस्या, अखंड जनसेवा, नित्य ब्रम्हानुसंधान, अमोघ वक्तृत्व, रसाळ व हृद्य कवीत्व, धर्मासाठी लढावू वृत्ती इत्यादी वैशिष्ट्यांचा त्यांच्यासारखा महात्मा लाखात एखादाच! त्यांची खंजरी - भजने म्हणजे मृतमने अमर व्हावीत, निष्क्रिय पराक्रमी व्हावा, दुर्बलांचे ही बाहु स्फुरावेत, घमेंडखोराचे धाबे दणाणावे. दुर्जनांच्या छातीत धडक भरावी अशा अत्यंत ओजस्वी, प्रभावीपणे संपूर्ण भारतात सतत गर्जत राहिली. लाखो तरुण त्यांनी खडबडून चेतविले. संतत्व व सेवकत्व विश्वपृष्ठावर जर आकारास यावयाचे झाले तर जनता त्याला संत तुकडोजी महाराजांच्या आदर्शाचाच कस लावील.

- श्री बाबा महाराज आर्वीकर
मोक्षधाम, माचणूर आश्रम

राष्ट्रसंत साहित्य प्रकाशन, नागपूर-८.